# सत्यार्थप्रकाश
## का व कशासाठी?


* लेखक *

**माधव के देशपांडे**

पिंपळे सौदागर, पुणे ४११ ०२७.



I.S.B.N.
978-81-930435-1-6



* प्रकाशक *

**आर्य प्रकाशन**

पिंपरी, पुणे ४११०१८

भ्रमणभाष : ९४२२३२५३२२, ८९८३८९६५०२

ईमेलः spyarya@gmail.com

**ग्रंथाचे नांव – सत्यार्थप्रकाश का व कशासाठी?**

Satyarth-Prakash ka va Kashasathi?

Light of truth why and for what?



**लेखक – माधव केशवराव देशपांडे**

रो. हाउस नं. ३, साई अव्हेन्यु, पिंपळे-सौदागर,

पुणे ४११०२७. फोन : ०२०-२७२० १८७७,

मो. ९८२२ २९५ ५४५, ८६०५ ४०५ ३३०.

ईमेल : madhavkdeshpande@rediffmail.com,

madhavkdeshpande@gmail.com



अधिकार – सर्वाधिकार लेखकाधीन



प्राप्तिस्थान – महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा, परळी वैजनाथ, बीड.

आर्य समाज पिंपरी, महर्षि दयानंद मार्ग, पुणे ४११ ०१७.

मुखपृष्ठ – संकल्पना : संजय आर्य, सदस्य, आर्य समाज पिंपरी, पुणे.

तिथी – फाल्गुन कृष्ण ०३, शालिवाहन शके १९३७.

विक्रम संवत् २०७२, सृष्टिसंवत् १,९७,०८,५३,११५.

कलियुगाब्द् ५११७, तदनुसार शनिवार दि.२६ मार्च २०१६.

स्मृति – छत्रपती शिवाजी महाराज जयंती.

ज्येष्ठ आर्य सेवक गौरव समारंभ, आर्य समाज, लातूर.

अक्षर जुळणी – आर. पी. एन्टरप्रायजेस, काळेवाडी, पुणे ४११०१७.

मुद्रण – आर्य मुद्रा, पिंपरी, पुणे ४११०१८.

आवृत्ति – प्रथम

प्रकाशन – पुष्प ३१ वे

संख्या – २०००

**प्रकाशक – आर्य प्रकाशन, पिंपरी, पुणे ४११०१८.**

ज्युरिया निवास, तीसरा मजला, सर्व्हे क्र. २०८,

पुना रेग्झीन समोर, चर्च शेजारी, रेल्वे स्टेशन मार्ग, पिंपरी,

पुणे ४११०१८. महाराष्ट्र, भारत. फोन ०२०-२७४२४८८१

मोबाईल ९४२२ ३२५ ३२२, ८९८३ ८९६ ५०२.

Email: aryaprakashpimpri@gmail.com, spyarya@gmail.com

**आय.एस.बी.एन. क्रमांक – ९७८-८१-९३०४३५-१-६**

**ISBN – 978-81-930435-1-6**

**मूल्य – रूपये ६० केवळ**

# प्रास्ताविक

सत्यार्थ प्रकाश एक चर्चित ग्रन्थ है, जितना क्रान्तिकारी व्यक्तित्व स्वामी दयानन्द का है, उतने ही क्रान्तिकारी विचार उनके लिखे ग्रन्थ सत्यार्थ प्रकाश में है। यह ग्रन्थ जब प्रकाशित हुआ था, तब जितना चर्चित था, आज भी चर्चा में इस ग्रन्थ का उतना ही महत्त्व है। यह ग्रन्थ वैदिक सिध्दान्त मानने वाले के लिये बौध्दिकता की पराकाष्ठा प्रदान करता है, वहाँ विरोधी विचार वाले को बुद्धि का उपयोग करने के लिये बाध्य करता है।

भारत में हिन्दू धर्म में प्रचलित जितने मत-सम्प्रदाय हैं, उन सब में जितनी मान्यतायें, रूढि, अन्धविश्वास और पाखण्ड पर आधारित हैं, उन सबका तार्किक विश्लेषण इस ग्रन्थ में उपलब्ध है। जो विदेशी स्वयं पाखण्ड में फसे हुये थे, परन्तु हिन्दुओं की मूर्खता पर हंसने में बड़प्पन समझते थे, उन विदेशी मतों में मुख्य रूप से ईसाइयत और इस्लाम की मिथ्या धारणाओं का भी तार्किक खण्डन इस ग्रन्थ के १३ वें और १४ वें समुल्लास में किया गया। ग्रन्थ की इन विवेचना के कारण ही क्रान्तिवीर सावरकर ने लिखा था - ''सत्यार्थ प्रकाश के रहते कोई विदेशी अपने मत की डींगें नहीं हांक सकता।''

इस ग्रन्थ में तार्किक और न्याय संगत विचार होने के कारण जितने भी बुध्दिजीवी समाज में हुये, सबने मुक्तकण्ठ से इस ग्रन्थ की प्रशंसा की है। आर्यसमाज और ऋषि दयानन्द के सम्पर्क में जो विद्वान् नेता, राजा-महाराजा आये, उन्होंने इस ग्रन्थ को पढ़ने की प्रेरणा सबको की।

दक्षिण में छत्रपति शाहू महाराज ने अपने विद्यालयों में सत्यार्थ-प्रकाश पढ़ाने की अनिवार्यता की थी। जोधपुर, उदयपुर राज्यों में भी ऋषि ग्रन्थों के पठन-पाठन की व्यवस्था अनेक स्थानों पर की गई। शाहपुराधीश नाहरसिंह वर्मा का शाहपुरा राज्य आर्य राज्य कहलाता था। यहाँ विद्यालयों में प्रतिदिन हवन होता था तथा विद्यालयों में ऋषिकृत ग्रन्थों के पठन-पाठन की व्यवस्था की गई थी।

इस ग्रन्थ की भाषा तार्किक होने के साथ दृढ़ता प्रदर्शित करती है,

जिसके कारण जिन मत–मतान्तरों का इसमें खण्डन किया गया है, उनमें से कुछ लोगों ने इस पर आपत्ति की तो कुछ लोगों ने न्यायालय की शरण ली परन्तु इस ग्रन्थ के पक्षपात रहित न्याय संगत तार्किक विचारों का सर्वत्र आदर किया गया। इस ग्रन्थों को पढ़ने के बाद मनुष्य की विचार करने की शक्ति जागृत हो जाती है। वह कुछ भी करने से पहले क्या, क्यों, कैसे, जैसे प्रश्नों पर उन विचारों को परखता है तभी अनुकूल होने पर स्वीकृति की ओर बढ़ता है।

ऋषि दयानन्द की विशेषता है कि जो किसी भी प्रचलित गुरूओं के धर्मग्रन्थ हैं, उनमें दिखाई नहीं देती, कोई गुरू अपने शिष्य को उसकी परीक्षा करने का अधिकार नहीं देता, परन्तु ऋषि दयानन्द कहते हैं – मनुष्य को गुरू बनाने से पहले गुरू की ओर से पढ़े जाने वाले शास्त्र की परीक्षा अवश्य करनी चाहिए। गुरू का तो, शिष्य की परीक्षा का अधिकार था परन्तु शिष्य को गुरू की परीक्षा करने का अधिकार शिष्य को ऋषि दयान्द ही देते हैं। वे सत्यार्थ प्रकाश में परीक्षा के पाँच प्रकार भी बताते हैं। इसी कारण जहाँ अन्य गुरू अपने शिष्य को ज्ञान और विवेक का अधिकार नहीं देते, वहीं ऋषि दयानन्द शिष्य का ज्ञानवान् और विवेकी बनने की प्रेरणा करते हैं।

इस प्रकार जीवन के सभी क्षेत्र और सभी अवसर सत्यार्थप्रकाश के विचार क्षेत्र में आते हैं। मनुष्य के बाल्य से लेकर मृत्यु तक की अवधि हो या विविध ज्ञान–विज्ञान को समझने के अवसर हो, इसी कारण सत्यार्थप्रकाश के ७, ८, ९ वें समुल्लास में सम्पूर्ण दार्शनिक पक्ष प्रस्तुत किया गया है।

ऐसे महत्त्वपूर्ण ग्रन्थ को मराठी भाषा में प्रश्नोत्तर शैली में प्रस्तुत करने का सफल प्रयास श्री माधव देशपाण्डे ने किया है। श्री देशपाण्डे ने स्वयं और अपनी धर्मपत्नी और अपने बच्चों को इस ग्रन्थ के माध्यम से प्रबुध्द बनाया है और अब वे समाज के युवाओं को भी इस उत्कृष्ट विचार से जोड़ना चाहते हैं। मैं इनके इस उत्तम प्रयास की प्रशंसा करता हूँ और ग्रन्थ के लोकप्रिय होने की कामना करता हूँ।

– डॉ. धर्मवीर

# भूमिका

सत्यार्थ प्रकाशचे वाचन, चिंतन व अध्ययन, का? व कशासाठी? महर्षि दयानन्द सरस्वती यांनी सत्यार्थ प्रकाश हा अमर ग्रंथ लिहला. या ग्रंथा विषयी मला विशेष आकर्षण वाटले. ते सुध्दा प्रथम वाचण्यामध्ये विशेष जाणवले नाही. परन्तु आर्य समाजचे कार्य करता करता व अनेक विव्दानांकडून त्याची महती समजून घेता घेता आकर्षण अधिकच वाढत गेले. कदाचित यामुळेच, त्याचे अध्ययन ५/६ वेळा केले तेंव्हा त्याची अपूर्वता जाणूव लागली होती. अशातच पिंपरी आर्यसमज ने मराठी सत्यार्थ प्रकाश पुनः प्रकाशित करण्याचे ठरविले. त्याची संगणकिय लिखित प्रत आली होती. ते प्रुफ तपासण्याचे काम कोण करेल असा विचार पुढे आला व मी आपणहून हे काम स्वीकारले, यात माझा स्वार्थ होता, मला यानिमित्ताने पुनः सत्यार्थ प्रकाशच्या शब्दा-न-शब्दाचा अभ्यास करता येईल व झाले ही तसेच. या ग्रंथा विषयी माझी श्रध्दा द्विगुणीत झाली. हे करत असताना असे लक्षात आले की यातील प्रथम दोन तीन समुल्लासात संस्कृत, व्याकरण, सिध्दान्त, दर्शनशास्त्र, मनुस्मृति याची प्रचुरता असल्यामुळे अनेकजण हा ग्रंथ अर्धवट वाचून सोडून देतात. मुख्य मुद्दा असा आहे की ग्रंथास समग्रपणे समजण्यासाठी वाचकास हा भाग समजून घेणे आवश्यक आहे. याचा विचार करून मनात असा विचार आला की आपण एक छोटी पुस्तिका का लिहू नये की ज्यातून ''या ग्रंथात आहे तरी काय?'' हे जाणून घेण्यासाठी सम्पूर्ण ग्रंथ वाचण्याची वाचकाची उत्सुकता वाढीस लागेल. म. दयानन्द सरस्वतींचा हा ग्रंथ लिहण्याचा उद्देश्य शिवाय दासबोधाचा अभ्यास करताना मला असे दिसून आले की या ग्रंथाचा, तसेच म. दयानन्द सरस्वती व समर्थ रामदास स्वामी व त्यांचा दासबोध ग्रंथ यात बरेच साम्य आहे. माझा यापूढील प्रयास ''वेदानुकुल दासबोध'' असा असेल.

म. दयानंद सरस्वती व समर्थ रामदास स्वामी यांच्या जीवन काळातील भारत देशाची राजकीय, सामाजिक व वैयक्तिक परिस्थिती

बऱ्यांच अंशाने समान असल्याचे त्यांच्या ग्रंथांवरून दिसून येते. समर्थांनी घरदार सोडून १२ वर्षे नाशिकला तपश्चर्या केली व पूढील १२ वर्षे सम्पूर्ण भारत भ्रमण करून राष्ट्राचे समग्र निरीक्षण केले. समर्थ त्यांच्या दासबोध ग्रंथात व इतर काव्यात लिहतात. ''भारतीय समाज आतून बाहेरून अगदी विस्कळीत व दिशाहीन झाला होता. एक भिन्नस्वरूप असलेली परधर्मिय राजसत्ता या देशात दृढमूल झाली होती. ते अधिक इहलोकवादी असल्यामुळे, त्यांचा भारतीय समाजावर गंभीर परिणाम झाला. ब्राह्मण वर्ग परम्परेने भारतीय समाजाचा बौध्दिक पूढारी होता. तोच आचार भ्रष्ट व विचारभ्रष्ट झाला. त्याग, निःस्पृहता व तपःश्चर्या सोडून ते अत्यंत स्वार्थी बनले. क्षत्रिय वर्ग, समाजातील शौर्य, वीर्य, पौरूष व पराक्रम याचे प्रतिक असायचा. पण शूर क्षत्रिय धर्मनिष्ठा विसरले, आणि परकिय राजसत्तेच्या सेवेद्वारा स्वार्थ साधण्यात धन्यता मानू लागले. त्यांच्या आचार विचारावर राहणीमानावर व्यवहार व धर्माचरणावर राजकर्त्यांची छाप पडली. समाजातील धनिक व्यापारी वर्ग अधिकारी वर्गाशी अत्यंत लाचारीने वागून स्वतःची तुंबडीभरत होता. तसेच नाना प्रकारच्या सोंगाढोंगाना, नास्तिक पणाला, वाह्यात तर्कटी पणाला आणि बुवाबाजीला नुसता उत आला होता. खरा धर्म व परमार्थ लोपल्या सारखा झाला. आकुंचित वृत्तिच्या अत्यंत स्वार्थी माणसांनी समाज भरून गेला होता. समाजातील अनेक दुष्ट व विध्वंसक शक्ति प्रगट झाल्या होत्या. त्यांना रोखून धरणे अशक्य झाले. सत्तेसाठी नीच स्पर्धा, पैशासाठी विश्वासघात, स्वार्थासाठी आपापसातील भयंकर दीर्घ द्वेष, आणि विषय भोगासाठी किळसवाणा अनाचार याचे उघड थैमान सुरू झाले होते. सत्ता संपादन करण्यासाठी, पैसा मिळविण्यासाठी व काम वासना तृप्त करण्यासाठी माणसाने काय करावे याचा काहीही सुमार उरला नव्हता. तीर्थ क्षेत्रे भ्रष्ट करणे, बायका मुलींना बाटवणे, बायकांना पळविणे, त्यांना भ्रष्ट करून गुलाम करणे, व्यापाऱ्यांना लुटणे व मारून टाकणे, चोऱ्या करणे, दरोडे घालणे, जाळपोळ करणे, भयंकर क्रूर शिक्षा देणे, गावे बेचिराग करणे, सामुदायिक कत्तल करणे या व अशा मानवतेला लाज आणणाऱ्या घटना रोज कानावर येत होत्या. या साऱ्या

कारणांनी सज्जनपणे जगणाऱ्या सामान्य माणसाच्या जीवनात स्थिरता, निर्भयता, स्वस्थता व निश्चिंतता मुळीच उरली नाही, सामान्य माणूस सर्व तऱ्हेने भय, चिन्ता, अस्थिरता, पारतंत्र्य दारिद्र्य, यांनी ग्रासल्यामुळे दीन बनला होता. आज सुध्दा या परिस्थितीत कांही बदल झाल्याचे आपणास जाणवते काय? याचे सूक्ष्म निरीक्षण या दोन्ही ऋषिंनी केले व आपली स्वतःची मोक्ष मार्गाची साधन कमी करून लोक कल्याणासाठी लोक जाग्रतिसाठी आपल्या आयुष्याचा क्षण ना क्षण वेचला.''

भारतीय समाज मागे का पडला याची दोन कारणे या दोन्ही महापुरूषांनी आपापल्या ग्रंथात नमूद केली आहेत. नीट विचार न करणे अथवा अविद्याग्रस्त असणे व प्रयत्न पुरूषार्थ न करणे. अर्थात्, अविवेक आणि आळस निश्क्रियता हीच भारताच्या अवनीतीची, दैन्यावस्थेची अथवा रोगाची कारणे होत. म्हणून समाज प्रबोधनासाठी समर्थांनी दासबोध व दयानन्दानी सत्यार्थ - प्रकाश या अमर ग्रंथाची निर्मिती केली. मनुष्य आपला नाकर्तेपणा सोडून पुरूषार्थी बनेल तर तो आपली ही अवस्था बदलू शकतो. भाग्यशाली बनू शकतो. अज्ञान, दूःख, भ्रांन्ति सोडून विवेक व वैराग्याचा स्वीकार करून मोक्ष मार्गाला जाऊ शकतो यासाठी मानवी जीवनाचे सम्पूर्ण चित्रण व प्रबोधन त्यांनी आपल्या ग्रंथातून केले आहे.

अशा अमूल्य व अमर ग्रंथाचे वाचन का व कशासाठी करावे? यासाठी हा एक अल्प प्रयत्न. कोणीही ग्रंथकार ग्रंथ लिहण्यास जेव्हां तयार होतो, प्रवृत्त होते तेव्हा त्याच्या नजरे समोर पूढील चार गोष्टी असतात. ग्रंथामध्ये काय सांगायाचे, ते कां सांगायचे, ते कोणास सांगायचे, आणि ते कसे सांगायचे? भक्ति मार्गाचा अवलंब करून, भक्तिने खात्री पूर्वक ईश्वराची प्राप्ति होते हे सांगण्यासाठी हा ग्रंथ आहे. म. दयानन्द भक्तीची व्याख्या अशी करतात ''भक्ति अर्थात् ईश्वर की आज्ञा का पालन करना.'' ही ईश्वराची आज्ञा कोठे आहे? अर्थातच ती चारही वेदात अर्थात ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या मध्ये. म्हणून त्यांनी ''वेदों की ओर लौटो'' अशी घोषणा केली ''नान्य पंथः

विद्यते अयनाय'' त्या शिवाय अन्य मार्ग नाही.

समर्थ रामदास स्वामी दास बोधात म्हणतात

**''पूर्ण ग्रंथ पाहिल्या विण। उगाच ठेवी जो दूषण ।**

**तो दुरात्मा दुराभिमान । मत्सरे करी ।।१-१-२२।।**

**पूढे सातव्या दशकात नवव्या समासात म्हणतात**

**जेणे परमार्थ वाढे । अंगी अनुताप चढे ।**

**भक्तिसाधन आवडे । त्या नाव ग्रंथ ।।७-९-३०।।**

**जो ऐकताच गर्व गळे । का ते भ्रांतीच मावळे ।**

**नातरी येक सरे वोळे । मन भगवंती ।।७-९-३१**

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर ''सत्यार्थप्रकाश'' विषयी म्हणतात हिन्दू जातीच्या थंडशा रोमा रोमात उष्ण रक्ताचा संचार करणारा हा ग्रंथ अमर होवो, अशी माझी कामना आहे. ''सत्यार्थप्रकाश'' च्या विद्यामानतेत कोणीही विधर्मी आपल्या पंथाची शेखी मीरवू शकत नाही. अर्थात् आपल्या पंथा विषयीचे त्यांचे गर्व हरण होते.

**'' जेणे होय उपरती । अवगुण पालटती ।**

**जेणे चुके अधोगती । त्या नाव ग्रंथ ।। ७-९-३२।।**

या पुस्तकाच्या परिशिष्टात ''सत्यार्थप्रकाश'' वाचून ज्यांचे आयुष्य आमूलाग्र बदलले, अवगुण पालटले यांची ३-४ उदाहरणे दिली आहेत, ती अवश्य वाचावी''

**'' जेणे परत्रसाधन । जेणे ग्रंथे होये ज्ञान ।**

**जेणे होईजे पावन । या नाव ग्रंथ ।। ७-९-३३ ''**

या नाव ग्रंथ ''सत्यार्थप्रकाश'' याची प्रचिती आल्यावाचून राहत नाही.

या माझ्या (अल्पमतिच्या) पुस्तिकेस परम आदरणिय डॉ. धर्मवीर जी, प्रधान, परोपकारिणी सभा (म.दयानंद स्थापित), अजमेर, यांनी माझ्या विनंतीस मान देवून प्रस्तावना लिहली, त्यांचे जितके आभार


मानावे तितके कमीच आहेत. तसेच हे पुस्तक परिपूर्ण होण्यासाठी अनेक विद्वान् लेखकांच्या साहित्याचा आधार व मदत मला मिळाली. हे विचार मूलतः मला त्यांच्या साहित्यातूनच प्राप्त झाले आहेत म्हणून त्यांच्या ऋणातच राहणे मी पसंत करेन. प्रस्तावनेत डॉ धर्मवीर जी नी नमूद केले कि राजर्षि छत्रपति शाहू महाराजांनी सत्यार्थप्रकाश विषयी आपल्या राज्यात कांही वटहुकुम काढले होते. त्यांची प्रत यातील परिशिष्टात जोडली आहे. वाचकानी ती अवश्य वाचावी.

या आधारभूत ग्रंथांची सूची शेवटी यात समाविष्ट केली आहे. मुद्रक, प्रकाशक, अक्षर जुळणी वगैरे सर्व प्रक्रियेची जवाबदारी पार पाडणारे माझे स्नेही श्री संजय आर्य, यांच्या व अन्य मान्यवरांच्या ऋणातच राहणे मी पसंत करेन.

यात कांही त्रुटि राहिल्या असतील तर विद्वान् पाठक, वाचक यांनी निदर्शनास आणून दिल्यास, त्यात सुधारणा करण्यात येईल. यासाठी आर्थिक मदत करणारे माझे आप्त कुटुंबीय व मित्र यांचेही आभार.

– माधव के. देशपांडे, पुणे


# महर्षी दयानंद सरस्वती विषयी मान्यवरांचे मतं



म. दयानंद सरस्वती या युगातील प्रथम पुरूष होते, ज्यांनी वेदांच्या भाष्यासाठी निर्दोष पद्धतीचा शोध लावला. जंगली लोकांचे पुस्तक म्हणून निर्भत्सना केलेल्या ग्रंथातून त्यांनी सत्य सनातन वैदिक धर्माचे पुनरूत्थान केले. **– योगी अरविन्द.**




मी स्वतः हृदयाने आर्यसमाजी आहे. ‘आर्य समाज’ हे धर्मोपदेशक बनलेल्या जातीचे जुलमी ‘जू’ झुगारून देण्यासाठी उत्पन्न झाले आहे. भांडवलदारांचा जुलूम नाहीसा करण्यापेक्षा महत्वाचे हे धार्मिक जू काढून टाकणे आहे. **– छत्रपती राजर्षी शाहू महाराज.**



हिंदू जातीच्या थंडशा रोमारोमात उष्ण रक्ताचा संचार करणारा ‘सत्यार्थप्रकाश’ हा ग्रंथ अमर होवो. अशी माझी कामना आहे. ‘सत्यार्थप्रकाश’ च्या विद्यमानतेत कोणी विधर्मी आपल्या पंथाची शेखी मारू शकणार नाही. **– स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर.**




महर्षी दयानंद सरस्वती जाज्वल्यमान रक्षत्र होते जे भारताच्या क्षितिजावर तेजपूर्ण प्रकाशाने चमकले आणि ज्याने निद्रिस्त भारताला जागे केले. स्वामीजी स्वराज्याचे सर्वप्रथम संदेशवाहक आणि मानवतेचे उपासक होते. **– लोकमान्य बाळ गंगाधर टिळक.**



स्वामी दयानंद सरस्वती भारताची नव-निर्मिती, धार्मिक पुनरूत्थान व नैतिक जागरणाची मशाल पेटविणाऱ्या अनेक महापुरूषांपैकी एक होते. त्यांनी स्थापिलेल्या आर्यसमाजाने निर्विवादपणे हिंदूसमाजाची पुनर्बांधणी, सुधार व नवचैतन्याच्या निर्मितीत महत्वपूर्ण भूमिका वठविली आहे. **– नेताजी सुभाषचंद्र बोस.**



मी मानतो की महर्षी दयानंद सरस्वती यांनी वैदिक वर्ण व्यवस्थेची जी व्याख्या केली आहे ती बुद्धीमत्तापूर्ण आहे, घृणास्पद नाही. केवळ जन्माने नव्हे तर योग्यतेने व्यक्तीचे समाजातील स्थान ठरणे योग्य आहे. **– भारतरत्न डॉ. भिमराव (बाबासाहेब) आंबेडकर.**



महर्षी दयानंद सरस्वती यांची प्रखर राष्ट्रभक्ती, वैदिक धर्म व भारतीय संस्कृतीच्या प्रति त्यांना वाटणारा स्वाभिमान, त्यांचे ज्ञान, विचार आणि कार्य मला भारत स्वाभिमान आन्दोलान व भारताला विश्वगुरू बनवण्यासाठीच्या प्रयत्नात प्रेरणास्रोत आहे. **– स्वामी रामदेव.**

# सत्यार्थप्रकाश का ? व कशासाठी

## १. पार्श्वभूमि :-

महर्षि दयानंदानी एकोणविसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी आपला एक प्रमुख ग्रंथ ''सत्यार्थप्रकाश'' लिहून धार्मिक, सामाजिक व राजनैतिक जगात एक क्रांति घडवून आणली. हा ग्रंथ म्हणजे एक वैचारिक क्रान्तिचा शंखनाद आहे. या ग्रंथाचा साधारण आणि बुध्दिवादी, विचारशील अशा दोन्ही प्रकारच्या जन मानसावर खोलवर प्रभाव पडलेला दिसून येतो. वैदिक धर्माशी संबंधित असलेले अनेक सिध्दान्त, जे आम्ही आमच्या अज्ञान, आळस व प्रमाद यामुळे विसरून गेलो होतो, अथवा त्यांच्या विषयी आमच्या मनात संशय व अश्रध्दा उत्पन्न झाली होती ते सर्व सिध्दान्त स्वामी दयानन्द सरस्वतींनी या आपल्या अमर ग्रंथ सत्यार्थ प्रकाशच्या माध्यमातून आम्हास पुनः प्राप्त करून दिले. हा ग्रंथ वाचतांना, कांही ठिकाणी लेखकाचा आशय समजण्यास थोडा कठिण वाटतो. हा ग्रंथ जसा सुपाठ्य आहे, तसेच यातील दार्शनिक संदर्भाचे विषय दर्शन शास्त्राच्या टिपणी शिवाय समजणे कठिण आहेत. प्रश्न असा निर्माण होतो कि स्वामीजींनी हा ग्रंथ का लिहला असावा? याची काय आवश्यकता निर्माण झाली? यासाठी आपणास त्या काळातील सामाजिक आध्यात्मिक व राजकिय विचार धारा अथवा परिस्थितीचा अभ्यास करावा लागेल. हीच सत्यार्थ प्रकाशाच्या निर्मितीची पृष्ठ भूमि आहे.

वस्तुतः एकोणविसाव्या शतकात जगात सर्व स्तरावर उत्क्रांति म्हणावी अशी परिस्थिति निर्माण झाली होती. विज्ञानाच्या अनेक शोधा-मुळे धार्मिक कल्पनांना तडा गेला होता. सारे वातावरण ढवळून निघाले होते. स्वामी दयानन्दानी सन १८४६ च्या सुमारास आई वडिलांच्या संपन्न घराचा त्याग साधारण पणे वयाच्या २१ व्या वर्षी केला व ज्ञान लालसा शान्त करण्यासाठी भारत भर भ्रमण केले. त्यावेळी जगामध्ये दोन मोठ्या घटना घडून आल्या. प्रथम कार्ल मार्क्स याने जर्मनीहून इग्लंडला प्रयाण

केले व कम्युनिझमचा संदेश जगाला दिला. इसवी सन १८४८ ते १८८३ ते १८९४. दूसरी घटना जवळपास त्याच वेळी घडली. ऑक्सफोर्ड विद्यापीठाने प्रो. मॅक्स मूलर यांना इग्लंडला यासाठी बोलावले होते कि त्यांनी ऋग्वेदाचा इंग्रजीत अनुवाद करावा व त्या अनुषंगाने भारतामध्ये ईसाई धर्माचा प्रचार करणाऱ्या ख्रिश्चन पादरी यांचा मार्ग सुकर करावा. कारण भारतात वेदाविषयी साधारण लोकांमध्ये सुध्दा अतूट विश्वास होता. ख्रिश्चन धर्म प्रसारासाठी त्या धर्म गुरूंना वेदा विषयीचे प्राथमिक ज्ञान आवश्यक होते. अशा प्रकारे जगात वेगवेगळ्या ठिकाणी तीन प्रकारचे बीजारोपण झाले ज्याचे विशेष महत्व आहे. कार्ल मार्क्स चा उद्देश्य असा होता कि अशी संस्था निर्माण व्हावी ज्यात भेदभाव नसेल, ईश्वर, धर्म व त्या संबंधीत कोणतीही परम्परा असणार नाही.

मॅक्स मूलर कम्युनिस्ट नव्हते ते पक्के ईसाई होते. त्यांना संस्कृत भाषेची आवड होती. भारतीय संस्कृतिचे अध्ययन केले होते, परन्तु भारतीय संस्कृतीचा प्रभाव त्यांचे वर नव्हता. त्यांनी वेदांचा अनुवाद केवळ यासाठी केला होता कि, भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यास मि शनऱ्यांना सुलभ व्हावे. त्यावेळी भारतात ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटीश सत्तेचा प्रारम्भ झाला होता. त्यांना इंग्रज अधिकाऱ्यांची आवश्यकता होती. त्यांच्यासाठी मॅक्समूलरने अनेक व्याख्याने दिली. त्याचा संग्रह करून एक ग्रंथ तयार करण्यात आला. 'India, What can it teach us' यात भारतीय वातावरणाचा सुंदरतेने उल्लेख करण्यात आला होता. इंग्रज अधिकाऱ्यांना यापासून प्रेरणा मिळाली. सिव्हिल सर्व्हिस चा जन्म इथूनच झाला. यानंतर मॅक्स मूलरने २०-२५ वर्षाच्या प्रयत्नाने ऋग्वेदाचे इंग्रजीत भाषांतर केले. त्यांनी एका पत्रात आपल्या मित्रास असे लिहिले होते कि हा अनुवाद वाचून भारतीय जनतेचा वेदाविषयी जो दृढ विश्वास आहे तो दूर होण्यास मदत होईल आणि ईसाई धर्म स्वीकारण्यास ते तयार होतील, ही दूसरी विचारधारा सुरू झाली होती.

स्वामी दयानंदानी युरोपात जन्म घेतला नव्हता. त्यांना इंग्रजी भाषेचे ज्ञान नव्हते, ना कोणत्याही युरोपीय शाळेत त्यांचे शिक्षण झाले,

ना त्यांनी कोणत्याही कॉलेजात प्रवेश घेतला होता, ना उर्दु ते शिकले, ना फारसी. ते एक ब्राह्मण-पुत्र होते. त्यांचे शिक्षण एका संस्कृत पाठशाळेत सुरू झाले होते. त्या काळी संस्कृत शाळेची अवस्था अतिशय बिकट होती. संस्कृत एक मृत झालेली भाषा आहे अशी जवळपास अनेकाची धारणा होती.

अशा परिस्थितित भारतामध्ये पाश्चिमात्य संस्कृतिचे आक्रमण सुरू झाले. त्याचा वेग प्रचंड होता. सम्पूर्ण भारत ढवळून निघाला होता. पाश्चिमात्य सभ्यते बरोबरच विज्ञानाचे अनेक शोध लागत होते. जसे वाफेचे इंजिन, तार यंत्रणा, दूरध्वनी, मोटर इत्यादि. यांचा धर्माशी कांहीही सम्बन्ध नव्हता. परन्तु या विज्ञानाने सुध्दा भारतीय संस्कृतिवर प्रचंड प्रभाव पाडला. सामाजिक जीवन सुध्दा आमूलाग्र बदलू लागले. लोकांच्या जीवन पध्दतिमध्ये परिवर्तन घडू लागले. स्वामी दयानन्द सरस्वती या सर्वाचे साक्षीदार होते. आपल्या २० वर्षाच्या तपस्येनंतर ते या निष्कर्षावर पोचले कि, ''प्रत्येक चमकणारी वस्तु सोने असत नाही.'' कम्युनिस्ट आणि ईसाई धर्माशी जर कोणी सामना करू शकेल, तसेच व त्या बरोबरच भारतीय प्राचीन संस्कृतिचा पुनरोध्दार करू शकेल तर तो आहे वैदिक धर्म.

तसेच याच्या पुर्विपासून आमच्या देशामध्ये आणखी एक विचार-धारा कार्यरत होती. या देशात मुसलमान, धर्म प्रचाराच्या निमित्ताने आले आणि येथे शासक बनून राहिले. ते या देशास पुर्विपेक्षाही एक उत्तम अशी जीवनचर्या शिकविण्यासाठी आले होते. पण या विषयात त्यांच्या वाट्याला घोर असफलता प्राप्त झाली. त्यांनी अनेक शतके इथे राज्य केले आणि त्यांच्या प्रचारकांनी त्यांच्या धर्माचा प्रचार व भारतीय संस्कृतिच्या उच्चाटनाचा खूप प्रयत्न केला, परन्तु यात त्यांना यश मिळाले नाही. याची दोन कारणे प्रमुख होती. एकतर त्यांना ही कल्पना नव्हती कि ज्यांना ते ज्ञान शिकवण्यास आले होते ते त्यांच्या पेक्षा अधिक सभ्य होते. जर ते भारताकडून कांही शिकण्यास आले असते तर त्यांना इथून अनेक विद्यांची प्राप्ति झाली असती व त्याचा

त्यांना फायदा झाला असता.

या उलट वैदिक संस्कृतिचे हे ऱ्हास युग होते. जनता प्राचीन संस्कृति विसरून चालली होती. परन्तु जी कांही संस्कृति शिल्लक होती ती इस्लामी संस्कृतिचा सामना करण्यास सक्षम होती. जरी कांही बादशहांनी इथे राज्य केले व मंदिराचा, धर्माचा, विध्वंस केला तरी ती पाश्वीक सफलता होती, विद्वत्तेची सफलता नव्हती. शहाजहाँचा पुत्र दारा शिकोह उपनिषद् साहित्याकडे इतका आकर्षित झाला होता कि जर त्याच्याकडे राजनितिक जाण (राजनितिज्ञता) असती तर इतिहास वेगळा झाला असता. सारांश असा कि इस्लामी संस्कृति वैदिक संस्कृति नष्ट करण्यात सफल झाली नाही. ते शासक असल्यामुळे भारतीयांनी फारसी व अरबी शिकण्यास सुरू केले होते. कारण शासकीय कामकाजाची भाषा फारसी होती. संस्कृत केवळ पुरोहिताची भाषा राहिली होती. संस्कारा पुरती. जनतेचा संस्कृतशी काडीचाही संबंध उरला नव्हता.

मुसलमानांनी हिन्दु धर्मा विरूध्द निरन्तर अनेक पुस्तकांचे प्रकाशन केले. ज्यांचा हिन्दुकडून कोणताही प्रतिकार होत नव्हता. स्वामी दयानन्द सरस्वतींनी अवैदिक धर्मांचे खण्डन करून सत्यार्थ प्रकाशच्या १४ व्या प्रकरणात (समुल्लास) साधारण आलोचना केली आहे, कारण असे कि त्यांना मुसलमानांशी सुध्दा शास्त्रार्थ करावा लागला. त्यामुळे त्यांना हे आवश्यक वाटले कि वैदिक धर्माच्या पुनरूध्दारासाठी विपक्षांची आलोचना करणे आवश्यक आहे. आर्य समाजाचे इस्लाम विरोधी साहित्य इथूनच सुरू होते. मुसलमान शासकांच्या काळात इस्लाम धर्माची आलोचना करण्याचे साहस कोणातही नव्हते. परन्तु ब्रिटिश काळात धार्मिक आलोचना करण्याची स्वतंत्रता होती, जी आज स्वातंत्र्यातही कठिण झाली आहे.

ईसाई धर्माचाही प्रचार वाढत होता. आर्य समाजाची स्थापना झाली नव्हती. हिन्दु मुर्ति पुजक होते. मुसलमान मूर्तिपूजेच्या विरूध्द असल्यामुळे त्याची आलोचना करत होते. स्वामी दयानन्द सरस्वतींच्या पूर्वि मुरादाबाद इथे एक विद्वान होते मुन्शी इंद्रमणी. अरबी-फारसीचे

विद्वान होते व उत्तम लेखक होते. म्हणून त्यांनी सर्वप्रथम मुसलमानांच्या आक्षेपाना लिखित उत्तर देण्यास प्रारम्भ केला होता. आक्षेपाची भाषा गलीच्छ होती. त्यांनी या आक्षेपांचे उत्तर म्हणून ५/६ पुस्तकास प्रतिक्रिया रूपाने उत्तर दिले होते. त्यांचे एक प्रसिध्द पुस्तक ''इंद्र-वज्र'' आहे ज्यात प्रबळ युक्ति आणि प्रमाण आहेत.

म. दयानन्द सरस्वती कार्यक्षेत्रात येण्यापुर्वि (१८६३) धार्मिक उपद्रव वाढला होता. याचवेळी हिन्दूंचे धर्मांतर होत होते. स्वामी दयानन्द तर धर्माचे उपासक होते, सत्याचे प्रबळ समर्थक होते. अशा परिस्थितित त्यांना असे प्रकर्षाने जाणवले कि लोकांना कुरान आणि बायबल मधील धर्माचा परिचय करून द्यावा, त्यामुळे लोक त्यास आपल्या धर्मापेक्षा श्रेष्ठ समजणार नाहीत. याच वेळी सन १८७५ मध्ये स्वामीजीनी अद्वितीय असे ''सत्यार्थप्रकाश'' पुस्तक लिहले, ज्यात विधर्मी मताच्या टिके सहित, स्वधर्मातील अंधश्रध्देवर ही टिका लिहली. त्याकाळी हिन्दु समाजाची अशी अवस्था होती कि उर्दु फारसी लिखाण करणारे आपली सुरूवात ''बिस्मिल्लाह'' लिहून करत होते. आर्यसमाज ने मुसलमान व ख्रिश्चन धर्माच्या प्रवाहास प्रतिबंध केला. मॅक्समुलर चा उद्देश्य उघड झाला होता. स्वामीजीनी सांगितले कि जर वेदांचा स्वाध्याय योग्य प्रकारे केला तर भारतीयांना ईसाई धर्म स्वीकारण्याची आवश्यकता नाही.

# २. सत्यार्थप्रकाशचा उद्देश्य आणि भूमिका

सत्यार्थ प्रकाशच्या निर्मिति पूर्विची पार्श्वभूमि आपण पाहिली. या परिस्थितिशी सामना करण्याचे म. दयानन्दांनी ठरविले. म. दयानन्द प्रखर सत्यान्वेषी तर होतेच तसेच वेदा विषयी त्यांची अगाध श्रध्दा होती व शत प्रतिशत विश्वास होता कि वेद प्रणित संस्कृतिच यावर रामबाण उपाय होऊ शकते. त्यांनी सत्यासाठी आयुष्यात कधीही तडजोड केली नाही. जगातील श्रीमंत देवस्थानचे प्रलोभन ठोकरले, तर इंग्रज प्रशासनाच्या धम की युक्त आदेशा विरूध्द, शासकिय अधिकारी (कलेक्टर) व मिशनरी यांच्या धर्मावर त्यांच्या उपस्थितीत सडेतोड टिका केली व जाहीर केले की सत्य तेच बोलेन. हेच त्यांच्या जीवनाचे, साहित्याचे प्रमुख प्रयोजन होते. ते सत्याची व्याख्या अशी करतात.''जो पदार्थ जसा आहे, त्याला तसाच म्हणणे, लिहणे व मानणे म्हणजे सत्य.'' अर्थात् सत्याचे वास्तविक स्वरूप प्रकट करणे. सत्याचे ग्रहण करणे व असत्याचा त्याग करणे. हट्ट सोडून वास्तविकता स्वीकार करणे, यासाठी धर्माच्या नावावर मत, पंथ, सम्प्रदाय, मजहब, यांच्यात बध्द झालेल्या मनुष्यास बाहेर काढून, खरे मानवरूप निर्माण करणे हा उद्देश्य आहे. परस्पर प्रेम सौहार्द आणि सुखी जीवनाच्या मार्गावर मानव समाजाला प्रवृत्त करणे, कोणत्याही जाति, देश यांसाठी नव्हे परन्तु सम्पूर्ण मानव जातिसाठी, त्यांच्या उन्नति प्रित्यर्थ मार्गदर्शन करणे, जगाच्या कल्याणासाठी प्रयत्न करणे हे एक मात्र प्रयोजन दृष्टि समोर ठेवून तयांनी सत्यार्थ प्रकाश ची रचना केली.

हिन्दु, ख्रिश्चन, मुसलमान धर्मातील सामाजिक विकृति, अंधश्रध्दा रूढी, दूरकरून सम्पूर्ण मानव जातिला एकधर्मी बनविले जाऊ शकते. यावर म. दयानंदाचा विश्वास होता. या महान कार्यासाठी त्यांनी प्रथम चांदपूर येथील यात्रे मध्ये सांप्रदायिक विद्वानांना एकत्र करून सत्यासत्याचा विचार करून धर्मातील विकृति दूर करून परस्पर द्वेष मिटवून समान मूल्यावर एकमत करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. परन्तु भोळ्या भाबड्या जनतेला भ्रमजालात फसवून ठेवणारे, स्वार्थ सिध्द

करणाऱ्या पंथ प्रमुखांनी त्यांना सहकार्य केले नाही. असाच पुनः एकदा त्यानी दिल्ली मध्ये प्रयत्न केला होता व एकाच व्यासपीठावर सर्वांना बोलावून Minimum Common Programme चा प्रयोग केला होता. पण स्वार्थ प्रेमी, हट्टाग्रही धर्मगुरूंनी त्यांना साथ दिली नाही.

सत्यार्थ प्रकाश वाचण्यापूर्वी, महर्षि दयानंद सरस्वतींनी प्रथम व उत्तरार्धापूर्वि भूमिका व अनूभूमिका लिहली आहे. त्याचा आशय समजून घेतल्या शिवाय सत्यार्थ प्रकाश चा उद्देश्य सफल होणार नाही. भूमिका मध्ये स्वामीजी म्हणतात.

''सत्यार्थप्रकाश लिहण्या मागचा माझा मुख्य उद्देश्य हा आहे कि सत्य – सत्याचा अर्थ प्रकाशित करणे, अर्थात् जे सत्य आहे त्यास सत्य आणि जे मिथ्या आहे त्याला मिथ्याच म्हणणे. अर्थात् 'सत्य अर्थाचा प्रकाश' अभिप्रेत आहे. जे सत्या ऐवजी असत्य आणि असत्या ऐवजी सत्य प्रकाशित करणे म्हणजे सत्य नव्हे. पण जो पदार्थ जसा आहे त्याचे तसेच वर्णन करणे, लिहणे व मानणे यालाच सत्य म्हणावे. जो मनुष्य पक्षपाती आहे तो आपल्या असत्याला ही सत्य आणि विरोधी मतांच्या व्यक्तिंच्या सत्याला असत्य सिध्द करण्यास प्रवृत्त होतो. म्हणून तो सत्य मताला प्राप्त होऊ शकत नाही. म्हणून विद्वान् आप्त पुरूषांचे मुख्य काम हचे आहे कि उपदेशाद्वारे अथवा लेखाद्वारे सर्वासमक्ष सत्य–असत्याचे स्वरूप प्रकाशित करावे. त्यानंतर त्यांनी स्वतः आपले हिताहित समजून सत्यार्थ ग्रहण करून आणि मिथ्यार्थाचा त्याग करून सर्वदा आनंदी राहवे. मुनष्याचा आत्मा सत्यासत्य जाणणारा आहे. परन्तु स्वतःच्या प्रयोजनाच्या सिध्दिसाठी, हट्टापायी आणि दुराग्रहामुळे व अविद्यादि दोषा पोटी सत्याचा त्याग करून असत्याचा स्वीकार करतो, परन्तु या ग्रंथा मध्ये असे आपणास आढळणार नाही. कुणाचे मन दुखविणे किंवा कुणाची हानि करणे हा उद्देश्य मुळीच नाही. ज्यामुळे मनुष्यजातिची उन्नति आणि उपकार करावा, सत्यासत्याचा मनुष्यांना बोध व्हावा व त्यांनी सत्याचा स्वीकार करावा व असत्याचा त्याग करावा, कारण सत्योपदेशा शिवाय मनुष्याच्या उन्नतिचे अन्य कारण असत नाही.

महर्षि दयानन्द सरस्वतीनी सत्यार्थ प्रकाश च्या उत्तरार्धा पूर्वी एक अनुभूमिका लिहली आहे त्याचे सुध्दा त्यांच्याच शब्दात अवलोकन करणे तितकेच महत्वाचे आहे.

‘‘हे इतिहास - सिध्द आहे कि पांच हजार वर्षापूर्वी वैदिक मता शिवाय अन्य कोणतेही मत या जगात अस्तित्वात नव्हते. कारण असे कि सर्व वेदोक्त आचार-विचार तत्वज्ञान जीवन पध्दति, विद्या व ज्ञाना विरूध्द नव्हती. वेदानुकुल प्रवृत्तिचा लोप झाल्यामुळे महाभारत युध्द झाले. या संस्कृतिचा लोप होत चालल्यामुळे साऱ्या जगात अविद्यारूपी अन्धकार पसरल्यामुळे मनुष्याची बुध्दि भ्रमयुक्त होऊन ज्याच्या मनात जसे आले तसे मत, पंथ, सम्प्रदाय सुरू झाले. त्या सर्व मतांमध्ये चार मत अर्थात् पंथ, जे वेद विरूध्द पुराणी, जैनी, किरानी, आणि कुरानी हे इतर सर्व मतांचे मुल पंथ आहेत. ते अनुक्रमे एकानन्तर एक अस्तित्वात आले. आता या चारही मतांच्या शाखा एक हजाराहून कमी नाहीत. या सर्व पंथीयांना व त्यांच्या शिष्य आणि अनुयायांना सर्वांना परस्पर सत्य - असत्याविषयी विचार करण्यासाठी अधिक परिश्रम होऊ नये म्हणून हा ग्रंथ लिहला.

जे जे कांही यात सत्य मताचे मण्डन आणि असत्याचे खण्डन केले आहे, त्याची सर्वांना ओळख व्हावी हेच प्रमुख प्रयोजन आहे. यात जेवढी माझी बुध्दि, जेवढी विद्या, आणि जेवढे ज्ञान या चारही मतांचे मूळ ग्रंथ वाचून प्राप्त झाले, त्यास आपणासमोर प्रस्तुत करणे योग्य वाटले, कारण असे कि लुप्त पावलेल्या ज्ञानाची पुनःप्राप्ति आज सहज शक्य होत नाही. त्यानंतर सर्वांना आपापल्या ज्ञानानुसार सत्य मताचे ग्रहण करणे व असत्य मताचा परित्याग करणे सहज शक्य होईल. यातील जे पुराणादि ग्रंथापासून शाखा उपशाखा रूप मत सम्प्रदाय आर्यावर्त देशात प्रचलित झाले आहेत, त्या विषयी थोडक्यात गुण दोष या ११ व्या समुल्लासात दर्शविले आहेत. या माझ्या कृतिचे जरी उपकार नाही मानले तरी विरोध करू नये, कारण असे कि माझा उद्देश्य हानि अथवा विरोध करणे हा नाही तर सत्य व असत्याचा निर्णय करणे व करविणे हाच आहे. अशा

प्रकारेच सर्वांनी न्याय दृष्टिने वागणे अति योग्य आहे. मनुष्याचा जन्मच सत्यासत्याचा निर्णय करण्याकरविण्यासाठी आहे. वादविवाद अथवा विरोध करण्या-करविण्यासाठी नव्हे. या आपापसातील मत-मतान्तराच्या विवादाने या जगात जी जी हानि झाली, होत आहे व होईल, त्याला पक्षपात रहित विद्वान् लोक जाणतात.

जो पर्यन्त मनुष्याच्या आपापसातील मिथ्या मत-मतान्तरातीत वादविवाद मिटणार नाहीत तो पर्यन्त एकमेकास आनन्द प्राप्त होणार नाही. जर आपण सर्वजण आणि विशेषकरून विद्वान्-ज्ञानी लोक इर्षा-द्वेष सोडून सत्य-असत्याचा निर्णय करून सत्याचा स्वीकार आणि असत्याचा त्याग करू किंवा करवू तर आमच्यासाठी हे असाध्य नाही. हे निश्चित आहे कि विद्वान् ज्ञानी लोकांच्या आपापसातील विरोधामुळेच सर्वांना विरोधाच्या जाळ्यात अडकविले आहे. जर हे लोक आपापल्या स्वार्थात-प्रयोजन सिध्दित न अडकता सर्वांच्या कल्याणासाठी प्रयत्न करतील तर सर्वांमध्ये ऐक्य निर्माण होईल. हा उद्देश्य पूर्ण करण्याची युक्ति या ग्रंथाच्या शेवटी लिहण्यात येईल. सर्व शक्तिमान् परमात्मा आमच्या सर्वामध्ये ऐक्य निर्माण होण्यासाठी लागणारा उत्साह, सगळ्या मनुष्याच्या आत्म्यात प्रकाशित करो.

# ३. सत्यार्थ प्रकाशचा संदेश

स्वामी दयानन्द सरस्वती या ग्रंथाद्वारे अखिल मानवास एक संदेश देण्यात यशस्वी झाले. जसा ईश्वर सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, सृष्टिकर्ता, व्यवस्थापक असून नियंता आहे, या उलट महापुरूष महान् असून सुध्दा शरीराच्या हाडा-मांसाच्या बन्धनात बध्द असून पापपूण्य करणारा, जन्मरणाच्या फेऱ्या करणारा, कर्म-बंधनात परतंत्र असलेला एक मनुष्य आहे, ज्यामुळे त्याच्यात मानव सदृश्य दुर्बळता येणे स्वाभाविक आहे. म्हणून मनुष्य केंव्हाही ईश्वर होऊ शकत नाही. ईश्वराचे स्थान घेऊ शकत नाही. ॠषी दयानन्दाचे हे तत्वज्ञानच वैदिक धर्म आहे. या धर्मा विरूध्द असणारी मान्यताच विकृति आहे. सर्व धार्मिक म्हणवणाऱ्या पंथ, सम्प्रदाय, मतावलंबी जनमानसात हा विकृति रूपी रोग समानरीत्या ठाण मांडून बसला आहे. यावरील उपाय सुध्दा समान आहे. म्हणूनच ते या ग्रंथात ११ व्या समुल्लासात म्हणतात ''जिस देश को रोग हुआ है, उसकी औषध तुम्हारे पास नही।'' या वाक्यात या ग्रंथाचे सार एक वटले आहे, यात एक त्यांच्या मनात सलणारे दुःख आहे, पीडा आहे, चिन्ता आहे, स्वाभिमान् आहे, आणि आत्मविश्वास आहे. स्वच्छ पणे सांगतात ''तूमच्या पाशी याचे औषध नाही, तूम्हाला रोग ही समजला नाही, तर निदान व चिकित्सा, उपाय कसे करू शकाल? त्या रोगावरील औषध माझ्या शिवाय कोणाकडे ही नाही.'' हा आत्मविश्वास या ग्रंथात पानापानात भरलेला आहे. यावरून असे दिसून येते की त्यांना जितकी आपल्यादेशाची चिंता आहे तितकी स्वतःच्या मुक्तिची सुध्दा नाही. यात जे कांही आहे ते साधन मात्र आहे, साध्य आहे, ते एकमात्र देशोन्नति आहे. त्यांची संध्या, स्वाध्याय, साधना, समाधि सर्व कांही स्वदेश-हिता साठीच आहे. यात आपणास ठिकठिकाणी देश प्रेमाचे राष्ट्र भक्तिचे प्रखर उद्गार दिसून येतात. या वाक्यातून तीन प्रश्न उभारून समोर येतात

१. रोगी देश कोणता?

२. रोग कोणता?

३. रोगावर औषध काय आहे.?

पहिल्या प्रश्नाचे उत्तर अति स्पष्ट आहे कि रोगी देश आर्यावर्त्त, भारत असून अकराव्या समुल्लासाच्या सुरूवातीसच त्यांनी नमूद केले आहे. ''यह आर्यावर्त्त देश ऐसा है, जिसके सदृश भूगोल में दूसरा देश कोई नही'' यापूढे ते आपल्या देशाची परिभाषा देतात. ''आम्हास व आपणास हे अति उत्तम आहे कि ज्या देशातील पदार्थापासून आपले शरीर बनले आहे, आता सुध्दा त्यापासून पालन-पोषण होत आहे, भविष्यातही होईल, त्याच्या उन्नतिसाठी तनमन-धनाने सर्वजण मिळून प्रेम पुर्वक प्रयत्नशील राहवे. यावरून स्पष्ट होते कि म. दयानन्दांना कोणत्या देशाच्या रोगाची चिकित्सा अभिप्रेत आहे.'' प्रत्येकाला आपल्या देशाची ओळख होणे सोपे झाले. आता या देशाला कसला रोग झाला आहे? महर्षि दयानंदानी या रोगांचा उल्लेख सत्यार्थप्रकाशच्या १४ समुल्लासात केला आहे. यांचे संक्षिप्त उत्तर आपणास दहाव्या समुल्लासात सापडते. ''आपस की फूट, मतभेद, ब्रह्मचर्य का सेवन न करना विद्या न पढना-पढाना, वा बाल्यावस्था में अस्वयंवर विवाह, विषयासक्ति मिथ्या भाषणादि, कुलक्षण, वेदविद्या का अप्रचार आदि कुकर्म है।''

आता या रोगावरील औषधोपचाराचा प्रश्न शिल्लक राहतो. हा उपचार त्यांनी आपल्या प्रवचनातून, लेखातून, ग्रंथाद्वारे व अमर ग्रंथ सत्यार्थप्रकाश यातून सांगितला. सत्यार्थप्रकाशची ओळ ना ओळ या विषयी स्वतः प्रमाण आहे. ही ओळ ना ओळ जणु कांही आम्हास सांगत आहे कि मला समजून तर घ्या. या ग्रंथाच्या उत्तरार्धात त्यांनी ४ समुल्लास लिहले. यात त्यांनी भारतामध्ये अस्तित्वात असलेल्या ४ प्रमुख सम्प्रदायांची समीक्षा अति मार्मिक शब्दात सांगितली आहे. याची दोनच उदाहरणे आपण इथे पाहू. ऋषि दयानन्द सरस्वती इतके मार्मिक आहेत कि लहानात लहान वाक्यात इतके कांही सांगून जातात कि आपण यावर ५/१० ग्रंथ लिहून ही सांगू शकत नाही.

***प्रश्न १ : ईश्वराने ही सृष्टि निर्माण केली नसती तर?***

**उत्तर : मग त्याला ईश्वर असे कोण म्हणाले असते? त्याची महिमा**

तर यातच आहे कि आम्ही आहोत. आमच्या अस्तीत्वासाठी शरीर अत्यावश्यक आहे व हे शरीर प्रकृति पासून बनले आहे, जशी ही सृष्टि बनली आहे. जर ही सृष्टिच निर्माण नाही केली तर आम्ही ही नसू व तूम्ही ही. ना ही सृष्टि. मग त्याला ईश्वर, सर्वशक्तिमान्, सर्वज्ञ, न्यायकारी दयाळु म्हणेल कोण? व तो, दया, न्याय कुणासाठी करेल. अशा अनेक गहन गहन प्रश्नांचे उत्तर सहज व सरळ भाषेत आपणास या सत्यार्थप्रकाश द्वारे मिळू शकते.

# ४. सत्यार्थ प्रकाश : ग्रंथ रचना

सत्यार्थ प्रकाश या अमर ग्रंथाच्या रचनेचा, निर्मितिचा प्रमुख आधार 'महर्षि दयानन्दाचे विशाल शास्त्रज्ञान, तीव्र तर्कबुध्दि, व्यापक अनुभव, दिव्य प्रतिभा, प्रखर स्मरणशक्ति, संस्कृत भाषेवरील प्रभुत्व' हाच होय. महर्षि दयानंन्दाची विशेषता अशी होती की त्यांची संस्कृत भाषा अत्यंत सरळ सोपी होती. ते जरी संस्कृत मध्ये बोलत होते तरी संस्कृत न जाणणाऱ्या श्रोत्याला सुध्दा त्याचा आशय समजत होता. जसे आपण वर पाहिले आहे कि म. दयानन्द कार्यक्षेत्रात प्रवेश करीत होते, त्यावेळी पाश्चात्य देशात दोन व्यक्ति प्रसिध्दिस पावल्या होत्या. एक कार्ल मार्क्स व दूसरी मॅक्समूलर. कार्ल मार्क्स यांनी आपला प्रसिध्द ग्रंथ लिहिला तो साधारण पणे २७ वर्षात (Das Kapital 1867 to 1894) तर मॅक्समुलरनी ऋग्वेदावरील मंत्राचा इंग्रजीत अनुवाद केला, त्यासाठी त्यांना २५ वर्षे लागली. (१८४९ ते १८७४) परन्तु महर्षि दयानन्दानी आपला 'अमर ग्रंथ सत्यार्थप्रकाश' समान अद्भूत ग्रंथ लिहिला तो केवळ साडे तीन महिन्यात. तेही तोंडी सांगून. या मानव निर्माण शास्त्रात ३७७ ग्रंथातील प्रमाण त्यांनी सांगितली, १५४२ संस्कृत मंत्र श्लोक लिहले, १८८६ प्रमाण प्रस्तूत केले. ऋग्वेदापासून ते पूर्वमिमांसा पर्यन्त (ब्रह्मा पासून ते जैमिनि पर्यन्त) जवळपास ३००० संस्कृत ग्रंथ व इतर भाषेतील असे हजारो ग्रंथ यांचे सार प्रस्तुत केले. म. दयानन्द आपल्या भ्रांति निवारण या ग्रंथात लिहतात ''मी निश्चयपुर्वक व परीक्षणानुसार ऋग्वेदापासून ते पूर्व मिमांसा पर्यन्त जवळपास ३००० ग्रंथ मान्य करतो.''

# ५. सत्यार्थ प्रकाश : स्वरूप आणि विषय

महर्षि दयान्दांनी एकोणविसाव्या शतकाच्या शेवटी आपल्या या अमर ग्रंथाची रचना केली व त्याचा प्रचार व प्रसार अत्यंत कमी वेळात झाला अर्थात् एका अर्ध शताब्दी वर्षात. असा प्रचार इतर कोणत्याही ग्रंथाचा झालेला दिसून येत नाही. हिन्दी भाषेतून प्रकाशित झालेल्या इतर कोणत्याही ग्रंथाचा देशी व विदेशी भाषेमध्ये अनुवाद इतक्या मोठ्या प्रमाणात झाला नाही. फ्रेंच, जर्मन, चिनी ब्राह्मी इत्यादि भाषेमध्ये सुध्दा याचा अनुवाद झाला आहे. हिन्दी मध्येत दोन कविंनी याचा पद्यानुवाद ही केला आहे. (आज सत्यार्थप्रकाश २३ भाषेत उपलब्ध आहे.)

'सत्यार्थप्रकाश' च्या लेखकाची अशी मान्यता आहे कि ईश्वर, जीव, आणि प्रकृति हे तीन पदार्थ अनादि आहेत. ईश्वराचे गुण, कर्म व स्वभाव सुध्दा अनादि व नित्य आहेत. सृष्टि-नियम सुध्दा अनादि व नित्य तथा सार्वभौमिक आहेत, अशी त्यांची धारणा आहे. विज्ञानाचे सुध्दा हेच मत आहे कि सृष्टि नियम Laws of nature हे अटळ, अतूट, सार्वभौमिक आहेत. या नियमांचा नियंता परमेश्वर आहे. त्याचे नियम ना तर बदलतात, ना बंद होतात, ना घटतात, ना त्यांचे मध्ये वृध्दि अथवा पुनर्विचार-सुधारणा होते म्हणूनच या सृष्टिमध्ये चमत्कार कधीही (Miracles) होऊ शकतात हे मान्य करणे म्हणजे चक्क अन्धश्रध्दा आहे. मग ती व्यक्ति कोणत्याही मत, सम्प्रदायाची असो.

फ्रान्सीस. एस. कोलिन्स एक आंन्तराष्ट्रीय ख्याति प्राप्त अमेरिकन वैज्ञानिक आहेत, ज्यांनी मानवीय अनुवंशिकताच्या गुणसुत्राचा शोध लावला. (DNA) ते आपल्या प्रसिध्द बेस्ट सेलर अशा पुस्तकात ''लॅग्वेज ऑफ गॉड (Language of God)'' पृष्ठ ५२/५३ वर लिहतात कि, ''असाध्य रोग चिकित्सेच्या क्षेत्रात कधी कधी चमत्कार घडू शकतात. जर ईश्वर सर्व शक्तिमान् आहे असे गृहित धरले तर कधी कधी त्याने चमत्कार केला तर आश्चर्य वाटायला नको.'' अन्य वैज्ञानिक पोल्किन होर्न म्हणतात. चमत्कार हे निसर्ग नियमाच्या विरूध्द

असे समजता कामा नये कारण शेवटी ते तर परमेश्वराच्या ईच्छेवरच अवलंबून असतात. सत्यार्थप्रकाशचे लेखक वैदिक तत्वज्ञानाचे, नियमांचे प्रतिपादन करताना म्हणतात कि परमेश्वर आपले नियम कधीही बदलत नाही कोणत्याही परिस्थितीत त्या नियमास अपवाद नाही आणि म्हणून जे कोणी चमत्कारावर विश्वास ठेवतात ते अंधश्रध्देवर विश्वास ठेवतात म्हणून आजच्या आधुनिक वैज्ञानिक युगात चमत्कारास आव्हान देणारा प्रथम ग्रंथ ''सत्यार्थप्रकाश'' होय. म्हणूनच या चमत्काराच्या तर्क कसोटिवर आपल्या व अन्य मतांच्या अंधश्रध्देवर सुध्दा आसूड ओढणारे या विश्वातील प्रथम विचारक, सुधारक व तत्ववेत्ता, महर्षि दयानन्द हेच होत.

सत्यार्थप्रकाश चे प्रणेता तत्वज्ञानी महर्षि दयानन्दांना, ना तर पुराणातील चमत्कार मान्य आहेत आणि ना तर बायबल व कुराणातील चमत्कार मान्य आहेत.

# सत्यार्थप्रकाश

या महान ग्रंथाचे महर्षि दयानन्दानी दोन भाग केले आहेत. एक-पुर्वार्ध आणि दुसरा-उत्तरार्ध. पुर्वार्धात आपल्या भूमिकेसहित दहा समुल्लास अर्थात् अध्याय आहेत तर उत्तरार्धात चार समुल्लास आहेत. एकूण १४ समुल्लासाचा हा ग्रंथ आहे. या ग्रंथाची भूमिका आपण वर पाहिली आहे. या ग्रंथात समुल्लास हा नवीन शब्द प्रयोग पाहवयास मिळतो. हे म. दयानन्दाच्या मौलिक विचारांचे घोतक आहे, असे दिसून येते. यश-अपयश, मान-हानि, यात सर्वथा समभाव मानणारे समरस दयानन्द स्वतः उल्हासित राहून सर्व मानव जातीला उल्हासित करण्याची त्यांची मनोकामना आहे. म्हणून या शताब्दीतील या महान विचारकाने आपल्या ग्रंथाचे वर्गीकरण समुल्लास या शिर्षकाने केले आहे, ज्यामुळे सर्वजण उल्हासित व प्रफुल्लित होऊन जीवन जगतील. सामान्य भूमिका वाचून वाचक क्रमशः एका नंतर एक अशा दहा श्रेणीपार करत, विशुध्द ज्ञान प्राप्त करत जीवनाचे ध्येय प्राप्त करू शकेल अशीच त्यांनी या ग्रंथाच्या विषयाची मांडणी केली आहे.

या ग्रंथाच्या शेवटी लेखकाने स्वतःची भूमिका, मान्यता मांडली आहे. स्वमन्तव्यामन्तव्य प्रकाश - या शिर्षकान्तर्गत. यात सर्व प्रथम धर्म काय व मनुष्य कोणास म्हणावे याची व्याख्या केली आहे.

जे वेदादि सत्य शास्त्र आणि ब्रह्मा पासून जैमिनी ऋषि पर्यन्त यांनी जे मान्य केलेले ईश्वरादि पदार्थ आहेत, ज्यांना मी सुध्दा मानतो, त्यांना सर्व सज्जन मनुष्यांसमक्ष प्रकशित करू ईच्छितो. जे त्रिकालाबाधित सत्य सर्वांना एकाच प्रकारे मान्य आहे, त्यासच माझी मान्यता आहे. माझा उद्देश्य कोणतीही नवीन कल्पना अथवा मत सम्प्रदाय स्थापन करण्याचा लेशमात्र सुध्दा नाही, परन्तु जे सत्य आहे, त्याला मानणे स्वीकारायला सांगणे व जे जे असत्य आहे त्याला सोडणे, त्याचा त्याग करावयाला लावणे हेच माझ्यासाठी अभिष्ट आहे. सर्वतंत्र सिध्दान्त अर्थात् सार्वजनिक धर्म, ज्याला सदा सर्वदा सर्वजण मान्य करत आले आहेत, मानत आहेत

व मानतील सुध्दा, म्हणूनच त्याला सनातन नित्यधर्म म्हणतात, ज्याचा विरोधी कोणी असणार नाही, तोच धर्म मी मानतो. मनुष्य त्यालाच म्हणावे कि जो मननशील होऊन स्वात्मवत् दुसऱ्यांच्या सुख दुःखाचा आणि हानि लाभाचा विचार करतो, अन्यायकारी बलवानाला सुध्दा भीत नाही उलट निर्बल धर्मात्म्यास सुध्दा भीतो, इतकेच नव्हे तर आपल्या सर्व सामर्थ्या निशी, धर्मात्मा जरी तो निर्बल अनाथ असलातरी, त्याचे रक्षण उन्नति, व अधर्मी मग तो चक्रवर्ती, सनाथ, महाबलवान् असला तरी त्याचा नाश, अवनति सदा करतो, यात मग त्याला दारूण दुःख जरी प्राप्त झाले तरी, प्रसंगी प्राण गेला तरी या मानव धर्मापासून जो ढळणार नाही, तोच खरा मनुष्य होय, हीच माझी मान्यता आहे. अशा प्रकारे महर्षि दयानंदानी एक्कावन मुद्यांची विवेचना यात केली आहे.

## १. सत्यार्थ प्रकाश प्रथम समुल्लास

प्रथम समुल्लास मध्ये ईश्वराच्या गुण कर्मानुसार त्याच्या अनंत नावांपैकी शंभर नांवाची व्याख्या करण्यात आली आहे. यात अनेक नाव आपणास प्रचलित व ऐतिहासिक दिसतील. त्यामुळे आपणास वेदामध्ये इतिहास असल्याची शंका येते. म. दयानन्द पूर्ण आत्मविश्वासाने सांगतात कि वेदामध्ये इतिहास नाही. यात ईश्वराच्या गुणानुसार त्याची नावे आहेत. या नावाची व्याख्या संस्कृत भाषेच्या व्याकरणानुसार त्यानी सांगितली आहे. संस्कृतचा व व्याकरणाचा अभ्यास नसलेल्यांना हे समजण्यास किंचित कठिण वाटते. इथे एवढेच लक्षात घ्यावयाचे आहे कि ईश्वराची अनंत नावे आहेत. प्रथम समुल्लास मध्ये हे सर्व देण्याचे कारण असे कि सत्यार्थप्रकाश मधील पूढील समुल्लासातील विषय समजताना हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. पुर्विच्या काळी सुध्दा आजच्या प्रमाणेच शेकडो देवी देवतांची पूजा होत होती. लोकोक्ति तर अशी आहे कि या देवी देवतांची संख्या ३३ कोटि आहे, पण या ३३ कोटिची संख्यात्मक गणना कुणीही केली नाही. विशेष करून गणपति, शिव, विष्णु, ब्रह्म, लक्ष्मी, सरस्वती, दुर्गा, यांची पूजा करणारे असे म्हणतात कि हे शब्द वेदामध्ये आले आहेत. यावरून यांची पूजा करणारे असे म्हणतात कि आम्ही

वेदातील वर्णन केलेल्या देवी - देवतांची पूजा करतो. यात अर्धे सत्य आहे, तर अर्धे असत्य पण आहे.

देवता कोण आहेत? काय ते सर्व पृथ्वीवरच राहत होते का स्वर्गा मध्ये? तेच ईश्वर आहेत का ईश्वराहून अन्य, भिन्न कोणी आहेत? याचे या समुल्लासात वर्णन आहे. महर्षि दयानन्दांनी या समुल्लासात सर्वप्रथम हे सांगितले कि देवतांचे स्वतःचे अस्तित्व नाही. ती सर्व एकाच ईश्वराची भिन्न भिन्न नावे आहेत. ऋग्वेदातील मंत्र स्पष्टपणे प्रतिपादन करतो कि ''एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति।'' अर्थात् ईश्वर, एकच असून त्याला विद्वान् लोक भिन्न-भिन्न नावाने संबोधित करतात. म्हणजेच वेदामध्ये ईश्वराच्या एकत्वाचे वर्णन आहे, परन्तु त्याच्या नावाचे एकत्व नाही. हीच बाब पहिल्या समुल्लासात सांगितली आहे.

## २. सत्यार्थ प्रकाश दूसरा समुल्लास

''मातृमान् पितृमानाचार्यवान् पुरूषो वेद।'' या संस्कृत वचनाने स्वामी दयानन्द या समुल्लासाची सुरूवात करतात. वस्तुतः जेंव्हा तीन उत्तम शिक्षक अर्थात् एक माता, दूसरा पिता व तिसरा आचार्य असतील, तेव्हांच मनुष्य ज्ञानवान् होतो. ते कुल धन्य होय. ते बालक भाग्यवान् होय, ज्यांचे माता पिता, धार्मिक विद्वान् आहेत. जेवढे उपकार व उपदेश बालकाला माता पित्याकडून मिळतील तेवढे अन्य कुणाकडूनही मिळणार नाहीत. म्हणून ते माता-पिता धन्य आहेत जे गर्भादान संस्कारापासून, जो पर्यन्त विद्या प्राप्त होत नाही तो पर्यन्त मुलांना उपदेश करतील.

महर्षि दयानन्द सरस्वतींनी सत्यार्थ प्रकाश मधील प्रथम दहा समुल्लासात वैदिक सिध्दान्ताचा विस्ताराने उल्लेख केला आहे. त्यानी याद्वारे सांगितले आहे कि वैदिक धर्मामध्ये मानवाची सर्वांगीण उन्नति शक्य आहे. यासाठी त्यांनी दूसऱ्या समुल्लासा पासून पाचव्या समुल्लास पर्यंत बालपणापासून मनुष्याच्या अन्तिम जीवनचर्ये पर्यन्तच्या जीवनाचे वर्णन केले आहे.

या समुल्लासात स्वामीजीनी लहान मुलांच्या शिक्षणावर भर दिला आहे. समाजात जन्मापासून अंधश्रध्देला सुरूवात होते याचा मुख्य

आधार अज्ञान हाच आहे. स्वामीजींचा विश्वास आहे कि बालकाच्या शिक्षणाचा प्रारम्भ त्याच्या जन्म घेण्याच्या पुर्विपासूनच होतो. त्याच्या वर माता पित्याच्या आचार विचाराचा तसेच आरोग्याचा प्रभाव पडत असतो. म्हणून सन्तान प्राप्ति करण्याची इच्छा करणाऱ्यांनी आपले आचार, विचार व आरोग्य याकडे लक्ष दिले पाहिजे. या समुल्लासात या विषयीचे विवेचन आहे.

स्वामी दयानन्द म्हणतात प्रत्येक मूल हे आपल्या आई वडिलांचे विचार तसेच त्यांचे गुण-दोष वंशपरम्परेने घेऊन येतो. याचा हा अर्थ नव्हे की मुलां मध्ये स्वतःची कोणतीही व्यक्तिगत वस्तु नाही, जी तो आपल्या आई वडिलापासून शिकत नाही. मुल आपले स्वतःचे विशेष गुण-दोष सुध्दा सोबत घेऊन येत असतो. आमची समजूत सर्वतः चुकीची आहे कि जन्मतः मूलाची पाटी कोरी असते. बदल एवढाच होतो कि त्याचे गुण दोष आई वडिलांच्या गुण दोषांनी प्रभावित होतात. म्हणून ज्यांना आपल्या संततीस उत्तम बनवायचे आहे त्यांना या विषयी फार पूर्वी पासून तयारी करावी लागते.

भारतवर्षात मुलांच्या संगोपनाच्या दृष्टिने अनेक वाईट प्रथा प्रचलित आहेत त्यात सुधारणा आवश्यक आहेत. उदाहरणार्थ जन्म कुंडली बनविणे व ग्रह ताऱ्यांच्या स्थाना वरून भविष्याचे अनुमान करणे. म. दयानन्द म्हणतात ग्रह ताऱ्यांचे भूगोल शास्त्र तर ठिक आहे. चंद्रग्रहण, सूर्यग्रहण अभ्यास केला तर गतिच्या गणिताद्वारे त्यांच्या निश्चित वेळेचे अनुमान फार पुर्वि आपण सांगू शकतो. परन्तु हे ग्रहतारे नक्षत्र मानवी जीवनावर प्रभाव (निर्जीव, जड असल्या मुळे) टाकू शकत नाहीत. तसेच भूत-प्रेता विषयीचे गैर समज याच्या साहय्याने मूलांवर भीती घालण्यात येते. वैद्य डॉक्टरांचा सल्ला न घेता ग्रह ताऱ्याची (न होणारी) शांति केली जाते. हा सर्व अज्ञानाचा परिणाम आहे. म्हणून आपल्या मुलांना अशा प्रकारच्या अंधश्रध्दे पासून माता-पित्यानी दूर ठेवले पाहिजे.

म. दयानन्दांनी या समुल्लासा मध्ये असे सांगितले आहे कि योग्य शिक्षण न मिळाल्यामुळे मुलामध्ये व मनुष्यामध्ये अनेक दोष उत्पन्न

होतात. प्रकाशामुळे अज्ञान रूपी अन्धकार नष्ट होतो. यापुढे जाणून स्वामीजी म्हणतात प्रत्येक शासन कर्त्याचे कर्तव्य आहे कि प्रत्येकांच्या मुलांच्या शिक्षणाची निःशुल्क व्यवस्था केली पाहिजे. जे आईवडिल आपल्या मुलांना शाळेत पाठवित नाहीत त्यांना दण्ड देण्याचा कायदा केला पाहिजे. हे स्वामीजीचे विचार अत्याधुनिक व कालजयी आहेत. कारण मुलांना जन्म देऊन त्यांच्या उचित शिक्षणाची व्यवस्था न करणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. तसेच स्वामीजी म्हणतात कि मुला-मुलींचे शिक्षण एकत्रितपणे होता कामा नये. स्वतंत्रण पणे वेगवेगळी व्यवस्था असावी.

## ३. सत्यार्थ प्रकाश तीसरा समुल्लास

या समुल्लास मध्ये स्वामीजीनी ब्रह्मचर्य, पठन-पाठन व्यवस्था, सत्य व असत्य ग्रंथाची परीक्षा व त्यांची नावे व अध्ययन, अध्यापनाची विधि या विषयी विस्ताराने विवेचन केले आहे. जसे शाळेमध्ये शिक्षणाचा क्रम काय व कसा असावा याचे विवेचन असते. ब्रह्मचर्य आश्रमात कोणकोणत्या नियमांचे पालन केले पाहिजे याचे वर्णन आहे आमच्या जीवनाचा साधारण पणे एक चतुर्यांश भाग (अर्थात् सुरूवातीची २५ वर्षे) शिक्षणात व्यतीत झाला पाहिजे. गृहस्था श्रमाचा प्रवेश २५ वर्षा पुर्वी होता कामा नये.

स्वामीजीची धारणा अशी होती कि वेद व शास्त्रा ऐवजी विद्यार्थ्यांना अज्ञानाने युक्त असे संस्कृत ग्रंथ शिकविले जात होते. उदाहरणार्थ पुराण वगैरे. स्वामीजीनी ठाम पणे सांगितले आहे कि शिक्षण हे जीवनाचा उद्देश्य नसून तो मार्ग आहे, ज्यामुळे मनुष्य पूर्णत्वाकडे वाटचाल करू शकतो. म्हणून ज्या पुस्तकात या विषयीचे ज्ञान नाही त्यांचा त्याग केला पाहिजे. स्वामीजीच्या काळी इंग्रजाचे भारतात शासन स्थापित झाले होते व त्यामुळे इंग्रजीचे शिक्षण प्रामुख्याने प्रचलित झाले होते. ज्यांचे कडे पैसा होता ते आपल्या मुलाना इंग्रजी शिकवित होते व ज्यांचेकडे रोजचे भोजन कठिण होते त्यांची मुले संस्कृत शाळेत पाठविली जात होती. असा विद्यार्थी जो बळजबरीने या शाळेत आला तो संस्कृत विद्येचे

महत्व काय सांगेल व प्रचार करेल? संस्कृत भाषा जाणून बुजून बदनाम केली जात होती. याचा परीणाम असा झाला की भारतामध्ये वैदिक सभ्यतेचा लोप झाला होता मेकॉलेच्या विचारांचा परिणाम दिसून येत होता. भारताची लौकिक उन्नति लोप पावत चालली होती व भारतीय युवकांमध्ये पाश्चिमात्य संस्कृति बलपूर्वक प्रवेश करत होती व ते हळुहळु दास बनत होते. मानसिक दासता ही शारीरिक दासतेला थोपवू शकत नव्हती.

याच समुल्लासातील विचार सरणीने, आर्य समाजाने गुरूकुल व संस्कृत पाठ शाळेस जन्म दिला, ज्यामध्ये प्राचीन सभ्यतेला पुनः जाग्रत करण्याचा प्रयत्न केला जात आहे. याचा अर्थ असा मुळीच नाही कि महर्षि दयानन्द आधुनिक विद्या, नवीन नवीन अन्वेषण अथवा आधुनिक विज्ञानाच्या विरूध्द होते. त्यांनी सांगितले कि जितके अन्वेषण, वैज्ञानिक शोध प्राचीन काळी आर्यानी लावले ते सर्व आश्चर्यजनक होते. हे आधुनिक अन्वेषणात्मक वैज्ञानिक संशोधन सर्वदा केले पाहिजे असे त्यांचे मत होते. त्याकाळी लोक प्राचीन सभ्यतेस हीन दृष्टिने पाहत होते. स्वामीजीनी या विचारास कलाटणी दिली व हे सिध्द केले कि प्राचीन सभ्यता अशी नव्हती. प्राचीन काळी सुध्दा प्रतिभाशाली व्यक्ती प्रत्येक प्रकारच्या संशोधन कार्यात भाग घेत होती. प्राचीन ग्रंथात वायुयान (विमान), जलयान (जहाज) यांचे वर्णन आढळून येते. पाश्चात्य देशात दोन हजार वर्षापुर्वी लोक अज्ञानी होते पण भारतात पाच हजार वर्षापूर्वी सुध्दा शुध्द वैज्ञानिक होते ज्याचे वर्णन पाहून, इतिहास पाहून, लोक दंग होतात.

गायत्री मंत्र गुरूमन्त्र का आहे, प्राणायामाचे ब्रह्मचर्यात काय महत्व आहे, हवन केल्यामुळे पृथ्वी जल वायु इत्यादिची शुध्दि कशी होते, हवन केल्याने पदार्थ नष्ट न होता त्यांचे परिवर्तन होते हे पदार्थ विज्ञान कसे आहे, यम नियमांचे पालन का करावे, शिक्षकाचे काय कर्तव्य आहे, धर्म व अधर्म कशाला म्हणावे, सत्य व असत्याची परीक्षा कशी करावी, ग्रथांची सत्यासत्याची कसोटि काय आहे, वेद, उपवेद, ब्राह्मण ग्रंथ,

दर्शन शास्त्र, उपनिषद यामध्ये काय लिहले आहे, ऋषि-मुनि-प्रणित आर्य ग्रंथाची ओळख कशी करावी, विद्याभ्यासात कोण कोणते विघ्न येऊ शकतात, वेदांचा अभ्यास करण्यासाठी स्त्री व शुद्राला पूर्ण अधिकार कसा आहे, काय प्राचीन भारतीय स्त्रीया शास्त्रार्थ, शिल्प विद्या, व्यवहार विद्या, युध्द विद्या, व्याकरण विद्या, वैद्यक विद्या, गणित विद्या, वस्त्र-विद्या, वेदादि-शास्त्र-विद्या विभूषित होत्या? या सर्व प्रश्नांचे विस्तृत व प्रमाणासहित विवेचन यात स्वामीजींनी केले आहे. मूळात वाचणे मनोरंजक आहे.

## ४. सत्यार्थ प्रकाश चवथा समुल्लास

या समुल्लासा मध्ये स्वामी दयानन्द सरस्वतींनी गृहस्थ आश्रम व विवाह संस्कार या विषयीची माहीती नमूद केली आहे. अर्थात् विवाह केल्यानंतर पति-पत्नी ने कशा प्रकारे व्यवहार करावा हे सांगितले आहे. ज्या प्रकारे आमच्या माता-पित्यांनी आम्हास जन्म दिला, पालन पोषण केले, विद्या दिली, मोठे केले, त्याच प्रकारे आमच्यावर त्यांचे उपकार व ऋण आहेत कि आम्ही सुध्दा आमच्या मुलांचे पालन-पोषण करावे, हे आमचे कर्तव्य आहे कि ज्यावेळी आमच्यावर वेळ आली, तेंव्हा आम्ही सुध्दा या समाजाला, राष्ट्राला एक संस्कारी राष्ट्रभक्त नागरीक देवू. समाजाचा हाच नियम आहे. संस्कृत शब्द सन्तान याचा अर्थ असा आहे कि ज्याप्रमाणे एखादे वस्त्र उभ्या-आडव्या धाग्यानी विणले जाते, एका धाग्याला दूसऱ्याने जोडून. त्याच प्रकारे आम्ही आमच्या मूलांना जन्म देऊन भूत आणि भविष्य यामध्ये एक कडी जोडतो.

विवाह संस्कार तर प्रत्येक देशात, जाति धर्मात, सम्प्रदायात आढळून येतो. स्वामीजीच्या काळी भारतामध्ये ही प्रथा बऱ्याच प्रमाणात दूषित झाली होती. तीन तीन चार चार वर्षाच्या बालकांचा विवाह होत होता. इतकेच काय गर्भवती महिलांच्या पोटास कुंकु लावून सुध्दा विवाहाची बोलणी केली जात होती. बाळपणी आजारपण ही खूप होत होते व मृत्यु सुध्दा व्हायचे. जेव्हां मुलांचा मृत्यु व्हायचा तेव्हां लहान लहान बालिका विधवा व्हायच्या व नियम असा केला होता कि

विधवांचा पुनः विवाह होत नव्हता. यामुळे बालविवाह प्रथेमुळे बाल विधवा महिलांची संख्या कोटयावधी मध्ये पोचली होती. याचा परिणाम अतिशय वाईट झाला होता. त्यांचे सारे आयुष्यच संकटात होते. या साऱ्यांचा प्रभाव समाजावर पडत होता. स्वामीजींनी वेद आणि शास्त्रांचे प्रमाण देऊन हे सिध्द केले की बाल विवाह एकदम बन्द करावेत. हे पाप आहे, महापाप आहे. त्याकाळी हिन्दुंची अशी धारणा होती की जे आईवडिल आपल्या मुलीचा १२-१२ वर्ष होई पर्यन्त विवाह करणार नाहीत ते महापापी होत. स्वामीजींनी बाल विवाह प्रथेचा तीव्र विरोध केला. त्यांनी सांगितले कि २५ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलाचा व १६ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलीचा विवाह होता कामा नये. त्यांनी कांही अटी सहित विधवा विवाहास मान्यता दिली. (आता बहुतेक सर्व राष्टांनी यास कायदेशीर मान्यता दिली आहे.)

याशिवाय स्वामीजींनी असे सांगितले कि लहान मुलांची नावे कशा प्रकारे असावीत, भारतात जेव्हा स्वयंवर पध्दत प्रचलीत होती तेव्हां भारत देशाची उन्नति कशा प्रकारे होत होती, वर्ण व्यवस्था गुण कर्मानुसार कशी प्रचलीत होती, काय पुत्राने पित्याच्या प्रत्येक आज्ञेचे पालन करावे, पत्नीला धर्म-पत्नी का म्हणतात, काय पत्नीने पतिची प्रत्येक आज्ञा पाळावी, गुण-कर्म-स्वभाव पारखून विवाह का करावा, ईश्वरोपासना केंव्हा, कशी व का करावी, श्राध्द व तर्पण याचा वास्तविक अर्थ काय आहे, मूर्ख आणि विद्वान यांच्यातील भेद काय आहे, बहुविवाह करणे काय योग्य आहे, पुनर्विवाहात काय दोष आहेत, नियोग व्यवस्था म्हणजे काय, काय एक राजा बहुविवाह करू शकतो, गृहस्थाश्रमावर इतर तीनही आश्रम आश्रित कसे काय आहेत, उत्तम गृहस्थ राष्ट्राच्या उन्नतिसाठी काय भूमिका पार पाडू शकतो, घरात नोकर कसे ठेवावेत या सर्व प्रश्नांच्या उत्तरासाठी चवथा समुल्लास जरूर वाचवा.

या शिवाय या समुल्लासा मध्ये पंचमहायज्ञ करणे हे गृहस्थाचे कर्तव्य आहे असे सांगितले. ऋषियज्ञ, देवयज्ञ, भूतयज्ञ, नृयज्ञ व पितृयज्ञ सर्वदा करणे आवश्यक आहे. स्वाध्याय करणे ऋषियज्ञ, यथाविधि होम

करून देवपूजा करावी, श्राध्दाद्वारे पितादिंचे पूजन करावे, अन्नादिद्वारे मनुष्याचा व बलिकर्माद्वारे भूतांचा-प्राण्यांच्या सत्कार करावा. पितृयज्ञ हा केवळ जीवित मातापित्या साठीच आहे, मृत माता-पित्यासाठी नव्हे. ब्रह्मयज्ञ केल्याने विद्या, शिक्षण, धर्म, सभ्यता इत्यादि गुणांची वृध्दि होते. अग्नि होम केल्याने वायु वृष्टि, जल यांची शुध्दि होऊन वृष्टिद्वारे सर्वांचे कल्याण होते. शुध्द वायु, शुध्द खान-पान, आरोग्य, बुध्दि बल पराक्रम प्राप्त होऊन धर्म-अर्थ-काममोक्षाचे अनुष्ठान पूर्ण होते. माता-पिता आणि ज्ञानी महात्मा यांची सेवा केल्याने ज्ञानात वृध्दि होते. सत्यासत्याचा निर्णय होतो. अतिथि यज्ञामुळे, जगात उत्तम अतिथि जो पर्यंत होत नाहीत तो पर्यन्त उन्नति सुध्दा होणार नाही. अतिथि गृहस्थाकडे येतील तर ते सत्योपदेश करतील.

## ५. सत्यार्थ प्रकाश पाचवा समुल्लास

या समुल्लासा मध्ये स्वामी दयानन्द सरस्वतींनी मानवी जीवनाच्या चार आश्रमा पैकी शेवटच्या दोन आश्रमातील कर्तव्याचे वर्णन केले आहे. मानवी जीवनाच्या चार विभागाचे, आश्रमाचे वर्णन यापुर्वी केले आहे.

१. ब्रह्मचर्य आश्रम

२. गृहस्थ आश्रम

३. वानप्रस्थ आश्रम

४. संन्यास आश्रम

साधारण पणे मानवाचे आयुष्य १०० वर्षे गृहित धरले असून चार समान भाग कल्पिले आहेत.

अशाप्रकारे प्रथम २५ वर्षे ब्रह्मचर्य आश्रमाची आहेत. यात प्रमुख कर्तव्य विद्यार्जनाचे आहे. पूढील २५ वर्षे गृहस्था श्रमाची असतील म्हणून आपण पाहिले कि २५ वर्षा पूर्वी पुरूषाने विवाह करता कामा नये. तसेच ५० व्या वर्षानंतर वानप्रस्थ आश्रम तर ७५ व्या वर्षानंतर संन्यासी होणे आवश्यक कर्तव्य समजले जाते. या पध्दतीने जीवन व्यापन

करणे सर्वोच्च मानले गेले आहे. यातच लौकिक व पारलौकिक जीवनाचे कल्याण आहे.

मनुष्य या जगातील मोह-माया मध्ये मग्न झालेला दिसून येतो. जर ही मोह-माया नसती तर काय झाले असते? सांसारिक उन्नति झाली नसती. विवाह कोण केला असता? कोण त्याचे पालन केले असते? कोण कृषि-व्यापार केला असता? अशा प्रकारे सर्व सांसारिक काम नष्ट झाले असते. आणि जर या मोह मायेतच मनुष्य पूर्णपणे बुडाला तर त्याचे पारलौकिक कल्याण कसे झाले असते? यासाठी त्यागाची आवश्यकता आहे. या त्यागाचे कर्तव्य वानप्रस्थ आणि संन्यास आश्रमात पूर्ण केले जाते. जगाचा व्यापार ठिक प्रकारे चालण्यासाठी आम्हास भोग व त्यागाची आवश्यक्ता आहे. अर्थात् या जगाशी संबंध तर ठेवायलाच हवा परन्तु याचा अर्थ यातच आकंठ बुडावयास नको. हे जीवन एक मार्ग आहे. या मार्गावर चलावे लागते, इथे थांबता येत नाही. रस्त्यावर आम्ही स्वतंत्रपणे चालू शकतो पण इथे थांबता येत नाही. थांबले तर पोलिस हाकलून देतील हाच प्रकार आमच्या जीवनाचा आहे. ही त्यागाची भावना आमच्या डोक्यात सतत राहिली पाहिजे, ज्यामुळे मृत्यु समयी हे जग सोडताना कष्ट होणार नाहीत. वानप्रस्थ आश्रमात प्रवेश केल्यावर मनुष्य आपले घर-दार सोडतो. त्याचे पारिवारिक कष्ट समाप्त होतात. तो आपले घर आपल्या मुलावर सोपवतो तो हे संबंध इतके कमी करतो कि, मृत्यु समयीचा शोक नाहीसा होतो.

संन्यास आश्रम सर्वात शेवटचा आहे. संन्यास आश्रमातील कर्तव्य सुध्दा जटिल आहेत. म्हणून संन्यास घेण्यापुर्वी कठिण परीक्षे सारखी तयारी करावी लागते. या आश्रमाविषयी समाजात काही गैरसमज आहेत. कांही लोकांचे असे म्हणणे आहे कि ५० वर्षे वयानंतर वानप्रस्थ स्वीकारलाच पाहिजे व त्यानंतर संन्यास सुध्दा. जरी यासाठी आयुष्याची सर्वसाधारण पणे सीमा रेषा निश्चित करण्यात आली आहे, तरी पण हे स्वीकारणे अनिवार्य नाही. आश्रम बदलण्यापूर्वी आम्हास स्वतःस बदलणे आवश्यक आहे. जर ५० वर्षे वयानंतरही आयुष्यात वैराग्य उत्पन्न

झाले नाही तर बळजबरीने संन्यास घेण्यामुळे कांहीच लाभ होणार नाही. आश्रम व्यवस्था शाळेच्या वर्गाप्रमाणे आहे. एका वर्गात उत्तीर्ण झाल्यावर पूढील वर्गात प्रवेश मिळतो. जो पर्यंत पूढील वर्गातील अभ्यासाचा भार उचलण्यास विद्यार्थी सक्षम होणार नाही तो पर्यंत त्यास पूढील वर्गात प्रवेश मिळणार नाही. अशाच प्रकारे जो व्यक्ति गृहस्थाश्रमाचे योग्य प्रकारे पालन करू शकला नाही तो मग वानप्रस्थाश्रमाचे पालन कसे करेल?

इथे असा प्रश्न उत्पन्न होऊ शकतो कि गृहस्थाश्रम हा भोग प्राप्त करण्याचा आश्रम आहे आणि वानप्रस्थ आश्रम हा त्याग करण्याचा. मग गृहस्थाश्रमात वानप्रस्थ आश्रमाची तयारी कशी होऊ शकेल?

याचा अर्थ प्रश्न कर्त्याला गृहस्थाश्रमाच्या कर्तव्याचे ठिक प्रकारे ज्ञान नाही. गृहस्थ आश्रम भोगाश्रम नाही. उलट अतिशय त्यागाचा आश्रम आहे व कांही अंशाने त्याला वानप्रस्थ आणि संन्यास आश्रमातील व्यक्ति पेक्षाही अधिक त्याग करावा लागतो. वानप्रस्थी आणि संन्यासी आपल्या व्यक्तिगत सुखाचा विचार करतात, तर एका छोट्या रोजंदारी वरील मजूराला सुध्दा आपल्या मुला-बाळांच्या पालन पोषणाचा विचार करावा लागतो. ज्यावेळी मनुष्य विवाह करण्याचे निश्चित करतो त्याचवेळी तो आपल्या पत्नीचा सम्पूर्ण भार स्वतःच्या खांद्यावर घेतो. तो जे कांही कमावतो त्याचा उपभोग एकटाच करत नाही. त्यात त्याच्या पत्नीचा अर्धा वाटा असतो. जेव्हां मूलं होतात तेव्हा कमाईचा अधिक भाग मूलांच्या पालन-पोषणासाठी खर्च होतो. पत्नीची सुध्दा आपल्या पति प्रमाणे आपल्या मुलासाठी वाट्टेल तो त्याग करावयाची तयारी असते. आईच्या त्यागापेक्षा कोणाचाही त्याग मोठा असू शकत नाही. माता मूलांसाठी प्रसंगी स्वतः उपाशी राहू शकते. उच्च परिवारातील महिला साऱ्या परिवारातील सदस्यांना भोजन दिल्यानंतरच स्वतः भोजन करते. अशाप्रकारे त्यागाचा धडा सर्वांसाठी घालून देते. आणि वानप्रस्थ आश्रमात याच भावनेला दृढ केले जाते-या जगात राहवयाचेही आहे आणि याला सोडावयाचेही आहे म्हणून लोभात, मोहात, भोगात सुध्दा

त्यागाची भावना असली पाहिजे.

संन्यास आश्रमात त्यानेच प्रवेश केला पाहिजे जो साऱ्या विश्वाला स्वतःचा समजतो. सारा संसाराच त्याचा परिवार असतो. तो स्वतःसाठी कमवत नाही, आपल्या घरातील सदस्यासाठी कमवत नाही, त्याला प्रत्येक व्यक्ति विषयी तितकेच प्रेम असते, म्हणून संन्यासी व्यक्तिचे पद सर्वात कठिण असते, तसेच सर्वोत्तम असते. ते आत्मसात करण्यास अत्यंत कठिण असल्यामुळे संन्यासाश्रमात सर्वांना प्रवेश करण्याची आज्ञा नाही. संन्यासी कोण आहे हे एका कविने आपल्या कवितेत मोजक्या शब्दात सांगितले आहे. जसे

**''है संन्यासी क्या गम मे औरों के गलना ।**
**पराई चिता पर पडे आप जलना ।।**
**कदम तेग की धार पर धरके चलना ।**
**न हरगीज झिझकना न हरगीज मचलना ।।**
**इधर तोडना बन्द सब खानमां के ।**
**उधर बाप बन जाना सारे जहाँ के ।।**
**किया जिसने संन्यास का रूतबा आला ।**
**दयानंद स्वामी तिरा बोलबाला ।।''**

स्वामीजीनी सत्यार्थ प्रकाश मध्ये लिहले आहे कि जसे प्रथम तीन आश्रम साधारण जनतेसाठी आहेत, तसे संन्यास आश्रमाचे नसून तो आश्रम केवळ ब्राह्मणसाठीच आहे. (ब्राह्मण गुणकर्म स्वभावानुसार) 'ब्राम्हण' चा अर्थ आहे विद्वान् व आचारवान्. ज्याचे स्वतःचे आचरण ठिक नाही त्याला संन्यासी होण्याचा काय अधिकार आहे? संन्यास आश्रमाची परीक्षा कठीण असल्यामुळे समाजात यांची संख्या सुध्दा न्यून (कमीत कमी) असली पाहिजे हे आपण पूढील उदाहरणाने समजून घेऊ.

शाळे मध्ये विद्यार्थ्यांची संख्या जास्त असते, परन्तु शिक्षकांची संख्या फार कमी असते. त्याच प्रमाणे संन्यासी सुध्दा न्युनच असले पाहिजेत. जर शिक्षकाची संख्या अधिक झाली व विद्यार्थ्यांची संख्या

कमी झाली तर शाळा कशी चालेल? म्हणूज साधु संन्यास्यामध्ये सुध्दा त्याग भावना कमी होते. अज्ञानात वाढ होते. लोक आळशी बनतात म्हणून संन्यांस्यांची संख्या कमीच असली पाहिजे व गृहस्थी लोकांचे कर्तव्य आहे कि संन्यासींची सेवा करून त्यांच्या आवश्यकतेची पूर्तता करावी. हे त्यांची संख्या कमी असल्यावरच शक्य होईल. जर अशा संन्याशांची टोळीच्या टोळी भीक्षा मागत फिरत राहिली तर गृहस्थी जन कुठपर्यन्त त्याग करतील? आज काल व म. दयानन्दाच्या काळी सुध्दा संन्याशाच्या समुहात असे लोक मिसळतात जे कायद्याच्या भितीने पळून जाऊन स्वतःला लपवू इच्छितात. यात फसवे साधु खूपच आढळून येतात. स्वामी दयानन्दानी या समुल्लासातच नव्हे तर ११ व्या समुल्लासात सुध्दा यांना सुधारण्यासाठी उपदेश केला आहे.

या बरोबरच आपणास पूढील प्रश्नांची उत्तरे या समुल्लासात मिळतील. काय संन्यासी अग्नि आणि धातुला स्पर्श करीत नाहीत? भिक्षा मागण्याचा अधिकार कोणास आहे? संन्यास्याने नेहमी भ्रमणशील का राहणे आवश्यक आहे? प्राचीन राजे विद्वान् संन्याशाला बोलावून त्यांचा सत्कार व सन्मान का करीत होते? शेंडी व यज्ञोपवीत कशाचे प्रतिक आहे? काय भगवे वस्त्र धारण करणारे सारे संन्यासी असतात? जीव एकदेशी, अल्पज्ञ आणि ब्रह्म सर्व व्यापक, सर्वज्ञ कशाप्रकारे आहे? काय ब्रह्म सुध्दा कधी जन्म मरणाच्या चक्रात सापडतो? महर्षि दयानन्दाच्या शब्दात आपण संन्याशाचे कर्तव्य काय हे पाहू. दयानन्द लिहतात संन्याशाने सत्योपदेश, शंका समाधान वेदादि सत्य शास्त्रांचे अध्ययन आणि वेदोक्त धर्माचा प्रसार प्रयत्न पूर्वक करून जगाची उन्नति करावी. जे स्वतः धर्माचे आचरण करतात, जगातील सर्वांना धर्मानुसार चालण्यास सांगतात तेच धर्मात्माजन संन्यासी व महात्मा होत.

## ६. सत्यार्थ प्रकाश सहावा समुल्लास

या समुल्लास मध्ये स्वामी दयानन्द सरस्वतींनी राजा आणि प्रजा यांच्या संबंधाचे विवेचन केले आहे. जगात कोणताही समाज राजा शिवाय राहू शकत नाही, परन्तु राजा अनेक प्रकारचे असतात. कधी-

कधी ज्यांच्या तलवारीत ताकद, शक्ति असेल तोच राजा असायचा. आणि जो पर्यन्त त्यांच्या मध्ये अथवा त्याच्या परिवारा मध्ये शक्ति असते तो पर्यन्त तोच राजा होतो. कुठे-कुठे प्रजा राजाची निवड करते. स्वामी दयानन्द निरंकुश राज सत्तेच्या विरूध्द होते. अर्थात् त्यांना हे मुळीच मान्य नव्हते कि राजा स्वतः त्याच्या नियमांचे पालन करत नाही. ना तर राजा इतका निर्बळ असावा कि कोणीही त्याची आज्ञा पालन करत नाही, आणि ना तर इतका बलवान् असावा कि सगळीकडे अधर्माचे शासन होईल व देशात कोणीही त्याच्या वाईट कर्माचा निषेध सुध्दा करू शकणार नाही. स्वामीजींना हे अभिप्रेत आहे कि राजा प्रजेच्या आधीन असावा व प्रजा राजाच्या आधीन असावी व दोघेही राजनियमाच्या आधीन असावेत. प्रत्येक देशात तीन सभा असणे आवश्यक आहे.

१) विद्यार्य सभा

२) धर्मार्य सभा

३) राज्यार्य सभा.

देशान्तर्गत शिक्षणाची व्यवस्था करणे हे विद्यार्य सभेचे कर्तव्य आहे. प्रत्येक व्यक्तिचे धार्मिक कर्तव्य कोणते आहेत व त्यांचे अधिकार काय असावेत याचा निर्णय करण्याचे कार्य धर्मार्य सभेचे असेल. तसेच धार्मिक समस्यांवर निर्णय घेऊन त्याचे निवारण करणे या सभेचे कार्य असेल. राष्ट्रा विषयी देशान्तर्गत व बाह्य समस्यावर विचार विनिमय करून समस्यांचे निवारण करणे हे राज्यार्य सभेचे कार्य असेल. या तीनही सभांमध्ये शासनाकडून त्या-त्या विभागातील विशेषज्ञांची निवड झाली पाहिजे, ज्यामुळे कुठेहि व कोणत्याही प्रकारची उणीव राहता कामा नये. या जगात वेगवेगळ्या प्रकारच्या शासन-प्रणाली अस्तित्वात आहे जगात लोकशाहीच्या बाबतीत इग्लंड, अमेरिका व फ्रान्स ही राष्ट्रे अग्रगण्य मानली जातात. इग्लंडचा राजा (किंवा राणी) राज्य करतो, पण सत्ता चालवत नाही, अमेरीकेचा अध्यक्ष सत्ता चालवितो पण राज्य करत नाही, आणि फ्रान्सचा अध्यक्ष राज्यही करीत नाही व सत्ताही चालवित नाही. याचा अर्थ कुठे राजाचे अधिकार मर्यादित होतात तर कुठे राजा

ही कल्पनाच नाही. केवळ राज्य सभा (नियुक्त अथवा निर्वाचित) राष्ट्र नियमनाचे कार्य करते. तर कुठे राजाही नाही व सभा सुध्दा नाही केवळ निरंकुश–सत्ता–वाद आहे. स्वामी दयानन्दानी या पैकी कोणाचाही पक्ष स्वीकारला नाही. स्वीकारू सुध्दा शकत नव्हते कारण त्यांची मान्यता होती कि याचा निर्णय प्रजेच्या शक्ति वर अवलंबून आहे. जितकी प्रजा अधिक शिक्षित असेल, तितकीच प्रजेची शक्ति मर्यादित असेल कारण असे कि प्रजा आपले अधिकार आणि कर्तव्य समजते आणि याचे पालन अशा प्रकारे करते कि समाजाचे प्रभुत्व व संचालन नष्ट होणार नाही. जिथे प्रजा एकदम अशिक्षित आहे अथवा जवळपास अशिक्षित आहे, तिथे राजाचे अधिकार अधिक होत जातात व राजा आपल्या मनाप्रमाणे जे पाहिजे ते करतो व जे पाहिजे ते करवितो.

हे आपणास पूढील उदाहरणावरून स्पष्ट होईल. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी (बालक) जवळपास अशिक्षित असतात. त्यांना शिस्तीत ठेवण्यासाठी जे कांही उपाय केले जातात ते त्यांच्या प्रत्येक कार्यात बाधक असतात. उलट महाविद्यालयातील विद्यार्थी अधिक शिक्षित असतात, म्हणून त्यांना अधिक स्वतंत्रता दिली जाते. जरी स्वामीजीनी सांगितले की राजा आणि प्रजा यांचे अधिकार मर्यादित असावेत, तरी सुध्दा अधिकाराचा कर्तव्याशी घनिष्ट संबंध आहे. कर्तव्याला योग्य रीतिने समजून त्याचे पालन करणे यासाठी ज्ञान असणे आवश्यक आहे. कांही वेळानंतर कर्तव्याची जाण प्रजेला होत असते. इंग्लंड किंवा अमेरिकेस आजची स्थिति प्राप्त होण्यासाठी गेल्या ४०० वर्षापासून चाललेले आन्दोलन व यामुळे आलेली चेतना एका दिवसात प्राप्त झालेली नाही. अशाच प्रकारे भारताला जी स्वतंत्रता गेल्या कित्येक वर्षापासून करण्यात येणाऱ्या सततच्या प्रयत्नाद्वारे प्राप्त झालेली आहे. आज याचा लाभ मिळतो आहे त्यासाठी आम्हास अनेक अग्नि परीक्षेतून पार पडावे लागले आहे. आणि यासाठी समाजाला धैर्यपूर्वक सतत तयार असायला पाहिजे.

या शिवाय म. दयानन्दानी कांही महत्त्वपूर्ण असे तत्वज्ञान सांगितले

आहे. जो पर्यंन्त मनुष्य (राज्य-संचालक राजादि) धार्मिक असतील तो पर्यन्त राज्य उन्नतिकडे वाटचाल करते आणि जेव्हा दुष्टाचारी, अत्याचारी होतात तेव्हां सारे राष्ट्र नष्ट-भ्रष्ट होऊन जाते. राजा, प्रजा यांच्या संबंधाविषयी म्हणतात ''हे उचित आहे कि राजांचा राजा किसान (शेतकरी) वगैरे परिश्रम करणारे आहेत.'' म. दयानन्दांपूर्वी शेतकऱ्यांना तुच्छ समजले जात होते. स्वामीजीनीं परिश्रम करणाऱ्या शेतकऱ्याला सर्वोच्च स्थान दिले. 'राजाचा राजा' हीच स्वामीजींची ऋषि दृष्टि होय. हे मौलिक विचार आहेत. अभूतपूर्व समज आहे. स्वामीजी आणखी एक मार्मिक बाब सांगतात. राजाने कसे वागावे? राजा आणि राजपुरूषांनी हे लक्षात ठेवले पाहिजे कि कधीही दुष्टाचार-अत्याचार करता कामा नये. सर्वकाळ धर्म न्यायाने वागून सर्वांच्या उन्नति साठी स्वतःच्या आचरणाने एक आदर्श दृष्टान्त जनते समोर ठेवावा कारण हे कि धार्मिक राजाचे अनुकरण प्रजा त्वरीत करते.

या शिवाय अनेक लहान मोठ्या निती नियमावर स्वामीजीनी सत्याचा प्रकाश टाकला आहे. जसे, काय राजव्यवस्थेचा धर्माशी संबंध आहे, अनियंत्रित राजा राष्ट्राची हानि कशी करू शकतो, देशात विद्या, बळ आणि धन सम्पत्तिची वाढ कशी केली जाऊ शकते, न्यायाधीश आणि सभापति कसे असावेत, निवडून आलेली व्यक्ति राष्टाच्या उच्च पदावर विराजमान् होऊन प्रजेवर कसा अन्याय करू शकते, नियुक्ति व निवड यात काय भेद आहे,लाखो मूर्ख लोकांच्या मतापेक्षा एक सर्वहितकारी वैदिक विद्वानाचे मत का ग्राह्य ठरते, राजदूतांची निवड कशी करावी, काय राजाने साम, दाम, दण्ड, भेद या नितिचा अवलंब करावा, राज्य गुप्तचर विभागाने कशाप्रकारे कार्य करावे, काय भ्रष्ट शासकिय कर्मचाऱ्यांना क्षमा करावी, कोण कोणत्या वस्तुवर राजाने कर लावावा, कर किती प्रमाणात असावा, मंत्री मंडळ आठ एक मंत्र्याचे असणे हितकर आहे किंवा नाही, यथायोग्य व्यवहार म्हणजे काय, राजाने जल, स्थळ व वायुसेना ची निवड कशी करावी, वरून मित्र व आतून शत्रुला कसे ओळखावे, सेना उत्साहित व हर्षित कशी राहिल याकडे

लक्ष देणे आवश्यक आहे काय, पराजित शत्रुशी व्यवहार कसा असावा, राजाने कमीत कमी कोणत्या शास्त्राचा अभ्यास केला पाहिजे, साधारण मनुष्याच्या तुलनेत राजा अथवा शसकीय अधिकारी यांना हजार पटीने जास्त दण्ड का द्यावा? इत्यादि या सर्व प्रश्नांच्या उत्तरासाठी सहावा समुल्लास अवश्य वाचावा.

## ७. सत्यार्थ प्रकाश सातवा समुल्लास

या समुल्लासात स्वामी दयानन्द सरस्वतींनी ईश्वर आणि त्याच्या गुणांचे वर्णन केले आहे. असा कोणताही धर्म नाही कि ज्याचा आधार ईश्वर नाही. जैन आणि बौध्द धर्म यांच्या ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास नाही, तरी सुध्दा ते पूजा करण्याच्या कर्मकाण्डावर विश्वास ठेवतात. सर्व धर्म ईश्वराच्या अस्तित्वास मान्य करतात पण ते त्याच्या गुणाविषयी एक मत नाहीत, त्यांच्या मध्ये मतभिन्नता आहे. गुणाचा संबंध 'गुणी' बरोबर असतो. मनुष्यांना या गुणीशी कांहीही देणे घेणे नाही, त्याच्या गुणाशीच त्याचा संबंध असतो. म्हणून आम्ही ईश्वरावर श्रध्दा ठेवून सुध्दा जर त्याच्या गुणा विषयी आमचे एकमत नसेल तर धार्मिक मतभेद होणारच.

ईश्वरा विषयीच्या संबंधाने सर्वात मुख्य गोष्ट ही आहे कि देव, देवता म्हणजे कोण? देवतांचा हिन्दुंच्या मनावर खोलवर प्रभाव पडलेला आहे. देवता व ईश्वर यांच्याविषयी आमच्या मध्ये अनेक गैरसमज आहेत व बहुतांशी देवता म्हणजेच परमेश्वर अशी आमची धारणा झालेली आहे म्हणून अनेक ईश्वरांची कल्पना झालेली दिसते. हिन्दू देव देवतावर विश्वास ही ठेवतात व त्यांची त्यांना भीति ही असते, कि आमच्या हातून कांही विपरीत घडू नये म्हणून स्वामी दयानन्दांनी या ठिकाणी सचेत केले आहे कि देवी देवता ३३ कोटि नसून ३३ प्रकारचे आहेत, व ते पूढील प्रमाणे आहेत.

***प्रश्न : वेदा मध्ये जो अनेक देवतांचा उल्लेख आहे त्याचा अर्थ काय आहे?***

**उत्तर : देव–देवता दिव्य गुणांनी युक्त असल्यामुळे त्यांना देव–देवता म्हणतात. उदाहरणार्थ पृथ्वी, सूर्य इत्यादि. परन्तु यांना वेदामध्ये कुठेहि**

**उपासनिय मानले नाही. स्वामीजींनी ३३ कोटी देवतांचा स्वीकार केला आहे व त्यांची नावे ही सांगितली आहेत त्यांची नावे अशी आहेत ...**

**१) आठ वसु :– पृथ्वी, जल, अग्नि, वायु, आकाश, चंद्रमा, सूर्य, नक्षत्र**

**२) आकरा रूद्र :– प्राण, अपान, व्यान, उदान, समान, नाग, कूर्म, कृकल, देवदत्त, धनन्जय आणि जीवात्मा**

**३) संवत्सराचे बारा महिने :– बारा आदित्य**

**४) एक इंद्र**

**५) एक प्रजापति**

**= ८+११+१२+१+१ = ३३.**

स्वामी दयानन्द सरस्वती ईश्वरास निराकार मानतात. या विषयी अन्य सर्व मताशी त्यांचे मतभेद असल्याचे दिसून येते. यात स्वामिजींनी स्पष्टपणे प्रतिपादन केले आहे कि जर ईश्वरास साकार मानले तर अनेक कठिण प्रसंगाला व प्रश्नाला सामोरे जावे लागेल, ज्यांचे समाधान होणे कठिण होईल. साकार ईश्वरामध्ये निराकार ईश्वराचे गुण येऊ शकत नाहीत. ईश्वरास निराकार मानून सर्वव्यापक सुध्दा मानले जाऊ शकते. जर ईश्वरास साकार मानले तर तो एकदेशी (ठराविक जागेतच उपस्थित) होईल, जसे इस्लाम, ईसाई अथवा पौराणिक हिन्दूंची मान्यता आहे. जर तो एकदेशी झाला तर या अनन्त सृष्टिची निर्मिति कशी करू शकेल? जर दूसऱ्यांची मदत घेईलतर तो ईश्वर असहाय होईल व परस्वाधीन होईल.

म. दयानन्दाच्या काळी व आजसुध्दा हिन्दु समाजात अवतारवादाचे अतिशय महत्व होते व आहे, प्रस्थ आहे. पौराणिक मत मान्य असणारे ईश्वराचा अवतार होतो अथवा ईश्वर अवतार घेतो असे मानतात. स्वामीजींनी या समुल्लासात स्पष्टपणे व तर्कपूर्ण विचार सरणीने तसेच वेदातील प्रमाण देवून सिध्द केले आहे कि अवतार मान्य केल्यामुळे ईश्वराच्या गुणांमध्ये कमतरता येते. जीव जन्म घेतो, शरीरधारण केल्या मुळे बन्धन स्वीकारावे लागते, कष्ट, दुःख सहन करावे लागते, भोग स्वीकारावे लागतात. ईश्वराने शुध्दा शरीर धारण केले तर त्याला सुध्दा

जन्म-मृत्युच्या चक्रात अडकावे लागेल. तरी सुध्दा ईश्वरास अवतार घ्यावयाची गरजच काय आहे? पुराण ग्रंथामध्ये असे वर्णन आढळते कि अमूक एका कार्य-सिध्दिसाठी ईश्वराला अवतार घेणे भाग पडले. श्रीरामाने अवतार घेतला कारण का तर रावणाच्या अत्याचारापासून सृष्टिचे रक्षण करण्यासाठी. याच प्रकारे कंसाचा वध करण्यासाठी श्रीकृष्णाने जन्म घेतला. स्वामीजीनी या समुल्लासात सक्षमपणे सिध्द केले आहे कि रावण, कंस, हिरण्यकश्यप इत्यांदिंना परमेश्वरानेच जन्म प्रदान केला होता तर तो त्यांच्या पेक्षा अधिक शक्तिशाली असला पाहिजे, तसेच तो त्यांच्या शरीरात पण व्यापक आहे, आणि त्यामुळेच त्यांना केव्हांही व क्षणार्धात मारू शकतो. म्हणून त्याला अवतार घेण्याची आवश्यकताच काय असू शकते? अशा प्रकारे ईश्वराच्या गुण-कर्म-स्वभावाविषयी अनेक प्रश्न निर्माण होतात, अनेक शंका उपस्थित होतात. समाज या शंकांच्या समाधानासाठी सतत प्रयत्नशील राहिला आहे. इतिहासाची अनेक पाने याची साक्ष देतात. एका विचार धाराच्या लोकांनी विरूध्द विचारधारांच्या लोकांचे यासाठी रक्त सांडले.

मतभेद भांडणे विशेष करून ईश्वराच्या धर्माच्या नावाने का होतात? आम्ही सर्वजण देव-देव तर करत होतो पण ईश्वरीय मान्यते विषयी कधीही आम्हामध्ये एक वाक्यता आली नाही. उदाहरणार्थ ईश्वर साकार आहे का निराकार? ईश्वर सर्व शक्तिमान् आहे अथवा नाही? ईश्वर सर्व व्यापक आहे अथवा एका जागीच राहतो? काय ईश्वर निराकार असून सुध्दा साकार होऊ शकतो? त्याच्यामध्ये विकार उत्पन्न होऊ शकतो काय? का तो निर्विकार आहे? ईश्वर दयाळु आहे का न्यायकारी, का दोन्हीही? अशा प्रकारच्या सर्व शंकांचे प्रश्नांचे या समुल्लासात म. दयानन्दांनी सतर्क समाधान केले आहे. स्वामीजींनी वेद मंत्राद्वारे हे सिध्द केले आहे कि, ईश्वर निराकार, निर्विकार, अजन्मा, अजर, अमर, अनादि, अनन्त, अनुपम आणि दयाळु आहे आणि केवळ त्याचीच पूजा केली पाहिजे.

या समुल्लासात स्वामीजींनी आणखी एका महत्त्वपूर्ण प्रश्नावर

प्रकाश टाकला आहे. वैदिक धर्म आणि वैदिक संस्कृति वेदावर आधारित आहे. मग वेद काय आहेत? वेदांचे प्रकाशन केव्हा झाले? वेदांचे ज्ञान ईश्वरानेच दिले काय? ईश्वराने प्रकाशित केले नसते तर या जगाचे अकल्याण झाले असते काय? वेद प्रकट झाले तर ते कशाप्रकारे झाले? केंव्हा झाले? काय जेंव्हा जेंव्हा सृष्टिची निर्मिति होते तेंव्हा तेंव्हा त्यांचे प्रकाशन अशाप्रकारेच होईल काय? कोण कोणत्या ऋषिंना वेदांचे ज्ञान प्रथम प्राप्त झाले? केवळ त्याच ऋषिंना वेदांचे ज्ञान का प्राप्त झाले? काय अन्य मनुष्य यासाठी योग्य नव्हते? या सर्व प्रश्नांची समाधान कारक उत्तरे स्वामीजींनी या ठिकाणी दिली आहेत. सर्वांना मान्य होतील, पटतील अशी युक्ति युक्त उत्तरे दिली आहेत, आणि असे प्रतिपादन केले आहे कि वेंदांचे ज्ञान ईश्वरानेसृष्टिच्या प्रारम्भीच दिले नसते तर जीव बिचारे अज्ञानातच बुडालेले राहिले असते, त्यांचे मार्ग दर्शन कोण केले असते, त्यांचे कल्याण कसे झाले असते व त्यांना स्वतःचे कर्तव्य कशा प्रकारे समजले असते? स्वामीजींचे असे ठाम मत आहे कि वेद हे ईश्वरीय ज्ञान असून सृष्टिच्या आरम्भीच जीवाच्या कल्याणासाठीच त्यांचे प्रकाशन करण्यात आले आहे. हीच ईश्वराची महान कृपा आहे.

या संबन्धाने स्वामीजींनी स्पष्ट घोषणा केली आहे कि वेद म्हणजे कोणते ग्रंथ आहेत? पौराणिक व सनातन धर्मामध्ये वेदाविषयी एक दृढ श्रध्दा भाव आहे. परन्तु ते केवळ चार वेदांनाच मानत नव्हते तर त्यांच्या मतानुसार शास्त्र, उपनिषदे, पुराण, रामायण, महाभारत, इत्यादी शेकडो ग्रंथाना सुध्दा वेदच समजत होते आणि या सर्वां विषयी आस्था बाळगणाऱ्यांना वेदानुगामी मानले जात होते. स्वामीजीनी जनमानसातील या भ्रमास दूर केले. त्यांनी असे घोषित केले कि वेद केवळ चारच असून त्यांची नावे आहेत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद असे आहेत.

स्वामी दयानंद या चार वेदांच्या संहितेसच मान्यता देतात व त्यालाच उचित, योग्य व युक्तियुक्त मानतात. जे वेदानुकुल नाहीत, जे या चार वेदांनुसार नाहीत, त्यांना ते त्याज्य व अनुचित मानतात. त्या काळातील वैदिक ज्ञाना विषयी प्रसिध्द असलेल्या काशी नगरीत

स्वामीजीने तिथे जावून काशीच्या विद्वान् पंडितांना आव्हान दिले होते कि, जर मुर्तिपूजा वेदानुसार आहे तर वेदामध्ये या विषयाचे मण्डन करणारे मंत्र असावयास पाहिजेत. मुर्तिपूजेचे समर्थन करणारा एक तरी मंत्र वेदात दाखवा? दयानन्दांची वेदाविषयी अपार श्रध्दा होती. वेदांना डालवून इतर कोणत्याही धर्मांवलम्बी बरोबर मतैक्यता करण्यास ते कदापि तयार नव्हते व झाले नाहीत. केशवचंद्र सेन डॉ. भाण्डारकर अथवा थियोसोफिस्ट कर्नल अलकॉट स्वामीजींच्या सुधारवादी विचारांशी पूर्णतः सहमत होते पण वेदांना ईश्वरीय ज्ञान मानण्यास ते तयार नव्हते. आणि स्वामीजी वेदांना सोडण्यास तयार नव्हते. ही सुध्दा दयानन्दांची एक विशेषता होती.

या शिवाय म. दयानंदाने वेद, ईश्वर, जीवात्मा याविषयीच्या अनेक अंध श्रध्दांचे निराकरण केले आहे. जसे वेदामध्ये एकाच ईश्वराचे प्रतिपादन आहे काय, ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल काय काय प्रमाण आहेत, काय परमेश्वर पाप अपराध क्षमा करतो, ईश्वराला कधी राग क्रोध येतो काय, परमेश्वराची इच्छा काय आहे, परमेश्वराच्या स्तुति, प्रार्थना उपासना याचे फलित काय आहे, काय परमेश्वर निष्क्रिय आहे, जीव स्वतंत्र आहे अथवा परतंत्र, काय परमेश्वरास त्रिकालदर्शी मानने योग्य आहे, जीवात्मा व परमात्मा यांचा संबन्ध कशा प्रकारचा आहे, काय ईश्वर आत्म्याचा निर्माता आहे, काय वेद ईश्वरकृत आहेत, जर होय तर मग ते ईश्वरकृत होण्याचे प्रमाण काय? कसोटि काय, काय वेदामध्ये मनुष्याचा इतिहास आहे, वेदातील ऋषि, देवता, छन्द, स्वर इत्यादिंचा काय अभिप्राय आहे, काय वेद या जगातील प्राचीनतम पुस्तक आहेत, काय वेद सर्व मानवासाठी व त्याच्या कल्याणास्तव बनविले आहेत, काय स्त्री शूद्रांना सुध्दा वेदाभ्यास करण्याचा अधिकार आहे, या सर्व प्रश्नांची उत्तरे अधिकांशरीत्या वेदांच्या अंतःसाक्षीद्वारेच म. दयानंद यात देतात. त्यांच्या मार्मिक शब्द सामर्थ्यासाठी सत्यार्थप्रकाश मुळातच वाचणे आनन्ददायक आहे.

## ८. सत्यार्थ प्रकाश आठवा समुल्लास

या समुल्लासात महर्षि दयानन्द सरस्वतींनी एका विशेष प्रश्नाचे

समाधान केले आहे, ज्याचा पुष्कळशा धर्मामध्ये उल्लेख सुध्दा सापडत नाही. अर्थात् त्या धर्मात असा प्रश्न विचारणे सुध्दा अपराध समजला जातो. प्रश्न हा आहे कि काय एकमेव ईश्वराचेच अस्तित्व आहे अथवा याच्या शिवाय दूसऱ्याचे सुध्दा अस्तित्व आहे? हा प्रश्न तसा खूपच जटिल आहे. जर आपण क्षणभर असे म्हटले कि वास्तविक ईश्वरा शिवाय इतर कोणाचेच अस्तित्व नाही, तर मग आम्हाला आमच्या अनुभवाने जे इतर पदार्थ या जगात दिसतात त्यांना काय म्हणावे? ज्यांचे आपल्या जीवनात आम्ही विशेष महत्त्व देतो, आणि ज्यांच्या शिवाय आमचे जीवनच नष्ट प्राय होईल. उदाहरणार्थ काय माझे स्वतःचे अस्तित्व अवास्तविक आहे? आणि जर आमचे अस्तित्वच अवास्तविक असेल तर मग धर्माची तरी काय आवश्यकता आहे? एक ईश्वर असेल व त्याच्याशिवाय या जगात कोणीच नसेल तर, किंवा केवळ काल्पनिक असेल तर या जीवनाची समस्या कांही सुटत नाही. केवळ ईश्वराचेच अस्तीत्व मानले तर जगाचा व्यवहाराच बन्द होतो. जर ईश्वर अनादि आणि अनन्त आहे, इतर पदार्थ मग केवळ ईश्वरापासूनच उत्पन्न झाले असतील अथवा मग अभावातून निर्माण झाले असतील असे मानावे लागते.

ही सृष्टि काय आहे? चंद्र काय आहे? वायु काय आहे? जल काय आहे? काय हे सर्व अभावातून निर्माण झाले? अभावातून भाव निर्माण होण्याची कल्पना मानवी बुध्दिला ग्राह्य होत नाही. काय कोणी असा विचार करू कशेल कि बीजाशिवाय वृक्ष निर्माण होईल? वृक्ष नसतांना फळ व फुल निर्माण होतील? पीठा शिवाय भाकरी होऊ शकेल? जर असे होणे शक्य असेल तर आळशी मनुष्य सुध्दा धनवान् होईल. प्रकृति सुध्दा आम्हाला हे शिकवत नाही. आजसुध्दा अनेक पदार्थ आहेत ज्यांना ईश्वर बनवितो. ढग, समुद्र, पहाड, खाण इत्यादि. हे सर्व सुध्दा कोणत्या ना कोणत्या तरी पदार्थपासून बनले आहेत. अभावातून अथवा शून्यातून यांची निर्मिती झाली नाही. जरी आम्हास त्याचे कारण डोळ्याने प्रत्यक्ष दिसत नाही, तरी सुध्दा आम्हास हे मानणे

भाग पडते कि यांची निर्मिती कोणत्या ना कोणत्यातरी पदार्थपासून झाली आहे. म्हणून केवळ ईश्वराचे एकट्याचेच अस्तित्व मानने बुध्दिला पटत नाही. आणि यासाठी आमच्या जवळ कोणतेही प्रमाण नाही पुरावा नाही. ज्या जगात आम्ही राहतो त्यामध्ये एक वस्तु सुध्दा अशी दिसून येत नाही की जी विनाकारण बनविल्या गेली आहे. स्वामी दयानंदानी या समस्येबद्दल विस्तृत वर्णन केले आहे. हे जग, सृष्टि काय आहे? कशासाठी बनविली गेली आहे? याचा शेवट काय आहे? जर या प्रश्नांचे उत्तर दिले गेले नाहीत तर ईश्वराच्या गुणावर प्रकाश पडत नाही. जर एखाद्या नास्तिकाने आस्तिक व्यक्तिला प्रश्न विचारला कि ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल तूमच्याकडे काय प्रमाण आहे. काय पुरावा आहे? तो असेच म्हणेल कि जर ईश्वर नसता तर ही सृष्टि निर्माण झालीच नसती. जर सुतारच नसेल तर खुर्ची असणारच नाही. जर घड्याळ बनविणारा नसेल तर घडयाळ असणारच नाही. जर सृष्टिचे अस्तित्व काल्पनिक असेल तर ईश्वर कशाप्रकारे अस्तित्वात असूं शकेल?

म्हणूनच सर्वप्रथम असे म्हणावे लागते कि सृष्टिचे अस्तित्व हे काल्पनिक नसून वास्तविक आहे. सृष्टि ना तर स्वप्न आहे, ना कोणताही काल्पनिक पदार्थ. दूसरी बाब अशी कि ही सृष्टि काही घटना नाही कि ईश्वर एकटाच होता त्याच्या मनात आले आणि सृष्टि बनवून टाकली. जसा ईश्वर अनादि अनन्त आहे, तसाच सृष्टिचा प्रवाह सुध्दा (एकानंतर एक) अनादि अनन्त आहे. हा क्रम कधीही समाप्त होत नाही. जसा रात्रीनंतर दिवस व दिवसानंतर रात्र व पुनः रात्रीनंतर दिवस हा प्रवाह अखण्ड चालू असतो. ही एक नवीन वैशिष्टय पूर्ण बाब स्वामी दयानन्दानी या समुल्लासासाठी विशेषकरून सांगितली. सृष्टि बनविण्याचा एक निश्चित असा ठोस उद्देश्य आहे. या समुल्लासात स्वामीजी प्रश्न उपस्थित करतात कि ईश्वराने सृष्टि निर्माण कशासाठी केली? स्वतः स्वतः साठी तर बनवत नाही. कारण की त्याला सृष्टिची आवश्यकता नाही. त्याला ना तर सूर्याची आवश्यकता आहे ना वायुची, ना पाण्याची. घड्याळजीने घडयाळ का बनविले? याचे दोन प्रयोजन आहेत. स्वतः

साठी अर्थार्जन करणे व इतरांना वेळ पाहण्यासाठी एक साधन तयार करणे. मुख्य प्रयोजन हे होते कि लोकांना वेळ पाहण्यासाठी एका साधनाची आवश्यकता होती. धन कमावणे हा गौण उद्देश्य होय. जर वेळ पाहण्याची आवश्यकता नसती तर घडयाळजीने घडयाळ बनविले नसते. ईश्वराला सृष्टि बनवण्यासाठी कोणत्याही पुरस्काराची गरज नाही, इच्छा नाही ती तो स्वतःच्या उपयोगात ही आणत नाही. स्वामीजी म्हणतात कि ईश्वराने सृष्टिची निर्मिति जीवांच्या कल्याणासाठी केली आहे. जीव अनादि व अनन्त आहेत. जर असे नाही मानले तर मग प्रश्न असा निर्माण होतो कि जीवांना का बनविले? आणि प्रश्नोत्तराचा हा क्रम निरन्तर चालू होईल. म्हणूनच आर्य समाजाची अशी मान्यता आहे कि जीव अनादि व अनन्त आहेत.

जेंव्हा आम्ही सृष्टिचा विचार करतो तेंव्हा केवळ जीवच आमच्या दृष्टिपथात येत नाहीत तर जीव रहित पदार्थ सुध्दा यात आढळून येतात. आणि हे स्पष्ट पणे दिसून येते कि हे सर्व पदार्थ जीवांच्या प्रयोगासाठी व उपयोगासाठी निर्माण झाले आहेत. हे पदार्थ ना तर जीव आहेत, ना तर ईश्वर. ही जी तीसरी वस्तु, जी जीवरहित आहे आणि जीवांच्या उपयोगासाठी त्यात परिवर्तन होत असतात, जसे गव्हापासून पीठ व पीठा पासून चपाती. हे निर्जीव पदार्थ न जीवाने बनविले आहेत ना तर ईश्वराने. जीव आणि ईश्वर यात परिवर्तन तर करीत असतात परन्तु परिवर्तन करण्यापूर्वी परिवर्तीत होणारे पदार्थ तरी अस्तित्वात असणे आवश्यक आहे. म्हणून स्वामीजींनी या समुल्लासात सिध्द केले आहे कि जसे ईश्वर व जीव अनादि आहेत, अनन्त आहेत तसेच प्रकृति सुध्दा अनादि व अनन्त आहे. आता प्रश्न असा उद्‌भवू शकतो कि तीनही पदार्थ अनादि आणि अनन्त कसे असू शकतात? अनादि व अनन्त ईश्वर कशा प्रकारे अनादि व अनन्त जीवावर व तसेच अनादि व अनन्त प्रकृतीवर अधिपत्य गाजवू शकेल? याचा अर्थ असा कि अनादि आणि अनन्त हे तर काळ-वेळ याच्या संबन्धाने आहेत गुणानुसार नव्हेत. जेव्हां आम्ही असे म्हणतो कि अमूक पदार्थ अस्तित्वात आहे, तेव्हा अस्तित्वा

बरोबरच देश व काल याचा बोध होतो. उदाहरणार्थ- आम्ही म्हणतो कि हे आंब्याचे झाड आहे तेव्हा हे सुध्दा लक्षात येते कि ते झाड या ठिकाणी आहे व या वेळी आता आहे. जर असा प्रश्न विचारला कि वृक्ष कोठे आहे? तर उत्तर असेल, 'इथे आहे'. व असा प्रश्न विचारला कि हे झाड केव्हा आहे? तर उत्तर असेल 'आता'. अर्थात् पहिल्या उत्तराने देश (स्थान) व दूसऱ्याने काळ-वेळ याचा बोध होतो. जर, ना तर स्थान (देश) आहे आणि ना काळ (वेळ) आहे, तर अस्त्त्विवा विषयी शंका येऊन अस्तित्वच स्वीकारणे कठिण होईल. वृक्ष कुठे आहे? कुठेहि नाही. केव्हा होता? केव्हांही नव्हता.

मग अस्तित्व कसे? इथे आम्ही चुकीने असे समजतो की देश व काल यापासून गुण प्रकट होतात आणि या पासून सम्बन्धाचे ज्ञान होते. देश, काल ना तर गुण आहेत व ना तर गुणास प्रकट करतात. अशाच प्रकारे जेव्हा आम्ही असे म्हणतो की ईश्वर जीव आणि प्रकृति तीन्ही अनादि आहेत आणि अनन्त आहेत, तर केवळ काळ याचा बोध होतो. ना गुणाचा बोध होतो ना त्यांच्या परस्पर संबंधाचा बोध होतो.

आता प्रश्न असा निर्माण होतो की, जीव आणि प्रकृति अनादि आणि अनंत आहेत तर ईश्वर त्यांचे वर कशा प्रकारे शासन करतो. आपण पाहिले आहे की शासन करण्यासाठी काल (वय) याचा संबंध नाही. यासाठी वयाने (काल) मोठे असण्याची अट नाही, त्यासाठी बळ व ज्ञान याची आवश्यकता आहे. निर्बळ सदा बलवानाच्या अधिपत्याखाली असतात. अज्ञानी सदा ज्ञानवानाच्या अधिपत्याखाली राहतात. ईश्वर, जीव व प्रकृति अनादि आणि अनन्त आहे ईश्वर शक्तिशाली सुध्दा आहे, ज्ञानवान् सुध्दा आहे. तसेच सर्व व्यापक सुध्दा आहे. जीवाची शक्ति सिमित आहे, ज्ञान सुध्दा सिमित आहे. या दोनही कारणामुळे जीव सदा ईश्वराच्या अधिपत्याखाली असतात. हे स्वीकारण्यासाठी कोणतीही अडचण नाही, शंका नाही.

प्रकृति जड आहे अर्थात त्यात सिमित सुध्दा ज्ञान नाही. ज्ञान-शून्य आहे म्हणून प्रकृति ईश्वर आणि जीवाच्या अधिपत्याखाली पूर्ण

रूपाने असते. हे आम्ही अनुभवाद्वारे स्वीकार करू शकतो. या आठव्या समुल्लासात प्रामुख्याने जगाची उत्पत्ति, स्थिति, व प्रलय या विषयीचे विवेचन आढळून येते. याच अनुषंगाने पुढील प्रश्नांची उत्तरे पण मिळतात. ईश्वर सृष्टिची उत्पत्ति, स्थिति, प्रलय कसा करतो, काय ईश्वर जीव, प्रकृति अनादि आहेत, जगाच्या उत्पत्तिची तीन कारणे निमित्त, उपादान आणि साधारण कारण कोणती आहेत, सृष्टि बनविण्याचे प्रयोजनच काय आहे, बीज आधी, का वृक्ष आधी, निराकार ईश्वर जगाची उत्पत्ति कशी करू शकतो, कार्य-कारण यांचा संबंध काय, जगाचा कर्ता ईश्वर आहे किंवा नाही, जीव ईश्वर होऊ शकतो अथवा नाही, काय ईश्वरकृत सृष्टिक्रम आपण बदलू शकतो, कल्प-कल्पान्तरात ईश्वर सृष्टि वेगवेळी बनवितो अथवा पुर्वि सारखीच बनवितो, सृष्टि उत्पत्तिचा क्रम काय आहे, काय जड वस्तु पासून चेतन शक्ति निर्माण होईल, सृष्टिच्या आरम्भी मनुष्य युवा अवस्थे उत्पन्न झाले अथवा लहान बाळ वा वृध्द, काय सृष्टिचा प्रारम्भ आहे, काय सृष्टि प्रवाह नुसार अनादि आहे, काय वृक्षात जीव आहे, मनुष्याची उत्पत्ति पृथ्वीवर सर्वप्रथम कुठे झाली, काय आर्य भारतात बाहेरून आले, काय हिन्दू शब्द आर्य साहित्यात आढळून येतो, काय या पृथ्वीवर महाभारत युध्दा पर्यन्त भारतीय राजाचे एकछत्री, चक्रवर्ती साम्राज्य होते? कोणी कांही ही म्हणो पण स्वदेशीय राज्य हे सर्वश्रेष्ठ असते हे इंग्रजांना ठणकावून सांगणे, हे म. दयानन्द सरस्वती स्वदेशाचे प्रथम पुरस्कर्ता असल्याचे यात वाचा. जगाची उत्पति नक्की केव्हा झाली, त्याचे प्रमाण काय? हे या समुल्लासात वाचा. ज्ञान विज्ञान, आधुनिक विज्ञान, तंत्र ज्ञानाचे पुरस्कर्ते दयानन्द सरस्वती अनेक वैज्ञानिक रहस्ये उलगडतात. जसे परमाणु, अणु, व्द्‌यणु, त्रसरेणु म्हणजे काय पृथ्वी शेषाच्या माथ्यावर स्थिर आहे म्हणजे काय, सूर्य-पृथ्वी लोक व अनंत कोटि ब्रह्माण्डाचे परमेश्वर कशा प्रकारे नियंत्रण करतो. पृथ्वी स्थिर आहे अथवा गतिमान, काय मनुष्यादि प्राण्याची वसती अन्य ग्रहावर सुध्दा आहे? इत्यादि विज्ञान विषयक प्रश्नांची उकल या समुल्लासात वाचा.

## ९. सत्यार्थ प्रकाश नववा समुल्लास

या समुल्लास मध्ये म. दयानन्दजी ने प्रामुख्याने मुक्ति आणि मोक्षाचे वर्णन केले आहे. मुक्ति म्हणे काय? ती कशी प्राप्त होते?

सर्व धर्म पंथ, सम्प्रदाय असा दावा करतात की, त्यांच्या सिध्दान्ता नुसारच आचरण केले तर मुक्ति प्राप्त होईल. परन्तु कोणीही स्पष्टपणे हे सांगत नाही की मुक्ति म्हणजे काय? साधारण पणे जनमानसाची अशी विचारधारा आहे कि, ज्यांची मुक्ति होते ते स्वर्गात जातात. आणि ज्यांची मुक्ति होत नाही ते नरकात जातात. मग प्रश्न असा निर्माण होतो की, स्वर्ग आणि नरक म्हणजे काय? कांही विद्वानांचे असे मत आहे की, स्वर्ग आणि नरक हे आम्ही ज्या जगात राहतो त्यापेक्षा भिन्न आहेत. स्वर्गा मध्ये कोणतेही कष्ट नाहीत. तेथे सर्व पदार्थ विना परिश्रम प्राप्त होतात. त्याच प्रकारे नरक सुध्दा एक स्थान विशेष असून जे व्यक्ति नरकात जातात त्यांना महान कष्ट भोगावे लागतात. त्यांना अग्नित जाळण्यात येते. त्यांना गरम गरम उकळते पाणी प्यावे लागते, वगैरे.

म. दयानन्द सरस्वतींनी सर्व प्रथम इथे सांगितले की, स्वर्ग अथवा नरक नावाचे कोणतेही भौगोलिक स्थान या सृष्टि मध्ये नाही. हिन्दूंचे स्वर्ग, नरक व ईसाई मुसलमानांचे स्वर्ग-नरक (बहिश्त आणि दोजख) यात कांहीही अंतर नाही स्वामीजीनीं याचे जोरदार खन्डन केले. ते म्हणतात की या जगातील दुःखापासून सुटका म्हणजे मुक्ति. हाच स्वर्ग होय. कष्ट भोगणे म्हणजे नरक. हा संसार स्वर्ग सुध्दा आहे तसाच नरक सुध्दा. नरक आणि स्वर्ग या आत्म्याच्या अवस्था आहेत. जो आत्मा परमात्म्या बरोबर आपला सम्पर्क अधिकाधिक करत जातो, त्याला या संसारातील कष्ट दुःख देवू शकत नाहीत. यालाच आपण मुक्ति म्हणून शकतो. तसे पाहिलेतर प्रत्येक सुखामध्ये दुःख दडलेले असते व प्रत्येक दुःखा मध्ये सुखाचा अंश असतो. परन्तु मुक्ति अशी अवस्था आहे की, ज्यामध्ये दुःखाचा लवलेशही नसतो. यासाठी आपण एकच उदाहरण पाहू. आम्ही जेंव्हा जागे असतो तेव्हा या अवस्थेस जाग्रत अवस्था म्हणतात. या अवस्थेमध्ये आमचा या जगातील वस्तुंशी

संबंध असतो. सुख सुध्दा असते व दुःख सुध्दा असते. मिठाई खाल्ली सुख मिळाले, खरचटले दुःख झाले. हा प्रतिदिन येणार अनुभव आहे. दुसरी अवस्था आहे स्वप्न अवस्था. या अवस्थेमध्ये सुख अथवा दुःख देणाऱ्या कोणत्याही वस्तुशी संबंध नसतो. परन्तु सूक्ष्म अशी स्मृति जाग्रत असते. ही स्मृति स्वप्नावस्थेमध्ये सुख वा दुःख देणारी असते. म्हणून जाग्रत अवस्था आणि स्वप्न अवस्था दोन्हीही सुख दुःखाच्या संबंधाने एक समान आहेत. स्वप्नावस्था जाग्रतावस्थाच्या सुख-दुःखाची छाया मात्र आहे.

आता एक तीसरी अवस्था आहे, ज्यास सुषुप्ति अवस्था म्हणतात. यात स्वप्न दिसत नाही. सर्व दुःखापासून सुटका होते. हे एक मुक्तिचे रूप आहे. जरी अत्यंत अल्प प्रमाणात का होत नाही, परन्तु सर्वजण यापासून मुक्तिचा अनुभव घेऊ शकतात. ही क्षणिक मुक्ति पशु-पक्षासहित सर्व प्राणी मात्रास प्राप्त होते. कुत्र्याला सुध्दा शान्त व गाढ झोपेत जो आनन्द मिळतो तोच आनन्द मनुष्यास सुध्दा शान्त व गाढ झोपेत मिळतो. गाढ झोपेत केवळ दुःखा पासून सुटका होत नाही तर त्याबरोबरच एक सूक्ष्म आनन्द सुध्दा प्राप्त होतो. गाढ झोपेनन्तर आम्हास किती आनन्द प्राप्त होतो? झोपे नंतर प्रसन्नतेने आम्ही सांगतो की, आज खूप छान झोप झाली. आनन्द वाटला हा आनन्द दुःखाच्या नसण्याच्या नाही हा आनन्द निषेधात्मक नाही अर्थात दुःखाच्या अभावाचा नसून स्वतःच्या अस्तित्वाचा आनन्द आहे.

याच समुल्लासात म. दयानन्द सरस्वतींनी मुक्ति विषयक आणखी एका प्रश्नाचे समाधान केले आहे. काय मुक्ति एकाच जन्मात होते अथवा त्यासाठी अनेक जन्म घ्यावे लागतील? वास्तविक एक जन्म तर साधारण ज्ञान प्राप्तिसाठी सुध्दा पुरेसा नाही. कांहीजण तर बालपणींच मृत्यु पावतात. त्यांच्यासाठी ईश्वराने त्यांना इतकी संधिच दिली नाही की कांही ज्ञान प्राप्त करू शकतील मग काय अशा जीवांना मुक्ति कधीच प्राप्त होणार नाही? आणि जर होणार नाही तर मग हा त्यांच्यावर ईश्वरकृत अन्याय नव्हे काय?

जर एका पित्याने आपल्या मूलास एका महिन्यासाठी महाविद्यालयात पाठविले आणि सांगितले की एम.ए. पास करू नये, तर हे सम्भव आहे काय? मुक्ति प्राप्त करणे काय जादूचा खेळ आहे? जेंव्हा अनेक सम्प्रदायामध्ये धार्मिक संघर्ष सुरू झाले तेव्हां सर्व धर्मीयानी असा दावा केला की, आमचा धर्म स्वीकाराल तरच मुक्ति प्राप्त होईल. त्यासाठी त्यांनी अनेक उपाय पण सांगितले. कोणी म्हटले गंगा-गंगाचा जप करा मुक्ति मिळेल. जरी १००/२०० मैलावरून सुध्दा गंगा-गंगाचा जप केला तरी मुक्ति मिळेल. जेव्हां कयामत (प्रलय) होईल तेव्हा मुहमंद साहेबची शहादत व शिफारस कामास येईल. कोणी म्हणतात जर या जीवनात तुम्ही असे केले नाही तर तुम्हास नरक (दोजख) प्राप्त होईल. म्हणून अशी संधि वाया जाऊ देवू नका. कुर्आन शरीफ मध्ये एका ठिकाणी असे म्हटले आहे की, ''वे मर गए इस हाल में की वे काफीर थे ।''

अगदी अशाच प्रकारे ख्रिश्चन धर्माचा सुध्दा दावा आहे आणि अन्य धर्मीयांचा सुध्दा हाच दावा आहे. परन्तु महर्षि दयानन्दांचे मत वेगळे आहे. ते म्हणतात की, आत्मिक उन्नति ही शनैः शनैः होते. वाईट सवयी सोडणे व चांगल्या सवयी ग्रहण करणे, उचित वातावरण प्राप्त करणे, अनुचित वातावरणा पासून स्वतःस दूर ठेवणे, हे कांही थोड्या वेळा मध्ये साध्य होणाऱ्या गोष्टी नव्हेत. तूम्ही स्वतःचा अनुभव पहा. थोडे ज्ञान प्राप्त करण्यासाठी तुम्हास किती प्रयत्न करावे लागतात. एक विद्वान् आयुष्य भर सतत अभ्यासात मग्न असतो, परन्तु प्रकृति इतकी विस्तृत आहे कि तिच्या एक अंशाचेही ज्ञान प्राप्त होणे कठिण आहे. न्यूटन ने तर स्पष्ट पणे सांगितले होते की, मी केवळ समुद्र किनारी उभा राहून छोटे छोटे कण जमा करत आहे. ज्ञानाचा सागर माझ्या समोर आहे परन्तु मी एक डुबकी ही मारू शकलो नाही. अशा परिस्थितीत जी व्यक्ति परमेश्वराचे ज्ञाप प्राप्त करू इच्छिते त्याला किती जन्म घ्यावे लागतील. आपल्या जीवन रूपी चादरीवर जे शेकडो डाग वेळोवेळी पडलेले असतात त्यांना स्वच्छ करावयाचे आहे, त्याबरोबरच हा ही प्रयत्न करावयाचा आहे की, नवीन डाग पुनः पडणार नाहीत. जेव्हा एक

बालक महाविद्यालयात शिकण्यासाठी प्रवेश घेतो तेंव्हा त्यास शिकण्या बरोबरच अशा गोष्टींचा सामना करावा लागतो, ज्याचा संबंध सरळ सरळ ज्ञान प्राप्तिशी नसून अज्ञानाशी होत असतो. आम्ही जीवनाच्या उंच संखोल मार्गावरून एक एक पाऊल पूढे जात असतो, म्हणून ध्येय साध्य होण्यासाठी वेळ लागतो. याच समुल्लासात पुनर्जन्मा विषयी पण विचार मांडले आहेत.

या शिवाय आपणास या समुल्लासात विद्या व अविद्या म्हणजे काय? काय जीव परमेश्वराचे प्रतिबिंब आहे, अथवा ब्रह्माचा अंश आहे, मोक्ष प्राप्तिनंतर जीव कोठे राहतो, मुक्त जीवा सोबत स्थूल शरीर असते काय, एकदा मुक्ति प्राप्त झाल्यानंतर जीव पुनः जन्म-मरणाच्या फेऱ्यात येतो काय, मुक्तिचा काळ किती आहे, जीव एक वेळेसच जन्म घेतो अथवा वारंवार, जीवास पूर्व जन्माचे स्मरण का होत नाही, काय परमात्मा जीवास त्याच्या कर्मानुसार शरीर प्रदान करतो, काय मनुष्य, पशु, पक्षी इतर प्राणी यांच्या शरीरातील जीव एक सारखा आहे, जन्म आणि मृत्यु मध्ये काय फरक आहे, मुक्ति मध्ये जर शरीर बरोबर नसेल तर जीव आनन्द कसा भोगू शकेल, मुक्ति मध्ये जीव आणि परमात्मा वेगवेगळे असतात किंवा कसे, कोणत्या कर्मामुळे कोणते शरीर प्राप्त होते, सत्व, रज, तम हे गुण काय आहेत, त्रिविध ताप अर्थात् आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक दुःख म्हणजे कोणते? या ही प्रश्नांची उत्तरे या समुल्लासात आपणास मिळतील.

## १०. सत्यार्थ प्रकाश दहावा समुल्लास

या समुल्लासात स्वामीजींनी मानवी जीवनातील सर्वसाधारण व्यवहारा संबंधी चर्चा केली आहे. जसे आम्ही दैनंदिन भोजनामध्ये काय खावे, काय खाऊ नये, आपापसात मनुष्यांच्या व्यवहार कसा असावा, दैनिक जीवन कसे असावे इत्यादि.

तसेच यात अधिकांशरीत्या, अशा वाईट चालीरितीवर त्यांनी टीका केली आहे, ज्या त्यावेळी समाजात त्या प्रचलित होत्या. तसेच त्या हिन्दू समाजाच्या उन्नतिसाठी बाधक होत्या. या समुल्लासात जरी उच्च

सिध्दान्ताचे वर्णन नाही तरी सुध्दा प्रचलीत सामाजिक अज्ञान व प्रचलीत वाईट प्रथांचे खण्डन केले आहे. जसे स्वामीजींच्या मते मनुष्याने अशाच वस्तु खाव्या ज्या प्राप्त करण्यासाठी कांहीही दोष लागत नाहीत, आणि ज्या वस्तु आपल्या आरोग्यासाठी उपयुक्त आहेत. उदाहरणार्थ दारू पिणे आरोग्य आणि बुध्दि दोन्हीच्या दृष्टिने हानी प्रद आहे. म्हणून जरी ही दारू प्राप्त करण्यामध्ये कोणत्याही प्रकारचा गुन्हा होत नसला तरी सुध्दा दारू पिऊ नये. याच प्रकारे हलवा जरी प्रकृतिसाठी लाभप्रद असला तरी जर चोरी करून आणलेला असेल तर तो खाऊ नये. असेच कोणतेही मांस कोणत्याही प्राण्याची हत्या केल्या शिवाय प्राप्त होऊ शकत नाही. म्हणून यात प्राण्याची हिंसा होते म्हणून मांसाहार करू नये, मग जरी तो स्वास्थ्यासाठी लाभप्रद असला तरीही. हिन्दु आपल्या जातिच्या व्यक्ति शिवाय इतर कोणाच्याही घरी जेवत नाहीत. याचा असा परिणाम झाला की त्यांनी समुद्र पार करून जाणे बंद केले. म्हणून त्यांच्या व्यापाराची उन्नति खंण्डित झाली. म्हणून भारताचा आंतरराष्ट्रीय व्यापार थंडावला. महर्षि दयानन्द सरस्वती या ठिकाणी लिहतात कि समुद्रपार जाण्याने कोणाच्याही जाति मध्ये परिर्वतन होत नाही. पूर्विच्या काळी आर्यजन निरन्तर समुद्र यात्रा करत होते. प्राचीन इतिहास याचा साक्षी आहे. हिन्दूंच्या घरी ब्राह्मण स्वयंपाकी शोधत होते. स्वामीजी लिहतात कि भोजन तयार करण्याचे काम शुद्र करत होते. केवळ स्वच्छतेकडे लक्ष देणे आवश्यक होते. युध्द प्रसंगी एका हातात भाकरी व दुसऱ्या हातात तलवार असेल तर चिन्ता कशाची? हिन्दू मध्ये चौका करण्याची प्रथा निर्माण झाली. चौका च्या बाहेर भोजन करावयाचे नाही. स्वामीजींनी या प्रथेचे जोरदार खण्डन केले. सत्यार्थप्रकाशचे तर समुल्लास गुढ व दार्शनिक सिध्दान्ताने भरपूर आहेत, हा समुल्लास साधारण व्यक्ति साठी सोप्या भाषेत लिहला आहे. धर्माच्या सर्व साधारण सिध्दान्ताचे वर्णन यात केले आहे, ज्याचा कोणत्याही विशिष्ट धर्माशी संबंध नाही. जसे –

धर्माची दहा लक्षणे सांगितली आहेत.

१) धृति - धैर्य धारण करणे

२) क्षमा - अर्थात दूसऱ्याच्या अपराधास क्षमा करणे

३) दम - प्राणास आपल्या आधीन करणे

४) अस्त्येय - चोरी न करणे

५) शौच - अन्तर्बाहय शुध्दि पवित्रता

६) इन्द्रिय - निग्रह इंद्रियाना आपल्या नियंत्रणात ठेवणे

७) धीः - बुध्दि

८) विद्या - ज्ञान

९) सत्य - ज्ञान जे जसे आहे तसेच मानने.

१०) अक्रोध - क्रोध करू नये.

धर्माची ही लक्षणे कोणत्याही विशेष धर्माशी संबंधित नाहीत हे स्वतंत्र सिध्दान्त आहेत. ईसाई, इस्लाम, बौध्द, जैन, सर्वांना हे मान्य आहेत, म्हणून स्वामीजींनी यांना सर्व धर्माचा आधार अथवा मूळ मानले आहे.

इथे या दहाव्या समुल्लासाच्या समाप्ति नंतर सत्यार्थ प्रकाश या ग्रंथाचा प्रथम खण्ड सम्पतो. या प्रथम खण्डामध्ये स्वामीजींनी आपल्या वैदिक धर्माच्या संकल्पनाचे मण्डन केले आहे. अर्थात वैदिक धर्म काय आहे? या धर्माचे दर्शन अर्थात् नियम काय आहेत? याचे सिध्दान्त काय आहेत? मानव तथा पशु प्राणी यांच्या जीवनाचा परस्पर संबंध काय आहे? तसेच आचार अनाचार म्हणजे काय, ज्ञानेंद्रिय (५) कर्मेद्रिय (५) व मन यांना नियंत्रित कसे करावे, काय युधिष्ठिर सम्राटाच्या राजसुय यज्ञाच्या वेळी सम्पूर्ण विश्वातील राजे महाराजे उपस्थित होते, परदेशी राज्य शासनामुळे स्वदेशातील नागरीकांना दुःख आणि दारिद्र यांना का सामोरे जावे लागते, काय शुद्राने स्पर्श केलेले अन्न त्याज्य आहे, परकीय राजसत्ता इथे असण्याची कारणे काय, आर्यावर्तीय राजांचे आपापसातील मतभेद, फूट, ब्रह्मधर्माचे पालन न करणे, विद्याभ्यास न करणे व न

करविणे, बाल विवाह, विषयासक्ति, मिथ्याभाषण वगैरे कुलक्षण, वेद विद्येचा अप्रचार व अपप्रचार, इत्यादि होती काय? भक्ष्याभक्ष्य वस्तु, काय धर्म शास्त्रोक्त व वैद्यक शास्त्रोक्त असू शकते? एका गाईमुळे तिच्या जीवनात किती लोक दूधाद्वारे तृप्त होऊ शकतात. (२४ हजार नऊशे सत्तर याचे गणित वाचा), एखाद्या मनुष्याने दुसऱ्याचे उष्टे अन्न खावे काय? तो सद्‌गुरू असला तरी? काय सर्व जाति धर्माच्या लोकांनी सहभोजन केले तर आपापसातील वैरभाव संपेल? काय महाभारत युध्दापर्यंत समस्त जगात एकमत, एक धर्म होता? काय एखाद्या ग्रंथाचा अभिप्राय हठ्ठ, दुराग्रह व ईर्षा द्वारे समजून येऊ शकतो? इत्यादि प्रश्नांची उत्तरे यात मिळतील.

या समुल्लासात इतर धर्माचा उल्लेख नाही, आणि यदा कदाचित् कुठे असला तरी तो संकेतात्मकच आहे. हा भाग मण्डनात्मक आहे, खण्डनात्माक नाही. जे लोक असे समजतात की स्वामी दयानन्दांनी इतर धर्माचे खण्डन केले आहे. ते विनाकारण स्वामीजीना बदनाम करतात. स्वामी दयानन्दानी सत्यार्थ प्रकाशचा अधिकांश भाग मण्डनात्मकच लिहीला आहे. परन्तु त्यांच्या जीवन काळात इथे अनेक सम्प्रदाय प्रचलित झाले होते, ज्यांनी वैदिक धर्माची सत्यता लपविली होती. म्हणून हे अनिवार्य झाले होते की त्यांच्या संबंधी काहीतरी सांगितले पाहिजे. म्हणून हा आलोचनात्मक भाग स्वामीजीनी ग्रंथाच्या उत्तरार्धात लिहिला. यात एकूण चार समुल्लास आहेत. समुल्लास क्र. ११, १२, १३ व १४. या सर्वाचा विचार आपण पूढील भागात करणार आहोत. हे समुल्लास लिहण्यापूर्वी म. दयानन्दानी प्रत्येक समुल्लासापूर्वी एक एक अनुभूमिका लिहिली आहे. त्यात त्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली आहे.

# सत्यार्थप्रकाश उत्तरार्ध

## ११. सत्यार्थ प्रकाश अकरावा समुल्लास

उत्तरार्धातील चारही समुल्लासा पूर्वी महर्षि दयानन्दानी प्रत्येकी एक एक अनुभूमिका लिहिली आहे. त्यात त्यांनी त्या त्या सम्प्रदायाच्या संदर्भ ग्रंथाचा, जे त्यांना मान्य आहे अशा, उल्लेख केला आहे. आपली भूमिका मांडताना त्यांनी केवळ त्या ग्रंथातील सत्याचे मण्डन व असत्याचे खण्डन केवळ सत्यार्थाचा बोध व्हावा यासाठी लिहल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. मुळातच ही भूमिका वाचकाने पूर्वग्रह दूषित न होता वाचणे आवश्यक आहे. या पूस्तकाच्या विस्तार भयास्तव ती अनूभूमिका इथे देण्याची आवश्यकता नाही.

पृष्ठ संख्येच्या दृष्टिने हा समुल्लास सर्वात मोठा आहे. यात स्वामीजीनी आपल्या देशातील अर्थात् हिन्दू धर्मातील प्रचलित असलेल्या सर्व सत्य असत्य धारणेची आलोचना केली आहे. ते लिहताना म्हणतात, हिन्दू धर्म काय आहे हे एक कोडे आहे. प्रत्येक जण स्वतःला हिन्दू समजतो व हिन्दू धर्माचा अनुयायी मानतो. अन्य लोक सुध्दा यांना, हिन्दू आहेत म्हणून ताबडतोब ओळखतात. अनेक विद्वानांनी हिन्दू धर्मांची व्याख्या केली परन्तु संतोष जनक उत्तर प्राप्त होत नाही. जसे ईश्वराचे अस्तित्व मान्य असणारे हिन्दू,तर हे मान्य नसणारे पण हिन्दू, स्पृश्य-अस्पृश्यता बाळगणारे हिन्दू व न मानणारे हे हिन्दू. मूर्तिपूजक हिन्दू तर, मूर्ती भंजक पण हिन्दू. अशा विविधांगी आस्था असणाऱ्यांचा भारत देश आहे, ही एक त्यांची या देशात विशेषताच आहे. अन्य पंथात, सम्प्रदायात कोणत्याही देशात एवढा विरोधाभास आढळून येत नाही. पूर्वी बंगाल प्रान्ताचे एक गव्हर्नर लॉर्ड रौलॅण्ड होते. त्यांनी एक पुस्तक लिहले आहे, 'दि हार्ट ऑफ आर्यावर्त.' यात ते लिहतात की मला असे वाटते की प्रत्येक धर्मात कांही सत्य आहे. परन्तु मला हे समजत नाही की प्रत्येकाचे सत्य सारखेच कसे असू शकते? हिन्दू धर्माची मान्यता अशी आहे की सर्व धर्म एक समान सत्यावर आधारित आहेत, म्हणून

ते इतर धर्मातील लोकांना आपल्या धर्मात येण्याविषयी आमंत्रण देत नाहीत. आणि जर कोणी दूसरा धर्म स्वीकारला तर त्याच्या विषयी ते उदासीन होतात. स्वामी दयानन्दाचे असे मत नाही, ना ईसाई लोकांचे अथवा बौध्दांचे सुध्दा असे मत नाही. प्रत्येक जण स्वतःच्या धर्मास इतरांपेक्षा चांगला समजतो अशा परिस्थितीत हिन्दू धर्माची आलोचना करणे कठिण होऊन जाते. कारण ज्यांचे सिध्दान्तच निश्चित नाहीत तर त्यांची समीक्षा कशी करावी? परन्तू स्वामी दयानन्दानी तर निश्चय केला की याच हिन्दू धर्माची सूधारणा करेन. वर्तमान हिन्दू धर्माचा व त्याच्या अन्य सम्प्रदायाचा आधार भूत ग्रंथ वेद आहे. हिन्दू धर्मातील कोणताही सम्प्रदाय, पंथ असो, चांगला असेल, कसाही असला तरी, मर्यादित अथवा अमर्यादित, ते सर्व वेदांना सन्माननिय दृष्टिने पाहतात. मग त्यांनी वेद वाचले असोत वा नसोत, वेद समजत असतील वा नसतील त्यानुसार आचरण करोत अथवा न करोत, वेदावर त्यांची आगाढ श्रध्दा होती. हेच सूत्र आधार भूत मानून स्वामीजीनी भिन्न भिन्न उपायानी सुधार करण्याचा प्रयत्न केला. सर्व प्रथम त्यांनी हिन्दू धर्माची विभागणी अनेक भागात केली जसे ...

### १) धर्म बदलत नाही

युगा युगातील कांही हिन्दूची अशी मान्यता आहे की प्रत्येक युगात धर्म बदलत असतो. सत्य युगातील धर्म कलियुगातील धर्मापेक्षा वेगळा मानण्यात येतो. सत्य युगातील अनेक प्रथांचे प्रचलन कलियुगात अनुचित मानण्यात येते. या मान्यते मध्ये ईसाई व मुसलमान सुध्दा समाविष्ट होत असल्याचे दिसून येते व कांही अंशी असे मानतात की ईश्वराकडून धार्मिक प्रथेमध्ये अथवा परम्परे मध्ये परिर्वतन केले जाते. स्वामी दयानन्दानी या विचारधारेचे खण्डन केले.

सांख्य दर्शन शास्त्रात एक सूत्र आहे की धर्माच्या संबंधात देश व काळ यामुळे कोणतेही परिवर्तन होत नाही. सत्य बोलणे, एकाच ईश्वराची पूजा करणे, सद्व्यवहार करणे, वाईट गोष्टीपासून दूर राहणे, यावर काळ व स्थान यांचा प्रभाव पडत नाही. अर्थात् तीन्ही त्रिकाळ  व जगात सर्वत्र

याप्रकारे धर्म समान राहतो. सत्ययुगात जो धर्म समजला जात होता तो कलियुगात अधर्म कसा होईल अथवा धर्म का राहणार नाही? आणि जो अधर्म समजला जात होता तो कलियुगात धर्म कसा होईल? महर्षि दयानंदानी याचे सोदाहरण स्पष्टीकरण केले आहे.

### २) अवतारवाद

हिन्दू धर्मात असा दृढ समज आहे की, जेव्हा जेव्हां धर्माचे पतन अथवा उन्नति होते तेव्हां ईश्वर अवतार धारण करतो. अर्थात् ईश्वर मनुष्य अथवा पशुचे रूप धारण करून या जगात येतो, आणि अधर्माचा नाश व धर्माची उन्नति करतो. जसे जेव्हां रावणाचा दुष्ट स्वभाव वाढला व जगात सर्वजण त्राहि त्राहि माम् म्हणू लागले तेव्हा ईश्वरास रामचंद्राच्या रूपाने जन्म घ्यावा लागला. अशाच प्रकारे कंसाचा वध करण्यासाठी योगेश्वर श्रीकृष्णांना जन्म घ्यावा लागला. त्यांनी आपल्या काळातील अनेक क्रूर व्यक्ति वर विजय प्राप्त करून त्यांना नष्ट केले. अशा प्रकारे ईश्वराचे कोणी दहा अवतार मानतात तर कोणी २४ अवतार मानतात. स्वामी दयानन्दानी याचे खण्डन केले. त्यांचे म्हणणे असे की ईश्वर निराकार असून अजन्मा आहे. ईश्वराच्या स्वरूपामध्ये कसलेही परिवर्तन सम्भव होत नाही. ''तो सदासर्वदा असाच शक्तिमान् असल्यामुळे तो वाट्टेल ते करू शकतो. म्हणून तो अवतार सुध्दा घेऊ शकतो व स्वतः मध्ये परिवर्तन सुध्दा करू शकतो,'' 'परन्तु स्वामीजी म्हणतात जेव्हां आम्ही परमेश्वरास सर्व शक्तिमान् म्हणतो तर त्याच्यामध्ये कोणतेही परिवर्तन होऊ शकत नाही. परिवर्तन होणे म्हणजे कांही कोणती विशेष शक्ति नव्हे, तर ती एक प्रकारे कमजोरीच आहे, अधःपतन आहे. परिवर्तन होण्यासाठी दोन कारणे सम्भवतात. १) आंन्तरिक व २) बाह्य कारण. दोन्हीही साठी निर्बलताच दिसून येते, जर एखादी वस्तु बाह्य कारणामुळे प्रभावित होईल तर हे स्वीकारावे लागेल की त्याच्या मध्ये पुर्वी कोणतीतरी कमतरता होती व त्यामुळे बाह्य कारण त्याच्यावर अधिपत्य गाजवून त्यामध्ये परिवर्तन घडवून आणते. आणि जर परिवर्तन पावणाऱ्या वस्तु मध्ये एखादे आन्तरिक कारण असेल तरी सुध्दा हे स्वीकारावे लागेल की

आंतरिक कोणती तरी निर्बलता असल्यामुळे परिवर्तन करणे भाग पडले. म्हणून हे सिध्द होते की ईश्वराकडे कोणत्याही प्रकारचे परिवर्तन होणे शक्य नाही. म्हणून ईश्वर अवतार घेतो हे म्हणणे बुध्दिच्या विपरीत आहे.

### ३) मूर्तिपूजा

अवतार वादाचे खण्डन करून स्वामीजीनी मूर्तिपूजेचे सुध्दा खण्डन केले. कारण ज्या कांही मूर्ति उपलब्ध आहेत, भारतातील असोत व परदेशातील त्या सर्वच्या सर्व अवताराच्याच मूर्ति आहेत. ईश्वराची मूर्ति होअूच शकत नाही. देव देवतांच्या मूर्ति एक तर काल्पनिक आहेत अथवा देवता वादावर आधारित आहेत.

### ४) पीर – कबर वगैरे

अन्य देशा प्रमाणे भारतात सुध्दा वेळोवेळी सन्त, महात्मा, गुरू, पीर, होउन गेले. त्यांची शिष्य परंपरा सुध्दा होती. आणि त्यांच्या नावाने मत–सम्प्रदाय सुध्दा प्रचलीत झाले. जसे नानक पंथ, कबीर पंथ, दादू पंथ इत्यादि. आपल्या जीवन काळात या गुरूंनी आपल्या अनुयाया मध्ये नैतिकतेचा प्रचार सुध्दा केला. तसेच अनेक वाईट प्रथांपासून आपल्या अनुयायांचे रक्षण पण केले. परन्तु त्याच्या निधानानंतर त्यांची पूजा करण्यास त्यांच्या शिष्यांनी प्रारम्भ केला. जसे गाडगे बाबा महाराज त्यांनी आयुष्यात कधी मंदिरात पाय ठेवला नाही. अंध श्रध्देच्या विरूध्द लढा उभारला पण त्यांच्या नंतर त्यांच्या मंदिरात त्यांच्याच मूर्तिची पूजा सुरू झाली. त्यांच्या समाधि किंवा कबरी बनविण्यात आल्या. (अरविन्द आश्रम) त्याची पूजा होऊ लागली. त्या ठिकाणी दान पेटी आली व अशा प्रकारे दान घेणारे पूजारी व्यवस्थापक तयार झाले. (शिर्डीचे साई बाबा) सांप्रतच्या मंदिराकडे दृष्टिक्षेप टाकला असता असे दिसून येते की किती तरी मत–मतांतर, सम्प्रदाय, पंथ या जगात निर्माण झाले, व त्यांनी मानवी समाजाची अनेक भागात विभागणी केली. महर्षि दयानन्दानी या समुल्लासात या सर्वांचे जबरदस्त खण्डन केले आहे.

## ५) ब्रह्मसमाज

या व्यतिरिक्त स्वामीजींनी ब्रह्मसमाज वगैरे अशा कांही सुशिक्षीत समजांची सुध्दा आलोचना केली आहे. कारण त्यांचा दृष्टिकोण भारत अथवा भारतीयता या संबंधी न राहता अन्य देश व अन्य संस्कृतिशी संलग्न होता, ज्यामुळे भारतीय एकतेमध्ये विघ्न उत्पन्न होत होते. स्वामी दयानन्द सरस्वती वैदिक धर्माचे प्रचारक होते. त्यांना हे कदापी मान्य नव्हते की भारतीयांची आस्था वेदांपासून अलग होऊन कोणत्या तरी अन्य विचार सरणी कडे जाईल. जसे ब्रह्म समाज त्याकाळी एक नवी विचार सरणी घेऊन आपला प्रसार करत होते, यांचे नेता केशवचंद्र सेन हे होते. त्यांनी अशा एका विचार सरणीला जन्म दिला होता कि ज्यामध्ये सर्व मत सम्प्रदायातील चांगल्या चांगल्या बाबींचा संग्रह करून आपला सिध्दान्त मांडला होता. ब्रह्म समाजाच्या अशा विचार धारेने त्याची शक्ति वाढविली नाही तर उलट कमी केली. भिन्न भिन्न संम्प्रदायातील विचारामुळे कोणी त्याचा स्वीकार केला नाही. म्हणून बंगालमध्ये, जिथे याचा जन्म झाला, किंचित शिक्षित वर्गाशिवाय यांचा प्रभाव जन सामान्यात दिसून येत नाही. हा समाज मूर्ति पूजक नाही, तरी सुध्दा मुळाशी त्याचा संबंध तुटल्यामुळे त्याचा प्रभाव कमी झाला. महर्षि दयानन्द सरस्वतीनी वेदांना आपल्या सिध्दान्ताचा आधार मानल्यामुळे धर्माच्या प्रत्येक विभागाचा संबंध त्या तत्वाच्या मुळाशी जोडला गेला.

## ६) देशभक्ति

स्वामी दयानन्द जरी एका सार्व भौमिक धर्माचे प्रचारक होते तरी सुध्दा ते वैदिक धर्म प्रत्येक देशासाठी व सर्व कालासाठी अत्यंत आवश्यक आहे अशी त्यांची मान्यता होती. नाही तर आजकाल अशी धारणा दृढ होत आहे की धार्मिक व संन्याशी लोकांचा राजकारण, देशभक्ति, राष्ट्र यांच्याशी सूतराम संबंध नाही अथवा नसावा. त्यांनी इतरत्र लुडबुड करू नये फक्त देव-देव करावा स्वामी दयानन्दाच्या मते देश-भक्ति सुध्दा एक धर्माचेच अंग आहे. जो आपल्या मातृभूमिची सेवा करत नाही, तो या संसाराची समाजाची सेवा काय करेल? सार्वभौमिक

सेवा करण्यासाठी मातृ-भूमिची सेवा करणे ही प्रथम पायरी आहे या समुल्लासात स्वामीजीची राष्ट्र भक्ति पर अनेक उत्कृष्ट वचने आपणास दिसून येतील.

### ७) भारताचा इतिहास

महर्षि दयानन्द सरस्वतींनी जेंव्हा प्रचार करावयास प्रारम्भ केला तेव्हा भारत देश इंग्रजांच्या गुलामगिरीत होता. इस्लामी राष्ट्र नष्ट झाले होते. कांही हिन्दू राजांनी मुस्लीम राजांचा पराभव करून कांही स्वतंत्र राज्ये स्थापन केली होती. जसे दक्षिणेत (महाराष्ट्रात मराठे) पंजाब मध्ये शिख, परन्तु हे अधिक काळ टिकू शकले नाहीत. इथे मराठे व शिख राज्याच्या पतनाची कारणे शोधण्याचा उद्देश्य नाही. परन्तु कांही कारणे तर अवश्य होती. साधारण विचारधारा अशी झाली होती की भारत देश सदा दूसऱ्यांच्या आधीन झाला होता. कधी मुसलमान तर कधी इंग्रज अथवा अन्य युरोपीयांच्या, न केव्हां स्वतंत्र होता किंवा न स्वतंत्र राहू शकत होता. ही विचारधारा भारतीय स्वातंत्र्याला बाधक होती. ही कांही सशक्त विचार सरणी नव्हती. कोणीतरी पुडी सोडून दिली व जन सामान्याने ती ग्रहण केली. स्वामीजीनी या समुल्लासाच्या शेवटी भारतीय शासन कर्त्या राजांची एक विस्तृत सूची दिली आहे. कोणत्या राजांने किती काळ राज्य केले याचे पूर्ण विवरण आहे. यामुळे एक भावना तर दृढ होते की भारत सदा दूसऱ्यांच्या गुलामगिरीत नव्हता. जेव्हां सिकंदर ने भारतावर आक्रमण करण्याची तयारी केली तेव्हा सम्राट चंन्द्रगुप्ताची एवढी धास्ती होती, की सिकंदराच्या सैन्यात एवढे सामर्थ्य नव्हते, की पूढे चालून आक्रमण करावे. जर दिल्लीश्वरामध्ये व कन्नौज मध्ये आपापसातील वैर नसते तर महमद घोरी इथे आलाच नसता. या समुल्लासात स्वामीजींनी भारतीय वंशाच्या चक्रवर्ती राजांची ही सूची देऊन भारतीयांच्या मानसिक गुलामगिरीस नष्ट केले.

या शिवाय ११ वा समुल्लास अनेक प्रकारे महत्त्वपूर्ण आहे. स्वामीजीनी भूमिकेत स्पष्ट केल्याप्रमाणे प्रथम स्वतः राहत असलेल्या देशातील स्वधर्माची अत्यंत स्पष्टपणे चिरफाड केली आहे. याची प्रचिती

आपणास यावी म्हणून संक्षिप्त प्रश्न इथे देण्यात येत आहेत. या सर्व व अनेक अशा प्रश्नांची समाधान कारक उत्तरे आपणास इथे मिळतील.

* काय पांच हजार वर्षा पूर्वि १८ पूराणाला मान्यता देणारे पुराणी, जैनी, बायबल चे अनुयायी ख्रिश्चन, कुरआनला मानणारे मुसलमान कुठे होते?
* भारताला सुवर्ण भूमि असे संबोधण्याचे काय कारण होते?
* काय भारतामध्ये चक्रवर्ती राजा व अन्य देशात मांडलीक राजा राज्य करत होते?
* काय सम्पूर्ण पृथ्वीवर आर्यावर्तातील स्वायंभूव राजा पासून ते थेट पांडवा पर्यन्त आर्यजनाचे चक्रवर्ती राज्य शासन करत होते?
* अशा सम्राटाचे साम्राज्य नष्ट होण्याचे कारण आळस, निष्क्रियता, ईर्ष्या विषयासक्ति, प्रमाद, विद्या आणि सुशिक्षणाचा नाश, दुर्गुण, दुष्ट व्यसन इत्यादि होते काय?
* काय भारतीय सैन्याला हरविणारे सैन्य साऱ्या पृथ्वीवर कोणाकडेही नव्हते?
* छत्रपति शिवाजी महाराज व गुरू गोविंद सिंहजी यांनी मुगल सम्राट व अन्य मुसलमानी शासनास छिन्न-भिन्न कशाप्रकारे केले?
* काय मंत्र पठनाने अग्नि उत्पन्न होअ् शकतो?
* आग्नेयास्त्र, वारूणास्त्र, नाग पाश, मोहनास्त्र इत्यादि अस्त्र-शस्त्र जर महाभारत पर्यन्त होते, तर तशी पदार्थ विद्या कोणती आहे?
* साऱ्या भूगोल मध्ये सम्पूर्ण विद्या आर्यावर्त देशातून मिस्र देशात, तेथून यूनान मध्ये, तेथून रोम, आणि तेथून युरोप देशात व शेवटी अमेरिकेत (पाताळ) इत्यादि देशात कशी गेली?
* महाभारत युध्दानंतर समस्त विद्येचा भारतात लोप का झाला?
* काय ब्राह्मण व साधु महात्मा यांना सारे गुन्हे माफ आहेत?
* अश्वमेध, गोमेध आणि नरमेध यज्ञात घोडा, गाय व नर बळी दिली जाते?

* भारतात देवालयात मूर्ति-स्थापण्याचे कार्य जैन सम्प्रदायाद्वारे केंव्हा सुरू झाले?
* काय राजा भोज याच्या जवळ विमान होते?
* काय रूद्राक्ष धारण केल्यामुळे पापा पासून सुटका होऊ शकते?
* काय ब्रह्मा पासून जैमिनी ऋषि पर्यंत सर्व ऋषि महर्षि पाषाण पूजा करत होते?
* काय माता, पिता आचार्य, विद्वान्, अतिथि यांची सेवा करणे हीच मूर्तिमान् व्यक्तिंची पूजा होय?
* काय प्रभु रामचंद्राने रामेश्वर मंदिराची स्थापना केली? काय ते मुर्तिपूजक होते?
* श्राध्द व तर्पण याचे वास्तविक स्वरूप काय आहे?
* काय हरद्वार स्वर्गाचे द्वार आहे ? हर-की-पौडी इथे स्नान केल्याने आमची समस्त पापा पासून सुटका होते?
* तीर्थचा नेमका अर्थ काय?
* काय आठरा पुराणाचे लेखक महर्षि व्यास आहेत? पुराणात आहे तरी काय?
* काय वेदाभ्यासाचा अधिकार स्त्री-शूद्राना आहे?
* व्रत म्हणजे काय? उपवास करण्यास व्रत म्हणावे काय?
* गुरू गोविंद सिंहजी द्वारे पंचककार अर्थात् केश, कडा, काछ, कंद्य, आणि काचू (चाकू) केंव्हा आणि कशासाठी चालू केले गेले?
* ज्या देशात जन्म घेतला, ज्या देशाच्या भूमितून उत्पन्न अन्न पाणी घेतले आता सुध्दा खातात पितात, काय त्या देशाला सोडून अन्य देशाशी इमानदारी करणे न्याय संगत आहे?
* काय जाति भेद भाव ईश्वरकृत आहे अथवा मनुष्यकृत?
* इंग्रजांच्या उन्नतिचे कारण, स्वजातिसाठी तन, मन, धन देणे व सतत त्यासाठी प्रयत्न व पुरूषार्थ करणे हेच आहे काय?
* काय धर्म एकच असून अधर्म अनेक असतात?

* असे कोणते धन आहे ज्यामुळे धर्म, स्वर्ग व मुक्ति प्राप्त होते?
* काय संन्यासी चे प्रमुख कार्य सत्याचा पुरस्कार आणि असत्याचा धिःकार करणे आहे?

## १२) बारावा समुल्लास

या समुल्लासात महर्षि दयानन्दानी आणखी तीन पंथाची अर्थात् सम्प्रदायाची आलोचना केली आहे ती अशी ...

### १) नास्तिकवाद

या तीनही सम्प्रदायांनी हिन्दु धर्मा समान, भारतातच जन्म घेतला होता परन्तु त्यांची गणना हिन्दु धर्मात होत नाही. निदान ते तरी तसे मानत नाहीत म्हणून यांचे वर्णन अकराव्या समुल्लासात करण्यात आले नाही. त्यांच्या अनुयायांची संख्या सुध्दा तुलनेने कमी आहे. त्यापैकी एक आहे चार्वाक मत सम्प्रदाय. त्यांचा असा सिध्दान्त आहे की, ना तर ईश्वराचे अस्तित्व आहे, ना ईश्वराची आवश्यकता आहे. कोणास शंका असेल तर अशा ईश्वरास रिटायर करणेच योग्य होईल. जेव्हा तत्व एकमेकाशी मिळतात तेव्हा जीवाचा आरम्भ होतो.

ज्याप्रमाणे दारू पिल्यामुळे नशा येते, जेव्हां ती विशिष्ट तऱ्हेने बनविली जाते, अशाच प्रकारे प्रकृतीतील तत्वांचा जेव्हां मिलाप होतो तेव्हा जीवनाचा प्रारम्भ होतो, जीव जन्म घेतो. अशाप्रकारे या धर्मात न ईश्वराचे अस्तित्व मान्य आहे ना जीवाचे. म्हणून धर्म नावाची कोणती ही वस्तु नाही, तसेच अधर्म ही नाही. जो पर्यंत जीवन आहे, आरामात जगा, प्रसंगी कर्ज घेऊन सुध्दा मौज मजा करा, आनंदीत राहा, अर्थात् तूप प्या, चैन करा. मेल्या नंतर तूमचे अस्तित्वच नष्ट होणार आहे. मग कर्ज देणार कोण आणि घेणार कोण?

यालाच नास्तिक वाद म्हणतात. नास्तिकांची एकूण संख्या साऱ्या जगात कमीच आहे. म्हणून या मताच्या प्रमुखाला चार्वाकाला विशेष सफलता मिळाली नाही. सदाचारासाठी कोणतातरी मजबूत आधार हवा असतो, जसे जीव आणि ईश्वराचे अस्तित्व. हे तर सर्वमान्य आहे कि धर्म

मान्य करूनही सांसारिक कार्यासाठी शिष्टाचार आवश्यक आहे. असत्याने व्यवहार चालत नाही सत्य बोलावे लागते जसे खोटे बोलणाऱ्यांची संख्या वाढली तर एक दिवसही जगाचा व्यवहार चालणार नाही. उदाहरणार्थ जेव्हा आम्ही रिक्शात बसून भाडे ठरवतो, ना कोणतीही लिखा पढी न कोणी साक्षीदार तरी सुध्दा कोणताही रिक्शावाला भाड्या विषयी खोटे पणा करीत नाही. परन्तु सदाचार, सद्व्यवहार या गोष्टी साधारण कसौटिच्या ही पूढच्या आहेत, ज्याचा संबंध शेवटी धर्माशीच आहे. म्हणून असे शक्य आहे की, कोणाचा ईश्वरावर विश्वास नसला तरी, कोणतीही मनुष्य जाति ईश्वराच्या अस्तित्वास नाकारू शकत नाही. म्हणून चार्वाक मत नगण्य कोटिस पोंचले.

## २) बौध्द धर्म

बौध्द धर्म भारतातच उदयास आला. यांना पण ईश्वराचे अस्तित्व मान्य नाही. तसेच वेद सुध्दा मान्य नाहीत. हे ईश्वराला मानत नाहीत तर ईश्वरीय ज्ञानास कसे मानतील? या धर्माचा उदय जरी भारतात झाला असला तरी हा धर्म लवकरच पूर्वेकडे बर्मा, सिलोन इकडे फोफावला. आता भारतात कांही मोजक्याच ठिकाणी राहिला आहे. (इ.स. १८७५ ची स्थिति) म्हणून अन्य देशात बौध्द सम्प्रदायाचे धार्मिक ग्रंथ व संस्था प्रचलित आहेत. त्यांचे वर्णन स्वामीजीनी या समुल्लासात केले नाही तर केवळ कांही बौध्द दार्शनिक सिध्दान्ताचे वर्णन केले आहे. बर्मा, थायलंड, चीन, जपान, इत्यादि देशात बौध्द धर्म आढळून येतो. परन्तु आदि शंकराचार्य इत्यादि वेद प्रचारकांनी त्यांचा विरोध केला, त्यामुळे बौध्द धर्मीयांची संख्या भारतात नगण्य झाली. यावरच शंकराचार्य वगैरे विद्वानांनी समाधान मानले व त्यांचा परदेशात जाऊन विरोध केला नाही. याचे दूसरे कारण हे असू शकते की त्यावेळी हिन्दु धर्म सुध्दा निर्बल झाला होता. त्याला आपल्याच अस्तित्वा बद्दल धास्ती होती. मग ते बौध्दांचा परदेशात जाउन विरोध कसा करतील?

## ३) जैन धर्म

हा धर्म सुध्दा बौध्द धर्म स्थापित झाल्यानंतरच भारतात उदयास

आला. गौतम बुध्द व महावीर स्वामी एकाच युगात जन्मले. कांही लोकांची तर अशी मान्यता आहे की बौध्द आणि जैन एकच आहेत, व गौतम आणि महावीर एकच आहेत. जैन सुध्दा ना तर ईश्वरास मानतात ना वेदांना मानतात. या मुद्यावर दोघेही समान आहेत. जेव्हा वैदिक धर्म प्रचारक शंकराचार्य आदि ने बौध्दांचा विरोध केला, तसेच जैन व जैन धर्माच्या वाढीस सुध्दा विरोध केला. परन्तु जैन धर्म, मर्यादित अवस्थेत का असत नाही आजही जिवंत आहे. या धर्माने आपला विस्तार बौध्दा प्रमाणे परदेशात, भारता बाहेर, प्रसार प्रचार केला नाही. जैन लोकांचे मंदिर भारतात आहेत. जसे हिन्दूंचे देवी-देवता आहेत तसेच यांचे ही तीर्थंकर आहेत. परन्तु यांची वेषभूषा हिन्दूच्या वेशभूषे समान आहे. यांचे अनुयायी अधिकांश रित्या वैश्य लोक (व्यापारी) आहेत. ते अधिकतर व्यापार करतात. म्हणून त्यांचे मंदिर सुध्दा अधिक सुन्दर आहेत. परन्तु यांची संघटन शक्ति अशी दिसून येत नाही. कांही लोकांचे मत असे आहे की जैन धर्माचा आधार अहिंसा आहे, अर्थात् कोणासही कष्ट देता कामा नये. म्हणून हिंसेची प्रवृत्ति कांही अधिक प्रमाणात वाढली आहे. कारण अहिंसेचा खरा अर्थ हा आहे की ना कुणास कष्ट द्यावे, ना कुणास देवू द्यावे. योगदर्शन शास्त्रात अहिंसेची व्याख्या अशी आहे की अहिंसा प्रतिष्ठायां वैरत्यागः। (योगदर्शन २.३५)

अर्थात् अहिंसे चे पालन करणाऱ्याने कोणालाही कष्ट देता कामा नये. कष्ट देण्याची इच्छा सुध्दा मनात यावयास नको. परन्तु दुष्टाना दण्ड देणे ही सुध्दा अहिंसाच आहे. जैन धर्मामध्ये दुष्टांना शिक्षा देणे या विषयाला स्थान नाही. म्हणून त्यांची अहिंसा नाम मात्र राहिली. यामुळेच त्यांची उन्नति होअ् शकली नाही. साहित्याच्या क्षेत्रात त्यांनी खूपच उन्नति केली. हिन्दू धर्मातील शास्त्रा प्रमाणे आपले शास्त्र बनविले. त्यांचे समान व्याकरण ग्रंथ निर्माण केले, हिन्दुच्या पुराण ग्रंथाप्रमाणे जैन पुराण ग्रंथ निर्मिले, न्याय शास्त्रानुसार जैन-न्याय ग्रंथ तयार केले स्वामीजीच्या काळात जैन लोक आपले ग्रंथ प्रकाशित करीत नव्हते. सम्भवत शंकराचार्य इत्यादिंच्या विरोधामुळे असेल कदाचित. यामुळे

स्वामीजीनी जैनांच्या धार्मिक ग्रंथाच्या कांही अंशाचेच वर्णन केले आहे. परन्तु जेथे वैदिक सिध्दान्ताच्या समर्थनाचा प्रश्न आहे त्या विषयी तर प्रथम दहा समुल्लासात झालेच आहे. या समुल्लासात ज्या जैन व बौध्द धर्माचे वर्णन आहे ते भारतातच उदयास आले होते. गौतम बुध्द व महवीर स्वामी यांचा जन्म भारतातच झाला होता. इथेच त्यानी प्रचार केला आणि त्यांचा मृत्यु पण इथेच झाला. जैनांचे सर्व तीर्थ स्थान गिरनार आबू पर्वत इत्यादि ठिकाणी आहेत. सारनाथ, बौध्द गया इत्यादि बौध्दाची प्रसिध्द तीर्थ स्थाने असून बौध्द देशातील लोक गया आणि सारनाथ इत्यादिंचा तितकाच आदर करतात, जितका की मुसलमान मक्का आणि मदिनाचा आदर करतात. जेव्हा सन १९५६ मध्ये बुध्द जयंति आली होती तेव्हा साऱ्या बौध्द देशातून लोक भारतात यात्रेसाठी आले होते. प्राचीन काळी सुध्दा चीनी यात्री महात्मा बुध्दाच्या जीवना संबंधीत स्थळांची यात्रा करण्यासाठी भारतात आले होते. या तीन ही धर्मा विषयी महर्षि दयानन्दानी केलेली आलोचना व त्यासंबंधीत प्रश्नांची उत्तरे आपणास या समुल्लासात प्राप्त होतात.

* जैनी – धार्मिक ग्रंथामध्ये वाल्मीकीय रामायण व महाभारता मधील श्रीराम व श्रीकृष्ण यांची कहानी विस्तारपूर्वक लिहली आहे काय?
* जैन लोक आपले ग्रंथ सार्वजनिक करण्यास मनाई का करतात?
* तीन हजार वर्ष पूर्व चार्वाकमतांचे लोक होते, तसे आजही आहेत?
* काय चार्वाकांना पुनर्जन्म व परलोक मान्य नाही?
* काय सुखाच्या कल्पनेशिवाय दुःखाची कल्पना सिध्द होऊ शकत नाही?
* काय जैन, बौध्द मतानुसार संसार दुःख रूप आहे?
* क्षणिक वादाच्या सिध्दान्तात काय दोष आहेत?
* काय सृष्टिरचनेचे कार्य ईश्वराशिवाय कोणी करणे शक्य आहे?
* काय जैन मत ग्रंथानुसार अनवस्था दोष प्रकट होतो?
* काय जैन मतानुसार ईश्वर अक्रिय आणि निष्क्रिय आहे?
* काय जैन मतानुसार सर्व मुक्त जीव ईश्वर होऊन जातात?

* काय जैन ग्रंथ कर्ता भूगोल, खगोल गणित इत्यादि विद्या विषयी अनभिज्ञ होते?
* जशी दारू पिल्यानंतर नशा आपोआप येते तसेच कर्मफल काय आपोआप मिळते? फल मिळण्यासाठी काय इतर कोणाची आवश्यकता नाही?
* काय पदार्थाचा संयोग, नियमा शिवाय होअ् शकतो? नाहीतर का?
* काय उपाशी राहणे इत्यादि कष्ट सहन करणे याला चरित्र म्हणावे?
* मूर्तिपूजा अर्थात् प्रतिमा पूजा मुळे काय असम्भव फल प्राप्ति होते?
* तोंडावर पट्टी बांधण्या मुळे काय अनेक दोष उत्पन्न होतात?
* काय हिरवी भाजी, कन्द मूल वगैरे खाण्यास मनाई आहे?
* काय कुरूक्षेत्रा मध्ये ८४ हजार नद्या वाहतात?

इत्यादि प्रश्नांची समीक्षा केलेली या समुल्लासात आढळून येते.

## १३ व १४) तेरावा आणि चौदावा समुल्लास

या समुल्लासात महर्षि दयानन्द सरस्वतींनी ख्रिश्चन व मुसलमान धर्माचे वर्णन केले आहे. हे दोन्ही धर्म भारतात जन्मले नव्हते. इस्लामचा जन्म अरबस्थानात झाला आणि ख्रिश्चनांचा जन्म पॅलेस्टीन मध्ये झाला होता. जसे चीन जपान आणि श्रीलंका येथील बौध्द धर्मीय जन भारतात तीर्थ यात्रेसाठी येतात, तसेच मुसलमान मक्का आणि मदिनेला यात्रे साठी जातात.

तेराव्या व चौदाव्या समुल्लासात स्वामीजींनी ख्रिश्चन व मुसलम ान धर्माची आलोचना केली आहे, कारण शेकडो वर्षापासून या दोन्ही धर्माचा संघर्ष वैदिक धर्माबरोबर होत आला आहे. जरी हे दोन्ही भारतात प्रभाव पाडू शकले नाहीत तरी सुध्दा यांचा प्रचार व प्रसार वाढत होता. भारताच्या सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात या दोन्ही धर्माचा प्रभाव दिसून येतो. जैन आणि बौध्द धर्म भारतातील होते आणि त्याची वेशभूषा पण भारतीयच होती. हिन्दू आणि जैन धर्मात जरी संघर्ष झाला तरी दोघांची वेशभूषा भारतीयच होती. एक त्रयस्थ व्यक्ति हिन्दू वसाहतीत

जाऊन यांच्यातील भेद जाणू शकत नव्हता, कारण कपडे एक सारखे, खान-पान एक सारखे, उठणे-बसणे एक सारखे, बोलणे-चालणे एक सारखे इतकेच काय नावे सुध्दा एक सारखे होते. ही गोष्ट ख्रिश्चन व मुसलमानाच्या बाबतीत नव्हती.

जेव्हा प्रथम पहिल्या शताब्दी मध्ये (००५२) सेंट थॉमस बरोबर ख्रिश्चनानी भारतात प्रवेश केला, तेंव्हा ख्रिश्चन धर्माचा प्रारम्भीचा काळ होता. सिरीया मधून हे ख्रिश्चन आले. म्हणून दक्षिण भारतात केरळ प्रान्तात सिरियन चर्चशी संबंधीत ख्रिश्चनाची वस्ती दिसून येते. साधारण ख्रिश्चन व भारतीय लोकात विशेष अन्तर नव्हते. परन्तु जेंव्हा ख्रिश्चनांचा युरोप मध्ये प्रचार व प्रसार झाला व ईसाई प्रचारकांची एक नवीन लहर भारतात आली, तेंव्हा ख्रिश्चनानी वेशभूषेत सुध्दा प्रभाव टाकला. वास्को-डी-गामा हा पहिला सामुद्रिक नाविक होता, ज्याने १४९८ मध्ये कालीकत येथे आपले बस्तान स्थिर केले आणि तेथील राजा जमोरीन कडून कांही अधिकार प्राप्त करून घेतले. इसवी सन १५१० पर्यन्त सम्पूर्ण गोवा त्यांच्या अधिपत्या खाली आला. त्यावेळी पोर्तुगालचा गव्हर्नर होता अलबुकर्क. त्याने आपल्या बरोबर पाद्री प्रचारक आणले, त्याचे नाव होते सेंट जेवियर. अलबुकर्कने घोषणा केली होती की गोवा मध्ये केवळ ख्रिश्चनच जीवंत राहू शकतील. उर्वरित लोकांना एक तर मारण्यात आले किंवा गोव्याच्या बाहेर हाकलून देण्यात आले. अशाच प्रकारे मद्रास वगैरे अन्य प्रान्तात ख्रिश्चन लोकांचा व धर्माचा प्रभाव वाढत गेला. अनेक पाद्री साधु संन्याशाचा वेश परिधान करून हिन्दूंना ईसाई बनवत होते. उदाहरणच द्यावयाचे असेल तर एक पाद्री ज्याचे नाव होते नोबिलिस हा हिन्दु साधूंचा वेश धारण करून राहत होता. आणि हुशारीने हिन्दुंना ख्रिश्चन करण्याचे काम करत होता. जसे रात्री विहिरीत एक भाकरी टाकली व दुसऱ्या दिवशी हे जाहीर केले गेले की साऱ्या हिन्दूंनी ख्रिश्चनाची भाकरी खाल्ली. हिन्दु निर्बळ होते ते ख्रिश्चन बनत होते. या सेंट जेवीयर चे अनेक चमत्कार प्रसिध्द होते जे वेळोवेळी ख्रिश्चन अनुयायांनी प्रसिध्द केले होते अशा प्रकारे दक्षिण भारतात ख्रिश्चन लोकांची संख्या वाढत होती. परन्तु परिस्थितीत असा

बदल झाला की दक्षिणेत अनेक हिन्दु सुधारकानी जन्म घेतला. आणि हिन्दू धर्माचा नायनाट करण्याचे कारस्थान सफल झाले नाही.

ख्रिश्चनांनी धैर्याने व बुध्दिपूर्वक प्रचार केला. युरोपातील प्रसिध्द घराणे जे ख्रिश्चन होते त्यांचा प्रभाव वाढत गेला आणि त्या पैकी कांहीनी जसे इग्लंड, फ्रान्स, डच इत्यादिंनी भारतावर अधिकार प्राप्त केला. त्यामुळेच ख्रिश्चनाना इथे आधार व बल प्राप्त झाले. श्रीरामपूर येथे ईसाई मिशनची स्थापना झाली. आणि येथूनच ख्रिश्चन साहित्याचे प्रकाशन सुरू झाले. परन्तु हिन्दु सजग असल्या मुळे, अधिक परिणाम दिसून येत नाही, तरी सुध्दा आश्चर्य असे वाटते की २००० वर्षापासूनच्या संघर्ष व परिश्रमानंतर सुध्दा म्हणावी तशी ख्रिश्चनांची संख्या वाढली नाही. (राजाश्रय असून सुध्दा)

मुसलमानांनी तर ६०० ते ७०० वर्षानंतर भारताकडे मोर्चा वळविला. महंमुद साहेबाच्या जन्मा पूर्वी, येशूच्या नंतर जवळपास सातशे वर्ष झाले होते. मुसलमानाचे राज्य स्थापन झाल्यानंतर सुध्दा आश्चर्याची बाब ही आहे की दिल्ली मध्ये मुसलमानांची संख्या हिन्दू पेक्षा अधिक झाली नाही. ही परिस्थिति काबूल, कंधार, इत्यादि ठिकाणी आढळून येत नाही. इथे मुसलमानांची संख्या खूपच अधिक आहे. इतर जातीचे लोक अगदीच नगण्य होते. मुसलमानांच्या भितीने कांही पारसी इराणहून पळून भारतात आले. भारतात त्याना शरण मिळाली. जसे हे लोक मुंबईत, नवासरीत दिसून येतात हे सुध्दा आश्चर्य कारक आहे की एक हजार वर्षाच्या रक्त रंजीत संघर्षानंतर सुध्दा इस्लाम धर्माचे उपासक कमीच आहेत. अनेक ठिकाणी असे हिन्दू आहेत जे नव मुस्लीम म्हटले जातात. त्यांचे पूर्वज जबरदस्तीने मूस्लीम बनवले गेले होते. तरी पण मनाने त्यांनी मुसलमान बनणे स्वीकारले नाही. त्यांची वेशभूषा हिन्दूची आहे नावे हिन्दूंची आहेत, भाषा बोली हिन्दूसमान आहे. ते हिन्दू बनू इच्छितात, स्वेच्छेने जर हिन्दू त्यांना स्वीकारतील तर.

महर्षि दयानन्द सरस्वतींनी या मुसलमान व ख्रिश्चन धर्माचे ध्यान पूर्वक अध्ययन केले. त्यांच्या सशक्त व कमजोर सिध्दान्ताचा अभ्यास

केला. त्यांनी हे सुध्दा विचारात घेतले होते की जैन धर्मी लोक जरी हिन्दू पासून भिन्न होते तरी ते भारतवासी आहेत. त्यांचा दृष्टिकोण भारतीय आहे. मुसलमान भारतात राहून पाच वेळा नमाज करत काबा कडे (पश्चिमेकडे) तोंड करत उपासना करतात. ही संस्कृति अरबी संस्कृतीहून भिन्न होती. एक प्रोफेसर ज्यांना अरबी विषयी अतिशय प्रेम आहे ते आपल्या घराला रेगीस्तान समान बनविण्याचे स्वप्न पाहतो पण मक्के मधील जनता रेगिस्तान मुळे परेशान आहे.

स्वामीजीनी तेराव्या व चौदाव्या समुल्लासात ईसाई आणि मुसलम ान धर्माची सांकेतिक रूपाने समीक्षा केली आहे. कांही उदाहरणा दाखल बायबल व कुरआनची आयते सांगून सम्मति दिली आहे. ईस्लाम धर्मा विषयी कांही विधिवत पुस्तक लिहले नाही. जे लोक वैदिक धर्म आणि इस्लाम धर्म यांच्या सिध्दान्ताची तुलना करतील तर त्यांच्या लक्षात येईल की वास्तविकता काय आहे. स्वामीजींचा उद्देश्य तर केवळ हा होता की ईस्लाम व ईसाई धर्माच्या वाढत्या प्रचाराला व प्रसाराला कांही अंशाने का होत नाही प्रतिबंध केला जावा.

महर्षि दयानन्द सरस्वती त्यांच्या अनुभुमिका (३) व (४) मध्ये (तेराव्या व चौदाव्या समुल्लासापूर्वी) स्पष्ट पणे लिहतात की मी हे लिखाण केवळ सत्याची वृध्दि व असत्याचा ऱ्हास व्हावा या हेतूने केले आहे. कोणाला दूःख द्यावे, कोणाचे नुकसान करावे अथवा कोणावर दोषारोप करावेत यासाठी हे लिखाण केलेले नाही. हे लिखाण केवळ मानव जातीच्या कल्याणासाठी व सत्यासत्याच्या निर्णयासाठी केलेले आहे. सर्व मत पंथा विषयी थोडे थोडे ज्ञान प्रत्येकाला व्हावे व त्यायोगे लोकांना परस्पराशी विचार विनिमय करण्याची संधी मिळावी आणि त्यांना एकमेकांच्या दोषांचे खण्डन करून गुणांचे ग्रहण करावे अशी आमची भूमिका आहे.

या दोनही समुल्लासात आपणास पुढील प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे अगदी संदर्भासहित आढळून येतील. ती मुळातच वाचण्या जोगी आहेत या सिध्दान्तांच्या खण्डन मण्डनाचे साहित्य आर्य समाजा मध्ये

सत्यार्थप्रकाश नंतर विपूल प्रमाणात उपलब्ध झाले आहे. तरी पण महर्षि दयानंदाच्या अकाट्य तर्काची भाषा नर्म विनोदा सहित वाचण्यात व अभ्यासण्यात एक वेगळाच आनन्द आहे. तसेच या ज्ञानाच्या समुद्रातून प्रत्येक वेळी वेगवेगळी अमुल्य रत्ने आपणास निश्चितच प्राप्त होतील जसे ...

**अ) ख्रिश्चन मता विषयी**

जे जे सर्व मान्य सत्य आहे ते तर सर्व धर्मात समान आहे. परन्तु विवाद असत्य विषयात होतो, काय हे खरे आहे?

- ❋ काय सूर्या शिवाय दिवस रात्र याची निर्मिति होउ शकते? जर नाही तर मग तौरत पुस्तकात असे का लिहिले आहे?
- ❋ काय ईश्वराने कांही तरी चूकीचे केले व भिन्न भिन्न भाषा उत्पन्न झाल्या?
- ❋ प्रेताला जमीनीत पूरल्याने कोण कोणती हानी होते? वैदिक पध्दति नुसार अन्त्येष्टि संस्कार कसा केला जातो?
- ❋ काय हे सत्य आहे की मूसा पासून जे ईसाईंचे मूळ पुरूष होऊन गेले ते सर्व अशिक्षित होते? सुशिक्षित नव्हते?
- ❋ येशूने मनाई केल्यावर सुध्दा पायात वाहण घालून चर्च मध्ये का जातात? व त्या ऐवजी टोपी का काढून ठेवतात?
- ❋ येशूला वारंवार मी ईश्वर आहे असे का म्हणावे लागते?
- ❋ काय ख्रिश्चनांचा ईश्वर मांसाहारी असून सुध्दा दयाळु आहे?
- ❋ काय येशू द्वारा चवथ्या पीढी पर्यंत दण्ड देणे अन्याय नव्हे?
- ❋ काय सातवा दिवस (रविवार) अपवित्र असतो?
- ❋ काय ख्रिश्चन जन प्रायश्चित करताना पशूंची हत्या करतात?
- ❋ काय येशूवर विश्वास ठेवल्याने सारे पाप क्षमा केले जातात?
- ❋ एका मूलास मारावे व दूसऱ्यास त्याचे मांस खाऊ घालावे हे कार्य काय परमेश्वराचे होऊ शकते?
- ❋ काय ख्रिश्चनाच्या ईश्वराने आपल्याला आराम करण्यासाठी दाऊद

वगैरे कडून घर बांधून घेतले होते?

* काय दगडा पासून भाकरी बनविली जाऊ शकते?
* भारतात पादरी लोकांनी पसरवलेल्या भ्रमजालापासून कसे सावध व्हावे?
* काय येशूने अनेक रोग पिडित लोकांना त्यांच्या रोगापासून मुक्त केले?
* येशूने मनाई केल्यानंतर सुध्दा ख्रिश्चन लोक धन-संचय का करतात?
* काय ख्रिश्चन लोक विद्या ज्ञान सृष्टिक्रमा विरूध्द (निसर्ग नियमा विरूध्द) असलेल्या गोष्टी सत्य मानतात? अर्थात् काय ईश्वर चमत्कार करू शकतो? (नियमा विरूध्द जाऊन)
* काय येशु ईश्वर पुत्र होता?
* काय एकदा मेलेला मनुष्य कबरस्तानातून जिवंत होऊन उठू शकतो?
* ज्या देशात मोठे वृक्ष नसतात, तेथे एरंडाच्या झाडासच वृक्ष म्हणतात असे म. दयानन्द येशू विषयी का म्हणतात? असे का?
* इंग्रजांच्या भारतातील शासन काळात एका गोऱ्या इसमाने काळ्या मनुष्याची हत्या केली तर गोऱ्या ख्रिश्चनास सोडून दिले जात होते काय?

## आ) मुसलमान मता विषयी

* अल्लाहच्या नामा सहित आरम्भ करतो याचा अर्थ काय?
* कसाई आदि मुसलमान गाय वगैरे पशूंची हत्या करताना बिस्मिल्लाह असे का म्हणतात?
* काय खुदा पशु आदि प्राण्यावर दया करतो?
* काय अन्य मतवाल्यांची व पशु प्राण्याची हत्या करण्यासाठी खुदाने आज्ञा दिली आहे?
* काय यांचा ईश्वर नित्य न्याय करत नाही? कोण्या एका विशिष्ट दिवशीच न्याय का करतो?
* ज्या मध्ये समस्त मनुष्य व पशू प्राण्या विषयी पक्षपाताच्या गोष्टी

आहेत असा ग्रंथ ईश्वरकृत होअू शकतो?

* जे धार्मिक आहेत ते सर्व मत पंथामध्ये सुखी असतात व जे पापी आहेत ते कोणत्याही मत पंथाचे असोत दुःखी होतील. काय हे असत्य आहे?
* काय पैगंबराच्या वशिल्याने ईश्वर स्वर्ग प्रदान करेल?
* काय ईश्वर एखाद्याचा शत्रु होअु शकतो?
* ईश्वराने शैतानाला उत्पन्न कशासाठी केले?
* काय ईश्वर मनुष्याकडून उधार घेतो? हे काय दर्शविते?
* काय सृष्टि नियमा विरूध्द चमत्कार घडू शकतात?
* ईश्वरीय नियमानुसार सूर्य पूर्वेला उगवत असेल तर काय कोणी हा सूर्य पश्चिमेकडून उगवू शकेल?
* काय मृत व्यक्ति जीवंत व जीवंत व्यक्ति मृत असू शकतो?
* काय लूटीच्या सम्पत्तित ईश्वराला भागीदार बनावे लागते?
* काय पृथ्वी आणि आकाश कधीतरी कोणाची तरी भाषा ऐकू शकतात?
* काय प्रत्येक प्राण्यास ईश्वराने पाण्यापासून उत्पन्न केले?
* काय स्वर्गात दारूच्या नद्या वाहतात?
* काय सूर्य व चंद्र कधी एकत्रित होअू शकतात? काय सूर्य गुंडाळला जाअू शकतो? काय अशी भूगोल विद्या धर्म ग्रंथात लिहली आहे?
* काय अन्य धर्मियाना आकर्षित करण्यासाठी कृत्रिम, अयुक्त, वेद आणि व्याकरण या विरूध्द असलेले अल्लोपनिषद यांनी बनविले होते?

या समान भूगोल, विद्या व निसर्ग नियमा विरूध्द अनेक बाबींचा या धर्म ग्रंथात समोवश झाल्याचे म. दयानन्द लिहतात तसेच न्याय धर्म, अधर्म, सत्य, असत्य, निती, अन्याय या विषयी तसेच इतराविषय पक्षपात पूर्ण गोष्टींचा यात समावेश असल्याचे म. दयानंद नमूद करतात.

– माधव के. देशपांडे, पुणे.

# संदर्भ ग्रंथ


१. गंगा-ज्ञान सागर, भाग १, ले. गंगाप्रसाद उपाद्याय, संपादक व अनुवादक प्रा. राजेन्द्र 'जिज्ञासु'.

२. सत्यार्थ प्रकाश क्यों पढें? ले. नीरज विद्यार्थी.

३. सत्यार्थ प्रकाश - म. दयानन्द सरस्वती.

४. सत्यार्थ प्रकाश की तेज धाराएँ - ले. प्रा. दयाल आर्य.

५. सत्यार्थ प्रकाश क्या और क्यों? प्रा. राजेन्द्र 'जिज्ञासु'.

६. आर्य संदेश पत्रिका

७. कल्याण मार्ग का पथिक लेखक स्वामी श्रध्दानन्द

८. हुतात्मा रामप्रसाद बिस्मिल (आत्मकथा) ले. मराठी अनुवाद - श्री. नारायण कुलकर्णी नांदेड.

९. 'तडप वाले तडपती जिनकी कहानी' प्रा. राजेन्द्रजी 'जिज्ञासु'.

१०. 'इतिहास दर्पण' ले. स्वामी स्वतन्त्रानन्दजी, सम्पादक प्रा. राजेन्द्रजी 'जिज्ञासु'.

११. प्रसिध्द भजनोपदेशक, कवि सत्यपालजी 'पथिक'.

१२. राजर्षि शाहू महाराज आणि आर्य समाज (संपादन संकलन डॉ. शिवाजीराव शिंदे, औरंगाबाद)


***जन्मानुसार जात मानणाऱ्या एका व्यक्तिने स्वामी दयानंदांना विचारले, ''तुम्ही जन्मानुसार जात मानता की कर्मानुसार?'' स्वामींजींनी उलट त्यालाच विचारले, ''तुम्ही कशा प्रकारे जात मानता?'' त्या व्यक्तिने उत्तर दिले, ''आम्ही तर जन्मानुसारच जात मानतो.'' स्वामीजींनी त्याला प्रतिप्रश्न केला, ''जर एखादा जन्मानुसार ब्राह्मण असेल आणि त्याने मुसलमान धर्म स्वीकारला तर त्याची तुमच्या मताप्रमाणे कोणती जात असेल?'' प्रश्नकर्ता अर्थातच निरूत्तर झाला.***

# परिशिष्ट १

## १. '' सत्यार्थ प्रकाश '' वाचून न जाणो किती जणानी आपले आयुष्य बदलले

### १. स्वामी सर्वदानन्द सरस्वती

''सत्यार्थप्रकाश'' वाचून अनेकांनी आपले आयुष्य बदलले. कोणाला त्यांच्या मित्रांनी ''सत्यार्थप्रकाश'' वाचावयास दिला, कोणास कोणत्यातरी साधारण दुकानात प्राप्त झाला. कोणी बस स्टॅण्ड वरून, तर कोणी रेल्वे स्टेशन वरून घेऊन वाचला. कोणी प्रयत्नपूर्वक आर्य समाज मध्ये जाऊन विकत घेतला. कित्येकांनी ''सत्यार्थप्रकाश'' वाचून भारत मातेच्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन आपल्या जीवनाची आहुति राष्ट्रीय यज्ञात प्रदान केली. परन्तु ज्या कोणी ''सत्यार्थप्रकाश'' वाचला त्यांनी तो वाचल्यानंतर त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला हे निश्चित.

पूर्वी पंजाब प्रान्तातील एक पौराणिक साधु स्वामी सर्वादानन्द जी फिरत-फिरत, ठिक-ठिकाणी धार्मिक प्रचाराचे काम करत होते.

असेच एकदा फिरत फिरत ते एका गावात आले होते. पण याठिकाणी आल्यानंतर स्वामीजी आजारी पडले. बऱ्याच दिवसानंतर एक सद्गृहस्थ त्यांना भेटावयास आले तर त्यांना स्वामीजी खूपच आजारी असलयाचे आढळून आले. इतके अंथरूणास खिळून होते कि त्यांना त्यांचे दैनिक विधि सुध्दा पार पाडणे कठिण झाले होते. त्या सद्गृहस्थानी त्यांना आग्रह करून आपल्या घरी नेले. व त्यांची मनापासून सेवा सुश्रुषा केली. जेंव्हा स्वामीजीचा आजार जाऊन ते निरोगी झाले व त्यांचा निरोप घेताना म्हणाले, बेटा! तू माझी अतिशय काळजीपूर्वक सेवा केलीस, मला सांग तूला काय आशिर्वाद देऊ?

त्या गृहस्थाने हात जोडून स्वामीजीला प्रार्थना केली व एक पुस्तक (सत्यार्थप्रकाश) चांगल्या सुन्दर रेश्मी वस्त्रात ठेवून त्यांना भेट दिले व विनंती केली की कृपया तूम्ही हे पूस्तक एक वेळ सम्पूर्ण वाचावे, हाच मला आशिर्वाद आहे. ते साधु वृत्तिचे स्वामी ते पुस्तक घेऊन

पूढील मार्गाने निघाले. रस्त्याने पायी जाता जाता दुपारी विश्रान्ती साठी एका विशाल झाडाखाली बसले असताना विचार करू लागले की, त्या सद्‌गृहस्थाने माझी एवढी सेवा सुश्रुषा केली म्हणून एकदा तरी वाचून पाहूं. असा विचार करून त्यानी ते पुस्तक वाचावयास सुरू केले. प्रथम समुल्लास वाचताना त्यांना वाटले की मी तर पौराणिक मूर्तीपूजक साधू आहे व हे काय वाचत आहे व क्षणभर त्याचा रागही आला की हे पुस्तक फेकून द्यावे. थोड्या वेळानंतर मन शान्त झाले व पुनः मनात विचार आला की ज्या व्यक्तिने माझी एवढी निरपेक्ष सेवा केली व अत्यंत प्रेमपूर्वक ही भेट दिली. म्हणून तरी कमीत कमी एकदातरी हे वाचणे आवश्यक व योग्य ठरेल. हा विचार करून पुनः पुस्तक उघडले तर संन्यास प्रकरणाची माहीती असलेले पान उघडले व तेथूनच त्यांनी वाचावयास सुरूवात केली. हे वाचता वाचता ते त्या विषयात मग्न झाले. हे प्रकरण वाचून आश्चर्याने म्हणून लागले कि मला आज समजले की संन्यासी कोणास म्हणावे? त्यांचे काय कर्तव्ये आहेत? मग काय, हे पुस्तक त्यानी अथ पासून इति पर्यंत वाचून काढले व त्यांच्या जीवनात परिवर्तनाचा प्रारम्भ झाला. ते महान संन्यासी वेद व ऋषि दयानंदाचे भक्त बनले व उर्वरीत जीवनात आर्य समाजाचा प्रचार व प्रसार आजीवन करत राहीले, तेच स्वामी सर्वदानन्द सरस्वती या नावाने प्रसिध्द झाले.

अशा प्रकारे लाखो लोकांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन करणारे हे पुस्तक म्हणजे प्रस्तूत ‘‘सत्यार्थप्रकाश’’ होय. (आधार : आर्य संदेश)

### २. स्वामी श्रध्दानंदजी

‘‘कल्याण मार्ग का पथिक’’ या आत्म चरित्र पर पुस्तकाचे लेखक, आर्य समाजाचे दूसऱ्या पीढीतील निर्भय संन्यासी, गुरूकूल कांगडी विश्वविद्यालयाचे आद्य संस्थापक, स्वामी श्रध्दानंन्द (इ.स. २२ फेब्रु १८५७ ते २३ डिसें. १९२६)आपल्या ग्रंथांत पृष्ठ ११८ वर सत्यार्थप्रकाश विषयी लिहतात, मी सरळ बच्छोवाली आर्य समाज मंदीराकडे सत्यार्थ प्रकाश विकत घेण्या करीता निघालो. पुस्तक विक्री केन्द्र बन्द होते. शिपायला विचारले तर त्यांने सांगितले की लाला

केशवराम, पुस्तकाध्यक्ष आल्यानंतर पुस्तक मिळू शकेल. त्यांच्या घरचा पत्ता घेऊन मी दोन तासाच्या परिश्रमानंतर, घरचा पत्ता शोधून काढला. केशवरामजी घरी नव्हते. मोठ्या तार घर (Telegraph पोस्ट ऑफीस) मध्ये गेले होते, कारण ते त्याच ठिकाणी सिग्नलर या पदावर नोकरी करत होते. मी त्यानंतर तारघर चा पत्ता शोधून काढला व तेथे पोचलो. त्यावेळी ते मधल्या सुटीमुळे जलपान करण्यासाठी घरी गेले होते. मी पुनः त्यांच्या घरी परत गेलो, तर ते परत तार घर मध्ये गेले होते. चौकशी केल्यानंतर समजले की ते दीड तासानंतर घरी येतील. मी हा दीड तास तेथील गल्लीत इकडे तिकडे पाहत घालवला. एक सद्‌गृहस्थ लाला केशवरामजीच्या घरात जाताना दिसले, तेव्हां मी ताबडतोब त्यांना जाऊन भेटलो व म्हणालो ''महाशय जी! मला सत्यार्थप्रकाश'' विकत घ्यावयाचे आहे. मला उत्तर मिळाले की हात पाय धुवून कांही तरी खाऊन घेतो व मगच तूमच्या बरोबर आर्य समाज मंदीरात येतो. माझ्या पूर्ण दिवसाचा कार्यक्रम त्यांना सांगितला व बाहेर वाट पाहतो असे म्हणालो. केशवरामजीचा चेहरा हे ऐकून आनंदीत झाला व ते म्हणाले महााशय जी! चला प्रथम तूम्हास हे पुस्तक देतो. जो पर्यंत हे काम करणार नाही तो पर्यंत मला चैन पडणार नाही. सत्यार्थप्रकाश वाचून मूंशीरामचे रूपान्तर अमर हुतात्मा स्वामी श्रध्दानन्दात झाले.

काय सत्यार्थप्रकाश वाचण्यासाठी आज कोणी एवढे प्रयत्न करेल काय? आयुष्याची दिशा बदलणारे असे कोणते विचार यात आहेत? या पुस्तकातच वाचा

(आधार : कल्याण मार्ग का पथिक ले. स्वा. श्रध्दानन्द)

## ३. अमर हुतात्मा रामप्रसाद बिस्मिल

**''एक तर घर सोड किंवा आर्यसमाज सोड.''**

अमर शहीद हुतात्मा रामप्रसाद बिस्मिल यांनी कारागृहात असताना आपली आत्मकथा लिहली आहे. ही आत्मकथा आमच्या राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनावर प्रकाश टाकणारी आहे. ही आत्मकथा भारतीय साहित्यातील एक अनमोल रत्न आहे. ही विश्व साहित्यातील

एक महत्त्वपूर्ण कृति आहे. ही हिन्दी साहित्यातील सर्व श्रेष्ठ आत्मकथा आहे की, जी एका क्रान्तीकारकाने स्वतःच्या फाशीच्या कोठडीत बसून लिहलेली आहे. फाशीचा दोर गळ्यात पडण्याच्या तीन दिवस अगोदर ही आत्मकथा पूर्ण करून मृत्युंजयी रामप्रसादजी बिस्मिल नी तिला गुप्तरीतीने सुरक्षित बाहेर पाठवून दिली. वीर रामप्रसादजींचे गद्य व पद्य या दोन्ही वर ही सारखेच प्रभुत्व होते. ते हिन्दी आणि उर्दु या दोन्ही भाषेतील उच्च कोटिचे कवि होते.

''सर फरोशी की तमन्ना अब हमारे दिल मे है।'' हे अमर गीत रामप्रसादजींची स्वतःची रचना आहे. अनेक क्रान्तीकारकांना या गीताने देशभक्तिची प्रेरणा दिली. असे रामप्रसादजी आपल्या आत्मकथेत लिहतात ...

''मी लहानपणी फार खोडकर होतो. यासाठी वडिलांचा खूप मार मिळत असे. कदाचित बाल पणातील मिळालेल्या मारानेच माझे शरीर इतके कठोर व सहनशील झाले असावे.

मी चौदा वर्षाचा असेन तेव्हां मी पाचवीत शिकत होतो. याच वेळेस मला वडिलांच्या पेटीतून पैसे-चोरण्याची वाईट सवय लागली. मला आणखी एक दोन वाईट सवयी लागल्या. मी सीगारेट पीत असे. (दिवसाला ५०/६०) अधून मधुन भांग ही पीत असे, अशा वाईट सवयीच्या प्राथमिक अवस्थेतच देवाने माझ्यावर कृपा केली. माझे भांग पीणे व चोरी पकडल्या गेली. नसता मी स्वतःचा राहीलो नसतो व इतरांसाठी कांहीही करू शकलो नसतो. यामुळे मी दोन वेळा मिडल परीक्षा नापास झालो.

अशा परिस्थितीत माझ्या घराला लागून असलेल्या मंदीरात एक नवीन पूजारी आले होते. ते मोठे सत्शील व्यक्ति होते. त्या पूजाऱ्याच्या उपदेशाचा माझ्यावर प्रभाव पडला. मी भक्ति व अभ्यासाच्या मार्गाला लागलो. मला ब्रह्मचर्य पालनाचा उपदेश प्राप्त झाला. व्यायाम करणे सुरू केले. शरीर सदृढ झाले. वाईट सवयी सूटल्या. मंदिरात माझी ओळख श्रीमुंशी इंद्रजीत यांचेशी झाली. त्यानी मला संध्या करण्याचा उपदेश

केला. त्यांनी मला आर्य समाज विषयी माहिती दिली. त्यानंतर मी सत्यार्थप्रकाश वाचला. या सर्व परिवर्तनासाठी श्री मुन्शी इंद्रजीत, आर्य समाज व सत्यार्थप्रकाश यांनी प्रमुख बजावली आहे.

''सत्यार्थप्रकाश'' च्या अध्ययनाने माझ्या जीवनरूपी इतिहासांतील एक नवीन पान उघडले. त्यातील उपदेशा प्रमाणे मी माझे आचरण सुरू केले. मीठ तीखट व आंबट खाणे सोडले. एक वेळ जेवण करत होतो. असे पाच वर्षे केले. त्यामुळे माझ्या शरीरातील दोष दूर झाले. थोड्याच दिवसात मी निष्ठावान आर्य समाजी झालो. संन्यासी, महात्मा, विद्वान् यांची सेवा करणे, उपदेश ग्रहण करणे माझे कर्तव्य समजून मी करत होतो. त्यावेळी आमच्या गावी सनातन धर्मी पंडित जगता प्रसाद व आर्य समाजी पं. अखिलानंदजी शास्त्री यांचे मध्ये शास्त्रार्थ झाला. त्यावेळी वडिलांच्या विरोध सुरू झाला वडिल म्हणाले आता तू आर्य समाजातून तूझे नाव काढून टाक, मी म्हणालो आर्य समाजचे सिध्दान्त सार्वभौम आहेत. त्यांना कोण हरवू शकते?

आता माझे वडिला सोबत अनेक वाद विवाद झाले. त्यांनी सांगितले की एक तर आर्य समाज सोड किंवा घर सोड. त्यावेळी मी केवळ शर्ट घालून उभा होतो. पँट काढून धोतर नेसत होतो. अंगावर लंगोटी होती वडिलांनी हातातले धोतर ओढून घेतले व म्हणाले घरातून नीघ. नंतर मलाही राग आला. तसाच मी घराचा त्याग केला दोन दिवसानंतर त्यावेळी पं. अखिलानन्दजीचे व्याख्यान आर्य समाज मंदिरात होते तेथे मी गेलो. त्यावेळी वडिल तेथे आले व मला घेऊन गेले. त्या दिवसापासून ते माझ्या बाबतीतील प्रत्येक गोष्ट सहन करत होते. मी अभ्यासात खूप कष्ट घेवू लागलो व प्रत्येक वर्गात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होवू लागलो. अमर शहिद हुतात्मा रामप्रसाद बिस्मिल यांनी याचे सर्वश्रेय ''सत्यार्थप्रकाश'' या ग्रंथाला असल्याचे आपल्या आत्मकथेत नमूद कले आहे.

आधार : हुतात्मा रामप्रसाद बिस्मिल (आत्मकथा) मराठी
अनुवाद श्री. नारायण कुलकर्णी, नांदेड

## ५) श्री बहाल सिंग

### ''पांच हजार सालों से सोनेवाले जागो !''

उत्तर प्रदेशातील नजीबाबाद शहरा जवळचे राहणारे एक ''सत्यार्थप्रकाश'' प्रेमी आर्य परिवारात त्यावेळी अत्यंत प्रसिध्द होते. बालवयात ते अशिक्षित होते. आर्यसमाजच्या उत्सावा मध्ये एकदा ''सत्यार्थप्रकाश'' कथा ऐकून त्यांनी ''सत्यार्थप्रकाश'' विकत घेतला. त्याना वाचता येत नसल्यामुळे त्यांनी यावर एक नामी उपाय शोधून काढला ''सत्यार्थप्रकाश'' पुस्तक घेऊन ते शाळा सुटण्याच्या वेळी शाळे जवळ जाऊन एखाद्या विद्यार्थ्याला विनंती करत व एक दोन पाने त्याच्या कडून ऐकत असत. असे करता करता ''सत्यार्थप्रकाश'' त्याना पाठ झाला. पूढे मोठे झाल्या वर त्यानी कांही शिक्षण पूर्ण करून पोलीस खात्यात नोकरी केली व त्यांना रात्रीच्यावेळी चौकीदारीची ड्युटी मिळाली. त्यांचे काम रात्री ''जागते रहो'' असे म्हणायाचे, सावधान रहा म्हणायाचे होते. त्या ऐवजी ते म्हणायचे ''पाच हजार सालों से सोने वालो जागो'' लोक त्यांना विचारायचे काय आम्ही पांच हजार वर्षा पासून झोपलेलेच आहोत? याचा अर्थ काय? ते उत्तर देत मला समजले, मी जागा झालो. हे पुस्तक सत्यार्थप्रकाश वाचा म्हणजे कळेल. झोळीतून काढून ते सत्यार्थप्रकाश द्यावयाचे व वाचण्याची प्रेरणा द्यावयाचे. सत्यार्थप्रकाश वाचून अनेकांनी आपले जीवन आमूलाग्र बदलले. त्या व्यक्तिचे नाव इतिहासात प्रसिध्द झाले. नाव, होते श्री. बहाल सिंह यांनी बीजनौर भागात पांच आर्य समाजाची स्थापना केली. मथुरा येथील ऋषिच्या जन्म शताब्दी च्या वेळी व अजमेर येथील अर्ध-निर्वाण शताब्दी च्या वेळी शताब्दी च्या वेळी (सन १९२४) व (सन १९३३) महात्मा नारायण स्वामींनी आपल्या लेखात या बहाल सिंहाची चर्चा केली.

## ६) श्री. हाजी अल्लाह रखीया रहमतुल्लाजी

### मुंबई येथील आर्य समाजाचे निस्सीम भक्त.

हाजी साहेब मुळ कच्छ (गुजरात) येथील राहणारे होते व मुंबई येथे सोन्याचा व्यापार करत होते. हे धार्मिक दृष्टिने आर्य समाजी होते.

त्यांचे असे म्हणणे होते की जगात धर्म तर केवळ वैदिक धर्मच आहे. ते आर्य समाजाच्या सत्संगात नियम पूर्वक उपस्थित राहत असत. ते आर्य समाजाच्या सिध्दान्ता विषयीचे तज्ज्ञ होते. श्री राजेन्द्रजी जिज्ञासु संपादित आपले पुस्तक ''इतिहास दर्पण'' पृ. ३२ वर लिहतात. मला श्री नन्द किशोर चौबेनी सांगितले की एकदा एका प्रवचनात एकाने सांगितले की कोणाला कांही शंका विचारावयाच्या असतील तर विचारा. तेव्हां हाजीजीनें एक प्रश्न विचारला. त्यावर त्यांना त्या वक्त्यानी उत्तर दिले. तेव्हां त्याना हाजीजी म्हणाले की तूम्ही दिलेले उत्तर बरोबर नाही हाजीजीनी सत्यार्थप्रकाश मागविला व त्यातून दाखवून दिले की वक्त्याचे उत्तर चूक आहे. हाजी म्हणतात आपण तप केले आहे, जंगलात एकान्तात राहीला असाल आणि गुरू कडून विद्या मिळविली, परन्तु तूम्ही ऋषि दयानन्द लिखित वैदिक सिध्दान्ताचा परिचय प्राप्त केला नाही. आर्य समाजात अनेक वेळा ते आपल्या मुलानाही घेऊन येत असत. त्यावेळी आर्य समाज भवन निर्माणासाठी त्यांनी रू. ५०००/- चे एक रकमी दान दिले होते. महर्षि दयानन्द लिखित सत्यार्थप्रकाश चा कितीतरी लोकानी अभ्यास केला व तर्क शक्ति प्राप्त करून आपले जीवन बदलले. परधर्मियानी सुध्दा व आपली अंधश्रध्दा संपविली.

(आधार : इतिहास दर्पण ले. स्वा स्वतान्त्रानन्दजी,
सम्पादक प्रा. राजेन्द्र जिज्ञास)

# परिशिष्ट २

## प्रसिध्द वैदिक विद्वान भजनोपदेशक सत्यपालजी ''पथिक''

सुमारे एक हजार भजन लिहणारे अमृतसर, पंजाब येथील अलौकिक कवि आर्य समाज परिवारातील प्रसिध्द भजनोपदेशक व वैदिक विद्वान् पंडित सत्यपालजी पथिक यांची सत्यार्थप्रकाश वरील दोन भजने (कविता) एक प्रकाशित व अन्य अप्रकाशित सादर करत आहोत.

**६) सत्यार्थप्रकाश क्या है ? (प्रकाशित)**

सभी समस्याओं का तुम जो समाधान पाना चाहो।
पढो महर्षि दयानन्द का अमर ग्रंथ सत्यार्थप्रकाश।।

वेद शास्त्र का सार है इसमें, धर्म, कर्म, व्यवहार है इसमें।
निराकार ईश्वर की पूजा, भक्ति भाव और प्यार है इसमे।
यह है ऐसा बिगुल
कि जिससे गूँज उठा धरती आकाश पढो...।।१।।

दंभ के पडदे कट जाते हैं, वहम के बादल हट जाते है ।
मन बुध्दि रोशन हो जाए, दूर अंधेरे हट जाते हैं ।
सभी अंध विश्वासों और पाखण्डों का हो सत्यानाश
पढो ... ।।२।।

दिल का दर्पण धुल जाएगा , हर दरवाजा खुल जाएगा।
पुण्य -पाप और सत्य झूठ, इस धर्मतुला पर तुल जाएगा ।
वैदिक दर्शन क्या कहता है, अगर सत्य की है तुम्हें तलाश
पढो...।।३।।

कायरता को हर देता है, जीवन शक्ति भर देता है ।
काया कल्प करें सब का ये, चमत्कार ही कर देता है ।
मुर्दा दिल भी जी उठता है, फिर ना हो कभी हताश
पढो...।।४।।

हसते मुस्काते देखे है, जुल्म से टकराते देखे है ।
हमने इसे पढनेवाले, फांसी पर भी जाते देखें है ।
पथिक कहीं भी किसी दशामें, तिल भर होते नही निराश
पढो...।।५।।

– कवि सत्यपालजी पथिक

### ७) सत्यार्थ प्रकाश महिमा (अप्रकाशित भजन)

(तर्ज : पीपल के पत्ते के ऊपर तेरा ठौर ठिकाना है)
जीवन पथ के शूलों को हर देता है सत्यार्थप्रकाश ।
मुश्किल राहें फूलों से भर देता है सत्यार्थप्रकाश ।
जीवन पथ के शूलो को हर देता हे सत्यार्थप्रकाश ।।
१. ईश्वर के नामों की चर्चा ऋषियो ंके वरदान इसीमें ।
ओम् प्रभु का मुख्य नाम है, वेदों का फरमान इसीमें ।
सुलझा के हर उलझन को धर देता है सत्यार्थप्रकाश ।
जीवन पथ के शूलों को, हर देता है सत्यार्थप्रकाश ।।१।।
२. शिशुओं की शिक्षा के बारे मिलते है अनमोल विचार ।
सारे माता – पिता सिखाए, शुध्दोच्चारण सद् व्यवहार ।
मानवता के गीतों को स्वर देता हे सत्यार्थप्रकाश ।
जीवन पथ के शूलों को, हर देता है सत्यार्थप्रकाश ।।२।।
३. बच्चों तथा गृहस्थों के कर्तव्य निष्ठ कर्मो का वर्णन ।
वानप्रस्थ संन्यास विषय पर विस्तृत वैदिक मार्गदर्शन ।
बेघर होने वालों को घर देता है सत्यार्थप्रकाश ।
जीवन पथ के शूलों को,हर देता है सत्यार्थप्रकाश ।।३।।

४. राजा और प्रजा के हित में सभी राज नियमों का बोध।
ईश्वर-जीव-प्रकृति का वर्णन अन्य जटील विषयों पर शोध।
सभी कठिन प्रश्नों का उत्तर देता है सत्यार्थप्रकाश ।
जीवन पथ के शूलों को हर देता है सत्यार्थप्रकाश ।।४।।
५. सृष्टि की उत्पत्ति -स्थित्ति और प्रलय काल को दर्षाता है।
विद्या तथा अविद्या, क्या है बन्ध मोक्ष सब समझाता है।
भक्ष्याभक्ष्य का ज्ञान बराबर देता है सत्यार्थप्रकाश।
जीवन पथ के शूलों को हर देता है सत्यार्थप्रकाश।।५।।
६. भारत के अनगिनत मतों की समालोचना भी करता हे।
सत्य वचन उपकार भाव से कहते हुए नही डरता है।
पथिक हजारो तोहफे सुन्दर देता है सत्यार्थप्रकाश।
जीवन पथ के शूलों को हर देता है सत्यार्थप्रकाश।।६।।

- प्रसिध्द कवि सत्यपाल पथिक

अप्रकाशित कविता

# परिशिष्ट ३

## राजर्षि छत्रपति शाहू महाराजांचे वटहुकूम (अध्यादेश)

## प्रकरण ८

## राजर्षींचे वटहुकूम जाहीरनामा

**१) राजाराम कॉलेज व राजाराम हायस्कूल आर्य प्रतिनिधी सभा यांना देण्याचा वटहुकूम १९१९**

१९१९ साली राजाराम कॉलेज आणि राजाराम हायस्कूल या दोन प्रमुख शिक्षण संस्थांचे व्यवस्थापन शाहू महाराजांनी आर्य समाजाच्या 'आर्य प्रतिनिधी सभा' या संस्थेकडे सोपविले त्या संदर्भातिल हा जाहिरनामा.

### जाहीरनामा नंबर २

गेल्या वर्षी येथील पुढारी लोकांचा एक बोर्ड करून त्या बोर्डाकडे राजाराम कॉलेजची सर्व व्यवस्था सोपविलेली होती, पण सदर बोर्डाकडून त्या संस्थेसंबंधाने होण्याची ती व्यवस्था झाली नाही, असे हुजूर निदर्शनास आले वरून राजाराम कॉलेज ही संस्था व त्याच प्रमाणे राजाराम हायस्कूल, अशा दोन्ही संस्था तारीख १ जून सन १९१९ इसवी पासून पांच वर्षांचे मुदतीने आर्य प्रतिनिधी सभा यू.पी. ह्या सोसायटीच्या ताब्यात देण्याबद्दल हुजुरून आज्ञेत आहे आहे व हल्लीच्या बोर्डास दिलेली ग्रांट, इमारत बगैरे सर्व आर्य प्रतिनिधी सभा यू.पी. ह्या सोसायटीस देण्यात याव्या अशी आज्ञा झाली आहे.

हुजूर आज्ञेवरून,

**ॲड. आर. आर. शिरगावकर,**

**ॲड. दिवाण सरकार करवीर**

(करवीर सरकारचे गॅझेट, भा.१, ता. १५ मार्च १९१९)

## २) स्पृश्यांना व अस्पृश्यांना समान रूग्णसेवा देण्यासंबंधीचा आदेश देणारा वटहुकुम.

**NOTIFICATION**

**Kolhapur, 22nd August, 1919.**

**No. 7 : The following Huzur Order, received with the Huzur Office No.82, dated 20th August 1919, is published for the information of the Officers concerned and of the public :-**

"It has come to the notice of His Highness that even in our charitable Hospitals, the touchables and untouchables are treated differently and are not allowed to approach the Residential State Quarters within the compound. These quarters are not given to them as their sanitaries and so they have no right whatever to treat an untouchable human being so defiantly, but they are expected to give him every due consideration. Charitable Institutions are meant for poor people and even the poorest untouchable human being has a right to be treated on a footing of equality. His highness earnestly hopes that his Medical Staff will follow the good example set by foreigners, especially by the American Mission at Maifraj. Any patient, whether touchable or untouchable, when he goes to the Residential Quarters should be treated respectfully like a gentleman, taken into the house, is examined carefully and then sent to the Hospital for treatment and not turned out like an animal or beast. If any man on the Medical Staff has any objection, to his doing so, he must send in his resignation within six weeks from the receipt of this order. He will, of course, however, hard worked he may be, is expected to attend to the sufferings of a poor patient first. This rule is applicable to the whole Medical Staff from the Highest Official down to the lowest menial such as a dresser or a nurse. Every servant of the Hospital now in service or employed hereafter should be furnished with a copy of this order and also a copy of this should be hung up in the office of the Hospital for permanent guidance."

By order of H.H. the Chhatrapati Maharaja Saheb,

**K. GAIKWAD,**

Personal Assistant to the Diwan.

(करवीर सरकारचे गॅझेट, भा. ४, ता. २३ ऑगस्ट १९१९.)

## ३) कोल्हापूर राज्यात गोवध बंदी करणारा शाहू महाराजांचा हुकूम.

### वटहुकूम नंबर ३

तारीख १६ ऑगस्ट १९१९ इसवी

करवीर इलाख्यात यापुढे केव्हाही व कोठेही कसायास गाई विकण्याच्या नाहीत, तशा कोणी विकलेल्या समजून आल्यास विकणारा इसम जबर दंडास पात्र होईल म्हणून हुजूर आज्ञा तारीख २४ माहे ऑगस्ट सन १९१९ ची झाल्या आधारे आपल्यास असे कळविण्यात येते की आपण आपले स्थळसीमेतील गावगन्नानिहाय सदरप्रमाणे तजवीज राहण्यास हुकूम देऊन हुकूमाची प्रसिद्धी दवंडी पिटवून करण्यात यावी.

**डी.एच. गोखले**

**इ.डि. माजिस्ट्रेट**

(करवीर सरकारचे गॅझेट, भा. ४, ता. २३ ऑगस्ट १९१९.)

**४) राज्यातील तलाठ्यांचे प्रशिक्षण व नेमणुका या विषयीचे नियम सांगणारा शाहू महाराजांचा जाहीरनामा.**

**प्रशिक्षणात 'सत्यार्थ प्रकाश' ग्रंथाचे ज्ञान व नेमणूकीत अस्पृश्यांना प्राधान्य ही या जाहीरनाम्याची वैशिष्ट्ये होत.**

१. तलाठी व पाटील क्लास हे कायमपणे गुरूकूलामध्ये मुलकी परीक्षेप्रमाणे वर्षोवर्षी पंडित आत्माराम शास्त्री यांचे देखरेखीखाली चालविण्याचे व सदर क्लासांना 'सत्यार्थ प्रकाश' ग्रंथाचे ज्ञान शिकविण्याचे.

२. सदर क्लासाकडे लागणारे टीचर मे. बाळासाहेब गायकवाड यांनी द्यावेत व त्यांच्या पगाराबद्दल स्पेशल सांगशन समजून पुढच्या बजेटात कायमची रक्कम दाखल करून सदर टीचरचा पगार पंडित आत्माराम शास्त्री यांच्याकडे पाठवा.

३. पाटील व तलाठी क्लासची परीक्षेची प्रवेश फी मुलकी परीक्षेच्या प्रवेश फीच्या निम्मी असावी व ती सर्व हुजूर खजिन्याकडे पंडित आत्माराम शास्त्री यांना भरणा करावी.

४. पंडित आत्माराम शास्त्री यांनी तलाठी परीक्षेचा रिझल्ट मामलेदार व महालकरी यांचेकडे पाठवून द्यावा व त्यांनी आपल्या पसंतीप्रमाणे रिझल्टवरून चांगला मनुष्य पसंत करून घ्यावा.

५. गेल्या तलाठी परीक्षेत वाजवीपेक्षा जास्त उमेदवार आले म्हणून काहींची परीक्षा घतली नाही असे ऐकण्यात येते, तरी ज्या काही उमेदवारांना वगळले असेल त्या उमेदवारांची परीक्षा पुन्हा घ्यावी.

तलाठी हा मामलेदार यांचा एक्सक्ल्यूझिव्ह चाईस ठेविला असून त्यांना एखादा तलाठी नालायक आहे असे वाटल्यास त्यांनी त्यास डिसमीस करून नवा तलाठी भरावा, अर्थात पगार, दंड करणे, रजा देणे हे अधिकार मामलेदार यास आहेत.

ज्या जातीची लोकवस्ती जास्त असेल त्या जातीचे होतो होईल तितका प्रिफरन्स द्यावा, प्रत्येक पेट्यास ५ व प्रत्येक महालास निदान

तीन तरी अस्पृश्य तलाठी असावेत.

पेट्याचे भागकारकून यांना डिसमीस करणे, दंड करणे व त्यांची नेमणूक करणे वगैरे मामलेदार यांच्या एक्सक्ल्यूझिव्ह चाईस ठविला आहे.

जे कारकून हुजूर शिफारशीने अगर दुसऱ्या कोणाच्या शिफारशीने खात्यात नोकर झाले आहेत व जर ते अयोग्य गैरलायक असून परीक्षा पास नसेल तर अशा कारकुनाबद्दल २ महिन्यांच्या आत मामलेदार व महालकरी यांनी रिपोर्ट करावा.

तलाठी व भागकारकून यांचे नेमणुकीबद्दल नीट हुजूरना नॉमीनल श्रुत करावे व त्याज बद्दल कारसपान्डन्स नारायणराव गोपालराव सरदेसाई यांचे मार्फत करावे.

**– शाहू छत्रपती**

(करवीर सरकारचे गॅझेट, भा. १, ता. ३० ऑगस्ट १९१९.)

**५) तलाठ्यांच्या नेमणुकीसंबंधीचा जाहीरनामा प्रत्येक तलाठ्याने 'सत्यार्थ प्रकाश' पुस्तकाचा अभ्यास करून त्याची परीक्षा दिली पाहिजे म्हणून शाहू महाराजांचा हुकूम.**

## रेव्हिन्यू डिपाटमेंट

### जाहीरनामा

तारीख १० ऑगस्ट १९१८ इ.

हुजूर सरकारचा मु.ठ. नंबर १९ चा होऊन मु.जा. नंबर ७२, तारीख ५ माहे ऑगस्ट १९१८ इसवीची आज्ञा झाल्या आधारे प्रसिद्ध करण्यात येतो की :-

सध्या जे तलाठी नेमण्यात आले आहेत त्यांस रेव्हिन्यू खात्यांतील जनरल लिष्टांत जागा दिल्या आहेत, असे समजावे. आठरा रूपये पगार होईपर्यंत त्यांस बढती तलाठी लिष्टात मिळेल. त्यानंतर वीस पासून पुढील जाग्यांवर त्यांचा इतरांप्रमाणे हक्क राहील. तलाठी लोकांस प्रॉव्हिडंट फंड देण्याचा हुकूम आहे, पण ज्या लोकांस सवलत नको असेल त्यांना इतर नोकरांप्रमाणे पेन्शन मिळण्याचा हक्क राहील.

सत्यार्थ प्रकाश या पुस्तकाचा अभ्यास सर्व तलाठी लोकांनी केला पाहिजे, त्याची परीक्षा पुढील साली होईल.

**C. S. Viractmath.** **N. P. Bhide.**

**चिटणीस** **ॲ. सरसुभेकरिता**

(करवीर सरकारचे गॅझेट, भा. १, ता. १७ ऑगस्ट १९१८.)

प्रकरण ९

# राजर्षी शाहू : एक चिंतन

– प्रा. नरहर कुरूंदकर

राजर्षी शाहू महाराज ह्यांच्या मनावर आर्य समाजाचा फार मोठा प्रभाव होता. आर्य समाजाविषयीचे हे आकर्षण त्यांच्या ठिकाणी ऐन तारूण्यातच निर्माण झालेले होते. किंबहुना आर्य समाजाच्या ह्या आकर्षणामुळे वेदोक्त कर्माचा आग्रह सुरू झाला होता. ह्या ठिकाणी आर्य समाज म्हटल्यामुळे बिचकून जाण्याचे कारण नाही. महर्षी दयानंद ह्यांनी सुरू केलेली आर्य समाज ही एक विलक्षण कर्मठांची संघटना आहे. मुसलमानांचा पवित्र कुराणवर जसा गाढ आणि आग्रही विश्वास असतो तसा आर्य समाजचा वेदांवर विश्वास आहे. त्यांच्यासाठी वेद ही ईश्वराची निःश्वासिते असून सर्व जगाचे ज्ञान वेदांत भरलेले आहे. वेद प्रामाण्यावर आर्य समाजाचा कडवा विश्वास आहे आणि आर्य समाज ही सहनशील, दुबळ्यांची संघटना नसून ती आक्रमक संघटना आहे. आर्य समाजचे हे कर्मठ रूप पाहिले म्हणजे हे महासनातनी, महा परंपरावादी असले पाहिजेत असा ग्रह होतो व त्यामुळे रामराज्य सभा, वर्णाश्रम, स्वराज्य संघ, असल्या प्रकारच्या सनातन्यांच्या यादीत आर्य समाजाचे नाव घेण्याची इच्छा होऊ लागते. ह्याच ठिकाणी खरा घोटाळा आहे. म्हणूनच त्यांना विलक्षण कर्मठ म्हटले आहे. आर्य समाज आपल्या एकांतिक वेदनिष्ठेमुळे स्मृती, पुराणे, हिंदु समाजातल्या सर्व रूढी, मूर्तीपूजा, धार्मिक खुळचटपणा ह्या सर्वांचा कडवा विरोधक राहिला. आर्य समाज ही महाराष्ट्रातल्या बोलक्या सुधारकांची संघटना नव्हती, ती आग्रही आक्रमकांची संघटना आहे. म्हणून परंपरावादावर हल्ले करण्यात आर्य समाज स्त्री–शिक्षणाचा पुरस्कर्ता आहे. वेदांत प्रौढ–विवाह आहेत, आग्रही राहिला! वेदात स्त्री–शिक्षण आहे म्हणून आर्य समाज प्रेम–विवाह आहेत, म्हणून ह्यांचाही तो पुरस्कर्ता आहे. वेदांत जाती नाहीत. अस्पृश्यता नाही, म्हणून आर्य समाज सर्व जातिभेदांचा विध्वंसक, अस्पृश्यता मोडणारा आणि आंतरजातीय विवाह करणारा

आहे. कोणत्याही क्षेत्रात ते झपाट्याने लक्षसंख्या पुरी करणारे लोक आहेत. एकदा आंतरजातीय विवाह सुरू झाले की, ते दहा-पंधरा वर्षात असे एक लक्ष विवाह घडवूनच दाखवतात. समाज सुधारकांच्या सगळ्या सुधारणावादी कार्यक्रमांची प्रचंड संख्येने अंमलबजावणी करणारा असा हा शक्ती-स्रोत आहे. आर्य समाजाने वैदिक वैदिक परंपरेचा अभिमान आणि सगळ्या समाज सुधारणा ह्यांचा समन्वय प्रत्यक्षात आणून दाखवला आहे. शिवाय आर्य समाज राष्ट्रीय स्वातंत्र्याचा कडवा पुरस्कर्ता होता. शाहू महाराजांच्या ठिकाणी असणारी आर्य समाजाची ओढ जी की समाज सुधारणेची ओढ आहे तितकीच ती ह्या महान राष्ट्राच्या स्वातंत्र्याचीही उत्कट ओढ असण्याचा संभव आपण समजून घेतला पाहिजे. बारकाईने पाहिले तर महाराज महाराष्ट्रात आर्य समाजाचे फार मोठे प्रतिनिधी दिसतात.

✻ ✻ ✻